सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. २० एप्रिल २०२५ वर्ष - तिसरे अंक १९ पाने : ८ किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अफगाणिस्तानमध्ये ५.९ तीव्रतेचा भूकंप!

## जम्मू-काश्मीरसह उत्तर भारत हादरले

काबूल : अफगाणिस्तान-ताजीकिस्तान सीमावर्ती भागात शनिवारी (दि. १९) भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ५.९ इतकी नोंदविण्यात आली असून, या भूकंपाचा परिणाम भारताच्या जम्मू-काश्मीरपर्यंत जाणवला. सध्या कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाल्याची अधिकृत माहिती नसली, तरी स्थानिक प्रशासनाने खबरदारीचे उपाय सुरू केले आहेत.

युरोपियन मेडिटेरेनियन सिस्मोलॉजिकल सेंटर नुसार, हा भूकंप शनिवार, १९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ६:४७ वाजून ५५ सेकंदांनी झाला. भूकंपाचे केंद्र अफगाणिस्तान आणि ताजिकिस्तानच्या सीमावर्ती डोंगराळ भागात होते. भूकंपाचा



केंद्रबिंदू डोंगराळ असल्याने खबरदारीची पातळी अधिक वाढविण्यात आली आहे. अफगाणिस्तानातील बदख्शान प्रांतासह अनेक भागात भूकंपाचे धक्के तीव्रतेने जाणवले. या भूकंपाचे धक्के काश्मीर आणि दिल्ली-एनसीआरसह उत्तर भारतातील काही भागात जाणवले.

राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्र (एनसीएस) नुसार, भूकंप भूपृष्ठाखाली ८६ किमी खोलीवर झाला. काश्मीर खोरे आणि दिल्ली-एनसीआरमध्ये सौम्य ते मध्यम भूकंपाचे धक्के जाणवले. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. भूकंपाची तीव्रता जास्त नसली तरी लोकांनी घाबरून घराबाहेर धाव घेतली, आणि काही काळासाठी शहरात शांतता व सतर्कतेचे वातावरण पसरले. स्थानिक प्रशासनाने आपत्कालीन सेवा सक्रिय केल्या असून, संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

हिंदुकुश पर्वतरांगेतील टेक्टोनिक प्लेट्सच्या हालचालींमुळे हा भूकंप घडल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. हे क्षेत्र भूकंपाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील मानले जाते. ८६ किलोमीटर खोलीचा हा भूकंप मध्यम तीव्रतेचा असून, त्याचा परिणाम प्रमुख शहरी भागांपेक्षा दुर्गम भागांमध्ये अधिक जाणवला. तज्ज्ञांच्या मते, खोली जास्त असल्याने पृष्ठभागावरील नुकसान मर्यादित राहण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे यावेळी मोठ्या विनाशक आपत्तीची शक्यता कमी मानली जात आहे. सद्यस्थितीत कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेची नुकसान झाल्याची पुष्टी झाली नसली तरी प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन संस्था सतर्क आहेत. हवामान विभाग तसेच राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. प्रशासनाने नागरिकांना अफवांपासून दूर राहण्याचे आणि फक्त अधिकृत माहितीवर विश्वास ठेवण्याचे आवाहन केले आहे. दुर्गम भागात मदत पोहोचविण्यासाठी यंत्रणा तयार असून, कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवू नये म्हणून सर्व उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

# उद्धव - राज ठाकरे बंधू एकत्र येण्याची चर्चा

मुंबई : कधी मराठी - अमराठी तर कधी भूमिपुत्रांचे हक्क तर कधी उद्धव - राज एकत्र येणार हे मुद्दे घेऊन मागील दोन दशकांपासून राजकारणात खेळ सुरू आहेत. राज ठाकरे यांनी मनसेची स्थापना केली त्याला १९ वर्षे पूर्ण झाली. पक्षानं विसाव्या वर्षात पदार्पण केलं. पण हे मुद्दे काही बदलत नाहीत. आलटून पालटून हे तीन मुद्दे पुढे येत असतात. थोडे दिवस भावनिक खेळ रंगतो. पुढे काही होत नाही. कधी उद्धव ठाकरे सुरवात करतात. तर कधी राज ठाकरे बोलतात. मुद्दे तेच असतात पण मांडणी नव्या प्रकारे होत असते. प्रत्येकवेळी प्रसारमाध्यमांमधून तर्कवितर्कांचा खेळ सुरू होतो. पुढचे काही दिवस चर्चेला उधाण येते. नंतर विषय मागे पडतो. आता पुन्हा एकदा उद्धव - राज एकत्र येणार या मुद्यावरुन चर्चा रंगली आहे.

कामगार सेनेच्या कार्यक्रमात उद्धव ठाकरे म्हणाले, किरकोळ भांडणं बाजूला ठेवायला मी तयार



आहे पण महाराष्ट्राच्या हिताच्या आड येणाऱ्यांना मी घरात बोलवणार नाही! जेव्हा आम्ही म्हणत होतो की उद्योग गुजरातला जातायत, तेव्हा जर साथ दिली असती तर महाराष्ट्राचं सरकार वेगळं दिसलं असतं. आता विरोध करणं आणि पुन्हा तडजोडीचं बोलणं हे चालणार नाही.

दुसरीकडे, महेश मांजरेकरांनी घेतलेल्या मुलाखतीत राज ठाकरे बोलले, एकत्र येणं कठीण नाही. फक्त इच्छेचा विषय आहे. मी माझा इगो आड येऊ देत नाही. आणि उद्धवसोबत काम करायला मला हरकत नाही.

उद्धव आणि राज ठाकरे यांच्या या ताज्या वक्तव्यांमुळे चर्चेला उधाण आले आहे. महापालिका निवडणुकांची घोषणा होण्याआधी उद्धव - राज एकत्र येणार का अशी चर्चा रंगली आहे.

मराठा समाजाच्या आरक्षणावरुन सर्वोच्च न्यायालयात सुनावणी प्रलंबित आहे. निकालातून राजकीय आरक्षणाबाबत काही निर्देश आले तर महापालिका निवडणुकांचे स्वरुप बदलू शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अनेक निवडणुका रखडल्या आहेत. यात प्रामुख्याने महापालिकांच्या निवडणुका आहेत. आरक्षणाचा तिढा सुटला आणि निवडणुकांची घोषणा झाली तर महापालिकांच्या निमित्ताने सर्वच पक्षांची परीक्षा असेल. यामुळे अधूनमधून वेगवेगळे पक्ष नवनवे मुद्दे पुढे करुन जनमताचा अंदाज घेण्याचा प्रयत्न करत असतात. ताजी उद्धव - राज एकत्र येण्याची चर्चा ही दोन्ही नेत्यांकडून जनमताचा अंदाज घेण्यासाठीची खेळी असण्याची शक्यता यामुळेच व्यक्त होत आहे.

# दिल्लीत नागरिक गाढ झोपेत असतानाच पत्त्याच्या बंगल्यासारखी कोसळली इमारत!

## ४ जणांचा मृत्यू; १० जण अडकल्याची शक्यता

नवी दिल्ली : नवी दिल्लीतील मुस्तफाबाद परिसरात मोठी दुर्घटना घडल्याचे समोर आले आहे. मध्यरात्रीच्या सुमारास एक चार मजली इमारत कोसळून चार जणांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. तसेच दहाहून अधिकजण ढिगाऱ्याखाली अडकल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच एनडीआरएफ टीम आणि पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून बचावकार्य सुरु करण्यात आले. मात्र नागरिक गाढ झोपेत असतानाच पत्त्याच्या बंगल्यासारखी इमारत कोसळल्याने एकच खळबळ



उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिल्लीतील न्यू मुस्तफाबाद येथील शक्ती विहारमध्ये ही घटना घडली. रात्री २ वाजून ५० मिनिटांच्या सुमारास अग्निशमन दलाला इमारत कोसळल्याची माहिती मिळाली. त्यानंतर तातडीने दिल्ली अग्निशमन सेवा विभागाने तात्काळ अग्निशमन दलाच्या गाड्या आणि एनडीआरएफ पथके घटनास्थळी दाखल झाली. बचावकार्य दरम्यान, बाहेर काढण्यात आलेल्या १० जणांपैकी ४ जणांचा मृत्यू झाला. बचावकार्य अद्याप सुरु असून ढिगाऱ्यात अजूनही ८ ते १० लोक अडकले असण्याची शक्यता आहे.

## आकाशात दिसणार शुक्र, शनि आणि चंद्राचा संयोग

नवी दिल्ली, १९ एप्रिल : जगभरातील खगोल निरीक्षकांना आकाशात एक अद्वितीय आणि रोमांचक दृश्य अनुभवता येणार आहे. आगामी २५ एप्रिल रोजी आकाशात ट्रिपल प्लॅनेटरी कंजंक्शन (तीन ग्रहांचा संयोग) घडणार आहे. त्यामुळे आकाशात एक 'हसणारा चेहरा' दिसणार आहे. ग्रह संयोग तेव्हा होतो जेव्हा २ किंवा त्यापेक्षा अधिक अंतराळातील घटक एकमेकांच्या जवळ असतात आणि एकत्र दिसतात. जेव्हा ३ ग्रह एकत्र येतात, तेव्हा त्याला ट्रीपल प्लॅनिटरी कन्जक्शन म्हणून ओळखले जाते. अवकाशतज्ज्ञांनी सांगितले की, शुक्र, शनी आणि चंद्र या तीन अंतराळ पिंडांचा संयोग होईल, ज्यामुळे एक त्रिकोणीय आकृती तयार होईल, जी हसणाऱ्या चेहऱ्याचे रूप धारण करेल.

# पश्चिम बंगाल हातून निसटतोय- मिथुन चक्रवर्ती

कोलकाता : वक्फ दुरुस्ती विधेयकावरून पश्चिम बंगालमध्ये उसळलेल्या हिंसाचारावर भाजप नेते आणि सुप्रसिद्धी अभिनेता मिथुन चक्रवर्तींनी भाष्य केलंय. बंगालमध्ये मुस्लिम तुष्टीकरणाचे राजकारण सुरू आहे. दंगलीमुळे हिंदू बांधवांना घर सोडून पलायन करावे लागतेय. बंगाल आपल्या हातून निसटत असून राज्यात अविलंब राष्ट्रपती शासन लावण्याची गरज असल्याचे मिथुन चक्रवर्ती यांनी सांगितले.

यासंदर्भात मिथुन चक्रवर्ती म्हणाले की, मी केंद्रीय गृह मंत्र्यांना अपिल करतो की, त्यांनी बंगालमध्ये राष्ट्रपती शासन लागू करावे. तसेच बंगालमध्ये पुढच्या निवडणुका या सैन्याच्या उपस्थितीत करण्यात याव्यात. आम्हाला बंगालमध्ये निष्पक्ष



निवडणूका हव्या आहेत. आम्हाला राज्यात दंगे नको आहेत. बंगालमध्ये सध्या दुःखद स्थिती आहे. दंगा प्रभावित क्षेत्रात हिंदूंना आपली घरे सोडून पलायन करावे लागत आहेत. वक्फ संशोशन कायद्याच्या विरोधात पश्चिम बंगालमध्ये ११ एप्रिल रोजी मोठी हिंसा झाली होती. मुस्लिम बहुल मुर्शिदाबाद आणि मालदा जिल्ह्यासह दक्षिण चोवीस परगनाच्या भांगोर मध्ये हिंसेच्या घटनेनंतर तणाव वाढला. या हिंसाचारात तीन लोक मारले गेले होते. तर २०० हून अधिक लोकांना अटक करण्यात आली होती. यानंतर या परिसरात अर्धसैनिक दलांना तैनात करण्यात आले आहे.

पश्चिम बंगालमध्ये पुढच्या वर्षी २०२६ मध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. सत्तारूढ तृणमूल कॉंग्रेस (टीएमसी) आणि विरोधी पक्ष भाजप यांच्यामध्ये आरोप-पत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. विधानसभा निवडणुकीच्या एक वर्ष आधी आपआपल्या मतदारांना आकर्षित करण्यासाठीचे प्रयत्न सुरू झाले आहेत. राज्यात मुस्लिमांची मोठी संख्या आहे. गेल्या ११ एप्रिल रोजी राज्यात सर्वप्रथम मुर्शिदाबादच्या शमशेरगंज ब्लॉकच्या धूलियान मध्ये सुनियोजीत हिंसा करण्यात आली. आंदोलकांनी पोलिसांच्या गाड्या पेटवल्या होत्या. जवळच्या सूती परिसरातही जाळपोळीच्या घटना घडल्या होत्या. शमशेजगंजमध्ये हरगोबिंदो दास आणि त्यांचा मुलगा चंदन यांची घरात घुसून हत्या करण्यात आली होती.

दरम्यान पश्चिम बंगालचे राज्यपाल सीवी आनंद बोस यांनी देखील मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर टीकास्त्र सोडले. त्यांनी आरोप केला की, राज्यात हिंसेचा जसा प्रकोप वाढत आहे. त्यावर त्यांनी दावा केला की, बंगालमध्ये निवडणुकीच्या आधी नेहमीच हिंसाचार भडकत असतो. कोणताही सभ्य समाज अशा वातावरणात राहू शकत नाही असे राज्यपालांनी सांगितले.

## घाणीच्या वाढत्या साम्राज्याने नायगांव शहरातील स्वच्छतेचा बोजवारा !

# पगार होत नसल्याने सफाई कामगार संपावर

## होमग्राउंड वरील प्रश्नात खासदार चव्हाण लक्ष घालतील काय ?

नरसी - कंत्राटदार कंपनीने गेल्या सहा महिन्या पासून पगार न दिल्याने नायगांव येथील सफाई कामगार संपावर गेले असून नगर पंचायत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे

नायगांव शहराच्या स्वछतेचा बोजवारा उडाल्याचे चित्र आहे.गल्लोगल्ली वाढत्या घाणीच्या साम्राज्याने दुर्गन्धीचा कहर माजला असून नायगांव नगर पंचायतीवर एकहाती वर्चस्व असलेले खासदार रवींद्र चव्हाण आपल्या होमग्राउंड वरील या महत्वपूर्ण प्रश्नात लक्ष घालून तो सोडवतील काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

नायगाव शहरात स्वच्छता व साफ सफाईसाठी कंत्राट घेतलेल्या नामांकित पल्लवी एंटरप्राइजेस कंपनीच्या गुत्तेदाराने कामगारांना चक्क पाच ते सहा महिन्यांची पगारच दिली नसल्याने त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे. साफसफाई करणारे २५ कामगार दि.१७ एप्रिल २०२५ पासून काम बंद आंदोलन सुरू केले असल्याने नायगाव शहरात घाणीचे साम्राज्य पसरले असून नायगाव नगर पंचायत बद्दल नागरीकांतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

गेली अनेक महीन्यापासुन कामगारांना पगार देतो म्हणत सहा महीने उलटले शेवटी हातावर पोट असणारे कामगार पगारच मिळत नसल्याने स्वच्छतेचे काम न करण्या निर्णय घेऊन जो पर्यंत पगार दिला जात नाही तो पर्यंत कामावर येत नाही असा संपावर जाण्याचा निर्णय घेतल्याने एक हाती सत्ता असलेल्या नायगांव नगर पंचायतची चागलीच नाचक्की झाली आहे. पंचवीस ते तीस हजार लोकसंख्या असलेल्या नायगाव शहरातील साफसफाई कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या या आंदोलनामुळे शहरातील नागरिकांपुढे स्वच्छतेची मोठी समस्या निर्माण झाली आहे.

नायगाव शहरातील प्रत्येक वार्डातील घराघरात जावून घंटागाडीच्या माध्यमातून कचरा जमा करणारे वाहने येणे बंद झाले असल्याने घरात साठवलेल्या सूखा ओल्या कचऱ्याचे काय करायचे? कुठे टाकायचा? हा प्रश्न येथील सर्व गृहिणींना सतावत आहे.या बरोबरच शहरातील नाली सफाईचे काम ठप्प झाल्याने गल्ली बोळातील नाल्या तुंबल्या आहेत.परिणामी दुर्गंधीमुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. नागरिक त्रस्त झाले असून नायगाव नगर पंचायत बद्दल तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

# आमदार धनंजय मुंडेंना झाला 'बेल्स पाल्सी' आजार

बीड : राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांना बेल्स पाल्सी हा आजार झाला आहे. या आजारात चेहऱ्याला पक्षाघाताचा झटका येतो. यामुळे चेहऱ्याचे स्नायू कमकुवत होतात. बोलायला त्रास होतो किंवा बोलता येत नाही. अनेकदा हा आजार मर्यादीत कालावधीपुरता त्रासदायक असतो. वेळेत उपचार केले तर या आजारातून बरे होणे शक्य आहे. अनेकदा औषधोपचाराने दोन आठवडे ते सहा महिन्यांच्या कालावधीत रुग्ण बरा होतो.

धनंजय मुंडे यांनी त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमधून त्यांनी बेल्स पाल्सी हा आजार दीड महिन्यांपूर्वी झाल्याचे सांगितले. उपचार सुरू आहेत पण अद्याप पूर्ण बरा झालेलो नाही, असेही धनंजय मुंडे यांनी त्यांच्या एक्स पोस्टमध्ये नमूद केले आहे.

आमदार धनंजय मुंडे यांचा विश्वासू म्हणून ओळखला जाणारा वाल्मिक कराड सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात अडचणीत आहे. करुणा मुंडे यांच्या वक्तव्यांमुळे धनंजय मुंडे यांच्या प्रतिमेला धक्का बसल्याची चर्चा आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आमदार धनंजय मुंडे यांना बेल्स पाल्सी हा आजार झाल्याचे वृत्त आले आहे.

मागील काही दिवसांपासून धनंजय मुंडे कॅमेऱ्यापुढे आलेले नाहीत. त्यांच्या आजाराविषयी उलटसुलट चर्चेला उधाण आले. यानंतर धनंजय मुंडे यांनी त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवर एक पोस्ट केली.

# जिल्ह्यातील अवैध धंद्याविरोधात मोहीम सुरू करा-पालकमंत्री विखे पाटील



अहिल्यानगर दि.१९- जिल्ह्यातील अवैध धंद्याविरोधात पोलिसांनी निर्भयपणे आणि मोहीम स्तरावर कारवाई सुरू करावी, असे निर्देश जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात अवैध व्यवसायांवर कारवाईबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीसाठी आमदार काशिनाथ दाते, अमोल खताळ, विठ्ठलराव लंघे, विक्रम पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे आणि वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कठोरपणे कारवाई करावी. अवैध शस्त्रे आणि गुटखा विक्रीलाही पायाबंद घालण्यासाठी मोहीमस्तरावर कारवाई करावी. काळ्या काचा लावलेल्या वाहनांवर जप्तीची कारवाई करावी. लहान अक्षरातील नंबर प्लेट लावलेल्या वाहनांवरदेखील दंडात्मक कारवाई करावी. जिल्ह्यात कोणताही अवैध व्यवसाय सुरु राहणार नाही याची दक्षता घ्यावी, शासनाचे पोलीस दलाला या कारवाईत पूर्णपणे सहकार्य राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि कायदा व सुव्यवस्थेचे वातावरण राखण्यासाठी अशी कारवाई गरजेची असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

# 'एआय' च्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर वकिलांनी या तंत्रज्ञानाशी जुळवून घ्यावं

## उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरसन यांचे मत

मुंबई : कृत्रिम बुद्धिमत्ता हे तंत्रज्ञान न्याय व्यवस्थेत क्रांती घडवू शकते आणि प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्यासाठी प्रभावी ठरू शकते, असे प्रतिपादन बॉम्बे उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरसन यांनी केले.

महाराष्ट्र राज्य बार कौन्सिलतर्फे आयोजित केलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेचा न्यायव्यवस्थेवर परिणाम या विषयावर प्रादेशिक वकिलांच्या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी मुख्य न्यायमूर्ती आलोक अराधे, तसेच न्यायमूर्ती एम. एस. सोनक, ए. एस. गडकरी आणि एम. एस. कर्णिकही उपस्थित होते. न्यायमूर्ती सुंदरसन म्हणाले, एआयचा वापर करून विविध प्रकरणांतील समान मुद्दे मशीनद्वारे सहज शोधता येऊ शकतात. उदाहरणार्थ, राष्ट्रीय महामार्गासाठी जमीन अधिग्रहणात झालेल्या गणनात त्रुटी असलेल्या प्रकरणांत समान निवारण देता येईल. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांच्या केसेस वेगाने निकाली काढता येतील. ते पुढे म्हणाले, कर कायद्याच्या अर्थ लावण्यासंदर्भातील याचिकांमध्ये



समान प्रश्न उद्भवतात, ते ओळखून AI च्या सहाय्याने एकत्र निर्णय घेता येऊ शकतो. मात्र, त्यांनी यावेळी इशारा देत सांगितले की, AI चे धोकेही आहेत. मानवतेचा न्यायासाठी आवश्यक असलेला समता भाव यंत्रांमध्ये नसतो, हेही लक्षात घेतलं पाहिजे. AI च्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर वकिलांनी या तंत्रज्ञानाशी जुळवून घ्यावं, असं आवाहनही त्यांनी केलं. न्यायप्रक्रियेच्या कार्यक्षमतेत वाढ घडवून आणण्यासाठी AI हे महत्त्वाचे साधन ठरू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## बोत्सवाना येथून ८ चित्ते भारतात आणणार

भोपाळ, १९ एप्रिल : दक्षिण आफ्रिकेच्या बोत्सवाना येथून ८ चित्ते भारतात आणले जाणार आहे. हे चित्ते २ टप्प्यात आणणार असून मे महिन्यात ४ चित्ते भारतात येतील अशी माहिती राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधीकरणाच्या (एनटीसीए) अधिकाऱ्यांनी दिली.

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या उपस्थितीत चित्ता प्रकल्प आढावा बैठकी घेण्यात आली. या बैठकीतील माहितीनुसार दक्षिण आफ्रिकेतील बोत्सवाना आणि केनिया येथून आणखी चित्ते भारतात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दोन टप्प्यांत ८ चित्ते भारतात आणले जातील. मे महिन्यापर्यंत बोत्सवाना येथून ४ चित्त्यांना भारतात आणण्याची योजना आहे.

# मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेंतगत हिंगोलीतून ८०० भाविक अयोध्येकडे रवाना

तभा वृत्तसेवा,

हिंगोली, दि. १९ एप्रिल मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेंतंगत आज हिंगोली जिल्ह्यातील ८०० भाविकांना घेऊन हिंगोली - अयोध्या (गाडी नंबर - ००७१९/००७२०) ही रेल्वे हिंगोल रेल्वेस्थानकावरून सकाळी ११ वाजता निघाली.

या रेल्वेला आमदार तान्हाजी मुटकुळे, आमदार संतोष बांगर, अपर जिल्हाधिकारी अनिल माचेवाड, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, समाज कल्याण विभाग (लातूर) चे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त यादव गायकवाड, जिल्हा समाज कल्याण अधिकारी राजू एडके यांनी हिरवा झेंडा दाखवला.

विविध रंगाच्या फुग्यांनी



सजवलेली श्री राम दर्शन अयोध्या धाम योजना ही रेल्वे 'जय श्री राम' या भाविकांच्या घोषणांनी मार्गस्थ झाली. या १४ डब्बे असेलल्या रेल्वेचे चालक दिनेश धोटे, संदीप कांबळे हे असून, विनय दखणे हे गार्ड आहेत.

शासनाने राज्यातील सर्वधर्मीय ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांची तीर्थक्षेत्रांना भेट देण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' सुरु केली आहे. या योजनेंतर्गत प्रति व्यक्ती ३० हजार रुपये इतके अनुदान प्रवास खर्चासाठी देण्यात येणार आहे.

'मुख्यमंत्री तीर्थदर्शन' योजनेमध्ये भारतातील ७३ व राज्यातील ६६ प्रमुख तीर्थक्षेत्राचा समावेश करण्यात आला आहे.

या योजनेंतर्गत निर्धारित तीर्थस्थळांपैकी एका स्थळाच्या यात्रेकरिता पात्र व्यक्तीला या योजनेचा एकवेळ लाभ घेता येणार आहे. प्रवास खर्चाची कमाल मर्यादा प्रति व्यक्ती ३० हजार रुपये इतकी राहील. यामध्ये प्रत्यक्ष प्रवास, भोजन, निवास इ.सर्व बाबींचा समावेश असणार आहे. या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात हिंगोली जिल्ह्यातील ८०० नागरिकांना आज उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडा दाखवून रेल्वेने अयोध्येला रवाना करण्यात आले आहे. या भाविकांसोबत एक वैद्यकीय अधिकाऱ्यांसह सात जणाचे आरोग्य पथक तसेच त्यांच्यासोबत २५ कर्मचाऱ्यांचे पथक पाठविण्यात आले आहे.

## बेटर हाफ

सोनाली ठेंगडी / ७७५५९३८८२२

# मर्यादेच्या सुरेख कोंदणातील नाते



असे म्हणतात की, एकदा तुम्ही सेलिब्रिटी झालात की तुमचे जीवन तुमचे राहत नाही. लोकांचं तुमच्या प्रत्येक हालचालीकडे लक्ष असतं. त्यामुळे सेलिब्रिटी असणं जितकं आकर्षक तितकंच ते जबाबदारीचं ठरतं. मात्र, काही सेलिब्रिटी ही जबाबदारी निष्ठेने सांभाळतात आणि स्वत:ची प्रतिमा जपतात. त्यासाठी त्यांच्या जीवनात नैतिकता सर्वोपरी असते. असेच एक सेलिबि'टी होते अभिनेता मनोज कुमार. आपल्याला ते अभिनेता म्हणूनच माहिती आहेत. पण प्रत्यक्षात ते उत्तम दिग्दर्शक, उत्तम लेखक आणि त्याही पलीकडे उत्तम व्यक्ती होते. सिनेसृष्टीतील हे उमदे व्यक्तिमत्व आता आपल्यात नसले तरी त्यांच्या कर्तृत्वाने ते अजरामर झाले आहेत.

मनोज कुमार सुप्रसिद्ध असले तरीही त्यांनी आपले खाजगी जीवन आपल्या घरापुरता आणि स्वत:पुरता मर्यादित ठेवले. त्यांचे चित्रपट जगतातील वावरणेदेखील इतके पारदर्शक आणि स्वच्छ होते की, संपूर्ण हयातीत कधीही कोणत्याही अभिनेत्रीसोबत त्यांच्या प्रेमप्रकरणाची चर्चा झाली नाही. मनोज कुमार आणि त्यांच्या पत्नी शशी गोस्वामी यांची प्रेमकथा अतिशय रंजक आणि तितकीच साधी आहे. एकदा शशी त्यांच्या जीवनात आल्यानंतर त्यांनी एकनिष्ठ राहून नाते निभावले.

मनोज कुमार यांच्या जीवनातील चढ-उतारात त्यांच्या माता-पित्यांच्या नंतर पत्नी शशी यांनी भक्कम साथ दिली. या जीवनसाथीशी पहिली नजरानजर एका मित्राकडे झाली होती. कॉलेजमध्ये असताना मनोज कुमार मित्राकडे अभ्यासासाठी जायचे. जुन्या दिल्लीत राहणाऱ्या या मित्राकडेच मनोज कुमार यांनी पहिल्यांदा शशी यांना पाहिले.

या नजरभेटीविषयी स्वत: मनोज कुमार म्हणाले, देवाशपथ, मी कधीही आयुष्यात कोणत्याही मुलीकडे वाईट नजरेने किंवा एकटक सुद्धा पाहिले नाही. मात्र, शशीच्या चेहऱ्यात अशी काही जादू होती की मी तिच्या चेहऱ्यावर नजर हटवू शकलोच नाही.

असे असले तरी मनोज कुमार यांनी आपली मर्यादा सोडली नाही. तब्बल दीड वर्षे दोघे फक्त एकमेकांकडे पाहायचे, तेही अगदी लांबून. दोघांनाही एकमेकांशी बोलण्याची हिंमत होत नव्हती. हे असे प्रेम होते जे लाजण्यातून हळुहळू बहरत जाणारे होते. जसजसा काळ लोटत गेला तसे हे नाते आणखी मजबूत होत गेले. दोघांनीही भेटीगाठी सुरू ठेवल्या. मात्र, लग्न दोन्ही कुटुंबाच्या मर्जीनेच झाले.

त्यांचे लग्नही एखाद्या सुपरस्टारचे लग्न नव्हते आणि मीडियालाही यापासून दूरच ठेवले होते. अतिशय शांतपणे आणि साधेपणाने त्यांचे लग्न झाले. एवढेच काय तर शशी गोस्वामी कायमच लाईम लाईटपासून दूरच राहिल्या. मात्र, त्या मनोज कुमार यांच्या पाठिशी खंबीरपणे उभ्या होत्या. त्यांना करण आणि कुणाल अशी दोन मुले आहेत.



### देशभक्तीची अजोड प्रतिमा

मनोज कुमार यांच्यात भक्ती आणि देशभक्ती दोन्हींही भावना अतिशय प्रखर होत्या. दोन्ही भावनांसाठी ते पूर्ण समर्पित राहिले. त्यांच्या या दोन्ही भावनांना पत्नी शशी यांनी नेहमीच मान दिला. मनोज कुमार शिर्डीचे साईबाबा यांना आपले आराध्य मानायचे. साईबाबांवरील चित्रपटातही त्यांनी स्वत: काम केले. त्याच्या जोडीला त्यांची देशभक्तीची अजोड होती. देशावरील चित्रपट त्यांनी काढले आणि ते प्रचंड लोकप्रियदेखील झाले. त्यांच्याविषयी विशेष सांगायची बाब म्हणजे, त्यांना 'शहीद' चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. भगतसिंगांवर आधारित हा चित्रपट होता. मनोज कुमार यांनी राष्ट्रीय पुरस्कारात जिंकलेली सर्व रक्कम भगतसिंगांच्या कुटुंबीयांना देऊन आपली कृतज्ञता व्यक्त केली होती. असे एखाद्या कलाकाराने करणे हे उदाहरण अतिशय दुर्मिळ आहे. देशभक्तीसाठी ओळखले जात असूनही त्यांना इतर चित्रपटांमध्येही भरपूर काम मिळायचे. ते एका प्रतिमेत अडकले नाहीत. हिरो म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय उमदे होते. त्यामुळे त्या काळातील निर्माता, दिग्दर्शकांसाठी हिरो म्हणून पहिला पर्याय ते राहिले. हिरो म्हणून काम केले तरी त्यांनी कालांतराने आपल्या हिरोईनला स्पर्श न करण्याचे धोरण स्वीकारले. हे धोरण त्यांच्या करिअरसाठी धोक्याचे असले तरीही त्यांनी ते कसोशीने पाळले. हातभर अंतर ठेवूनच ते चित्रीकरण करायचे. नंतर त्या दृश्यात एडिटिंगद्वारे दोघांना जवळ आणले जायचे. आजच्या कलाकारांसाठी हे एक आदर्श उदाहरण ठरावे. अर्थात, यातून त्यांची पत्नीविषयीची एकनिष्ठताही दिसून येते. मनोज कुमार यांनी आपल्या पत्नीला कायमच आपल्या जीवनाचा सर्वात महत्त्वाचा भाग मानले. त्यांची प्रेमकहाणी परस्पर सामंजस्य आणि सन्मानाने परिपूर्ण राहिली. इतक्या अभिनेत्रींसोबत काम करूनही कधीच मनोज कुमारांचे नाव कोणत्याही अभिनेत्रीसोबत जोडले गेले नाही. कोणत्याही वादात ते अडकले नाही. सिनेसृष्टीत सर्वांशी संबंध असूनही त्यांचे जीवन अतिशय स्वच्छ, सुंदर आणि पारदर्शक राहिले. जसे चित्रपटात ते निष्कलंक हिरो म्हणून वावरले तसेच ते आपले संपूर्ण जीवन जगले. फार थोड्या लोकांच्या वाट्याला असं निष्कलंक आयुष्य येतं. अत्यंत आदर्श आयुष्य जगण्याकडे त्यांचा कल होता आणि समाजही असाच असावा, या उद्देशाने ते स्वच्छ, सुंदर आणि मूल्याधारित चित्रपट बनवायचे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला त्यांच्याच एका गाण्यातील ओळी समर्पक आहेत.....

***मै बसाना चाहता हूँ स्वर्ग धरती पर***
***आदमी जिसमें रहे बस आदमी बनकर***
***उस नगर की हर गली तैय्यार करता हूँ***
***आदमी हूँ आदमी से प्यार करता हूँ....***

## रानभाज्यांच्या जगात

संगीता ठलाल/७८२१८१६४८५

# पोषक मोमनारू!

नैसर्गिक वातावरणात वाढलेल्या वनस्पती अलिकडे फार कमी प्रमाणात दिसतात. या पालेभाज्या, फळं खाण्यापेक्षा लोक बंद पाकीटातील व उघड्यावरचे मसालेदार खाद्यपदार्थ चवीने खातात. त्याचे परिणाम लगेच दिसत नसले तरी, दीर्घकालीन परिणाम मानवी देहावर नक्कीच दिसतात. खऱ्या अर्थाने आरोग्य बिघडत चालले आहे. तरीही जीभेवर संयम नसल्यामुळे ते पदार्थ खाण्याचा मोह कमी होत नाही.

असंच एक अस्सल गावरान कंद आहे ज्याला त्याला फळंसुद्धा येतात. चला तर या कंदमुळांविषयी थोडक्यात जाणून घेऊ या. शरीराला अतिशय पोषक असणारं कंद आहे. या कंदाला झाडीबोलीत मोमनारू म्हणतात. या कंदाची फळं खूप टिकाऊ असतात आणि वर्षभर जसेच्या तसे असतात. या कंदाची लागवड घरीच करतात. मृग नक्षत्राचा पाऊस पडल्यावर आपोआप या फळांना कोंब येतात आणि मग घराच्या अंगणात किंवा मोकळी जागा बघून एक इंच खोल खड्डा खणून लागवड केली जाते. एकदा या फळाची लागवड केली की, तीन किंवा पाच वर्षे लागवड करावी लागत नाही. या कंदाचा वेल चांगला उंच जातो म्हणून त्या वेलाला आधार देण्यासाठी सुकलेल्या बांबूची काठी लावतात. त्या वेलाला फुलं येत नाही सोबतच, त्याची वाढ होण्यासाठी कोणत्याही कीटकनाशकांची फवारणी केली जात नाही आणि खतपाणीसुद्धा दिले जात नाही. निसर्गाच्या सान्निध्यात हे मोमनारू वाढतात. त्याची वेल खूप नाजूक असते आणि लालसर हिरवट रंगाची आणि पानं हृदयाच्या आकाराची, लांबट असतात.

ऑगस्ट महिन्यात या वेलाला फळं यायला सुरूवात होते. पण, एक विशेष आहे की, या फळांचे आकार इतर फळांपेक्षा वेगळा असतात. काही फळं लांब असतात तर काही गोल असतात. त्यांचा रंग काळसर असून, त्या फळांवर बारीक ठिपके असतात. ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात हे मोमनारू नावाची फळं वाळतात आणि त्यांना हातानेच तोडतात. यात एक विशेष असं की, ते फळं चुलीत भाजून खाल्ल्यास ते अजून चविष्ट वाटतात. तसेच, उकडून खाल्ल्याने भूक मिटते. शरीराला मजबूत करण्यासाठी ते मदत करतात आणि पोषक ठरतात. या मोमनारू कंदमुळाला तीन किंवा पाच वर्षांनी खोदून घेतात. तेव्हा लांब आणि जाड असे कंद टोपलंभर निघतात. गावखेड्यातील काही महिला या कंदांना उकडून त्याचे छोटे तुकडे करून आठवडी बाजारात विकतात. हा मोमनारू आणि त्याची फळं कोणत्याही वयातील माणसं खाऊ शकतात. लहान मुलांना हे कंद आवर्जून खाऊ घालावे, असं जाणकारांचा सल्ला आहे. या मोमनारूपासून कोणतेही पदार्थ बनविले जात नाही. फक्त उकडून किंवा भाजून खातात. या कंदांना किंवा



फळांना उकडून घेताना, थोडे मीठ घालून उकडले जाते. त्यामुळे, चांगली चव येते उकडल्यावर किंवा भाजून झाल्यावर, त्याचं वरचं साल काढून खातात. निसर्गाची विशेष देणगी असलेलं हे अस्सल गावरान मोमनारू आणि त्याची फळं आरोग्याला सुदृढ बनविण्यासाठी मदत करते.

**अँटोनीने ब्रूटसच्या कृत्याचं समर्थन न करता, सीझरच्या चांगुलपणावर भर दिला. त्याचं माणूसपण, त्याच्या कृत्यांमागचं प्रेम आणि त्याच्या मृत्यूचं क्रौर्य अधोरेखित करत, त्याने जनमत पूर्णपणे उलटलं. ब्रूटसचा हेतू काय होता? हे विसरून, लोकांनी त्याच्या कृतीला फक्त विश्वासघात म्हणून पाहायला सुरुवात केली. हे दाखवतं की, इतिहास जसा घडतो तसा समोर येत नाही तर तो जसा मांडला जातो तसा समोर येतो.**

तो क्षण मन सुन्न करणारा होता. कर्ण रणभूमीवर एकटा उभा होता. रथाची चाकं मातीत रुतलेली होती. समोर अर्जुन होता. कर्णाच्या धनुष्यबाणाला विस्मरण आलं होतं. परशुरामांनी दिलेला शाप खरी वेळ आल्यावर अंमलात आला होता. त्याने कृष्णाकडे न्याय मागितला आणि म्हणाला,'माझं रथाचं चाक रुतलंय. नियमांनुसार युद्ध थांबवलं पाहिजे.' पण, समोर उभ्या असलेल्या कृष्णाने त्याच्याकडे थंड नजरेनं पाहिलं आणि अर्जुनाला आदेश दिला,'बाण सोड!'

कर्ण मृत्यू पावला पण, त्या क्षणात फक्त एक योद्धा मेला नाही. तर त्या क्षणी संपूर्ण एक विचारप्रक्रिया, एक समांतर सत्य, एक हळवी बाजूही थांबली.

# कोण म्हणतंय?

वैष्णवी घरोटे/८९२८३२२७९६

इतिहासाची ही गोष्ट आपण सतत ऐकतो पण, आपण ती कशी ऐकतो हे त्याहून महत्त्वाचं आहे. कर्णाला आपण एक महान योद्धा, अपमान सहन करणारा, निष्ठावान मित्र आणि दानशूर पुरुष म्हणून ओळखतो. कर्णाला समाजानं नाकारलं, त्याच्या गुणांचं मूल्यमापन जन्मावर केलं पण, तरीही तो लढत राहिला. आजपर्यंत आपण कर्णाच्या कहाणीला सहानुभूतीच्या नजरेनं पाहिलं आहे आणि त्यातली एक महत्त्वाची भूमिका 'रश्मिरथी' किंवा 'मृत्युंजय' सारख्या साहित्याने पार पाडली आहे ज्यामुळे, कर्णासाठी समाजाच्या मनात एक हळवा कोपरा तयार झाला आहे.

या साहित्यातून कर्णाच्या दु:खद बाजूला इतक्या प्रभावी पद्धतीने उभं केलं गेलं की, आपण कधी त्याच्या दोषांकडे पाहिलंच नाही. सभेत द्रौपदीचा अपमान होत असताना त्याचं मौन, अभिमन्यूच्या मृत्यूमध्ये त्याचा सामील होणं या गोष्टींवर फारसा प्रकाश टाकला जात नाही कारण कथा सांगणाऱ्याने त्याचं रूप त्या विशेष कोनातून उभं केलं आहे.

हे केवळ एक पात्र किंवा एक कथा नाही. हा एक दृष्टिकोन आहे आणि तो दृष्टिकोन आपल्यावर परिणाम करत राहतो. हाच प्रकार शेक्सपियरच्या 'ज्युलियस सीझर'मध्येही दिसतो. ब्रूटस्‌ने आपल्या सर्वात जवळच्या मित्राचा सीझरचा वध लोकशाहीच्या रक्षणासाठी केल्याचं जनतेसमोर सादर केलं. सुरुवातीला त्याचं भाषण लोकांनी समजून घेतलं. पण, मग अँटोनीने अंत्यसंस्कारात केलेलं भाषण 'फ्रेंड्स, रोमन्स, कंट्रीमेन लेंड मी युअर इयर्स' लोकांच्या मनात परिवर्तन घडवून आणतं.

अँटोनीने ब्रूटसच्या कृत्याचं समर्थन न करता, सीझरच्या चांगुलपणावर भर दिला. त्याचं माणूसपण, त्याच्या कृत्यांमागचं प्रेम आणि त्याच्या मृत्यूचं क्रौर्य अधोरेखित करत, त्याने जनमत पूर्णपणे उलटलं. ब्रूटसचा हेतू काय होता? हे विसरून, लोकांनी त्याच्या कृतीला फक्त विश्वासघात म्हणून पाहायला सुरुवात केली. हे दाखवतं की, इतिहास जसा घडतो तसा समोर येत नाही तर तो जसा मांडला जातो तसा समोर येतो.

इतिहास म्हणजे केवळ घडलेली घटना नाही तर तो म्हणजे सांगितलेली गोष्ट आहे. ती गोष्ट कोण सांगतो, कशी सांगतो, कुठली बाजू अधोरेखित करतो यावर आपलं मत, विश्वास आणि सहानुभूती ठरते. कधी काळी ही कथा काव्य, ग्रंथ, नाटकं यापुरती सीमित होती. पण आज, सोशल मीडिया ही नव्या युगाची व्यासपीठं ही कथा सांगणाऱ्यांची नवीन शस्त्रं बनली आहेत आणि त्यातून केवळ पात्रांचंच नव्हे, तर संपूर्ण मानवतेचं मत घडवलं जातंय. आजही, जर एखाद्या व्यक्तीबद्दल सतत एक विशिष्ट प्रकारचं चित्रण होत असेल, त्याचे व्हिडीओ, त्याच्यावरच्या पोस्ट, त्याच्या बाजूने मांडलेले विचार हे सारं जर सातत्याने आपल्या नजरेसमोर आलं तर, आपण नकळत त्याच विचारसरणीचा भाग बनतो.

आपली मतं हे आपलं वैयक्तिक चिंतन आहे, असा आपला समज असतो. पण सत्य असं आहे की, आपली मतं बऱ्याच वेळा आपल्यावर लादलेली असतात. फक्त त्या लादणीचं स्वरूप सौम्य, आकर्षक आणि पुन्हा पुन्हा समोर येणारं असतं.



या प्रक्रियेला 'नॅरेटिव्ह शिफ्ट' असं म्हटलं जातं. म्हणजेच, गोष्ट तीच राहते पण, तिचा सूर बदलतो. त्या सुराच्या बदलानेच, आपला विचार, भावना आणि निर्णय यांचं रूपही बदलतं. जेव्हा आपण इतिहासाकडे पाहतो तेव्हा तो फक्त घडलेला घटनाक्रम नसतो. तर, तो एखाद्याने आपल्या विचारांनुसार रचलेला आरसा असतो. त्यात काही ठळक भाग प्रकाशझोतात असतात तर, काही गोष्टी सावलीत टाकलेल्या असतात.

आपण ज्या गोष्टी ऐकतो, वाचतो, शेअर करतो, त्या सर्वच गोष्टी केवळ माहिती देत नाहीत, त्या आपला दृष्टिकोन घडवतात. एकच गोष्ट वेगवेगळ्या पद्धतीनं सांगितली गेली की, तिचा परिणामही वेगवेगळा होतो. इतिहासातील पात्रांचं मूल्यांकन करताना, केवळ सांगितलेली गोष्ट नव्हे तर, न सांगितलेली गोष्टी बघायला हवी. सोशल मीडियावर हे अधिक तीव्रतेने जाणवतं कारण, तिथे कोणतंही मत क्षणात 'ट्रेंड' बनतं आणि तेच मत हजारोंना प्रभावित करतं. एकच विचार वारंवार डोळ्यासमोर आला की, तोच 'सत्य' वाटू लागतो.

म्हणूनच, आपल्या विचारप्रक्रियेवर कोणाचा प्रभाव आहे? हे ओळखणं अत्यावश्यक आहे. आपण ज्या गोष्टी खऱ्या मानतो, त्या खऱ्याच आहेत का? की त्या कुणाच्या प्रभावाने आपल्याला खऱ्या वाटतात? हे विचारणं गरजेचं आहे.

इतिहास फक्त काळाच्या पाटीवर लिहिलेला नसतो, तो वर्तमानाच्या शाईने रंगवलेला असतो. पिढ्यान्‌पिढ्या, कधी महाभारताच्या गोष्टींमधून तर कधी शेक्सपियरच्या नाटकांतून आणि आता सोशल मीडियाच्या पोस्टस्‌मधून आपली विचारसरणी घडते. आणि म्हणूनच, जेव्हा आपण एखाद्या गोष्टीचा स्वीकार करतो, एखादं मत उचलतो, तेव्हा हे लक्षात ठेवायला हवं,'कोण म्हणतंय?'

कारण, मत हे तुमचं असलं पाहिजे. कुणाचं सांगितलेलं नव्हे तर, तुमच्या विचारातून उमललेलं!

## आठवणींच्या पारावर

मो. बा. देशपांडे/८३२९१९३५४२

# डॉक्टर, मला कसंतरी होतंय!



डॉक्टर मला कसंतरी होतंय...अशी तक्रार घेऊन अनेक पेशंट कपाळावर आठी घेऊन येतात, असं आमचे एक डॉक्टर मित्र खाजगीत सांगत होते.

'तर मग तुम्ही काय करता यावर?'

'कसंतरी होतंय ना ? तर मग तुम्ही काहीतरी घ्या !' असं मी त्यांना हसत सांगतो.

हल्ली कसंतरी होतंय, बेचैन वाटतंय, अनामिक भीती सतावतेय, चिंतेचा किडा आतून पोखरतोय, काही सुचत नाही, विस्मरण फार झालंय, छातीवर उगाच दडपण येतंय, पकड सैल झालीय त्यामुळे हातातून वस्तू पडतात, किचकट बारीक काम नको वाटतेय, फॉर्म वगैरे भरायचा जाम कंटाळा येतो. एक ना दोन...खरं तर असल्या अनेक समस्या या मनोशारीरिक स्वरूपाच्या असतात. याअर्थी, रुग्णालयातील दहापैकी सहा बेडवरील पेशंट हे खरे असून, बाकी सायकोसोमॅटिक असतात, असं एक सर्वेक्षण आहे.

मन:स्थिती बिघडली की, दबलेल्या विविध लक्षणांनी उचल खाल्लीच म्हणून समजा. अपेक्षा आकांक्षा फार वाढीव असल्या की, थोड्याथोडक्या कारणाने नाराजी होणे अटळ! मग मन अस्वस्थ तर शरीरावर त्याचे दुष्परिणाम दिसणार आणि तुम्ही डॉक्टरकडे धाव घेणार! आता मला सांगा, डॉक्टर तरी काय करणार?

सुख दिसतंय पण, मनात झिरपत नाही. सगळं चांगलं असूनही, हुरहूर काही पाठ सोडत नाही. काहीही धोका समोर प्रत्यक्ष नसताना असुरक्षित का वाटते? दिवसभर कामे झालीत तरी, रात्री बिछान्यावर पडल्यावर खूप वेळ झोप का लागत नाही? कशातही मन एकाग्र होत नाही म्हणून गोंधळ उडतो, काही सुचत नाही अशी अवस्था होते. पुस्तक समोर ठेवलंय पण, उघडून वाचायची इच्छा काही होत नाही. गर्दी गोंधळ इतकंच काय फ्रीजचा आवाज आणि झिरो पावरच्या बल्बचा प्रकाशही अजिब्बात सहन होत नाही.

आताशा अशा तक्रारींवर मानसोपचार तज्ज्ञ आहेत. पण, मुळात मनाला विरंगुळा हवा, भावनिक गुंतवणूक आणि त्यावर परतावा वेळीच योग्य रीतीने मिळायला हवा. बोलायला सोबती आणि खेळायला सवंगडी हवेत. मन मोकळं करायला जागा हवी, यासाठी समवयस्कांची सोबत हवी. विचारांची वेव्हलेंग्थ जुळेल, अशी मैत्री हवी. मनातलं गुज जाणणारी व्यक्ती हवी. तरच, चित्ताला समाधान आणि शरीराला आराम, डोक्याला शांती मिळेल आणि पर्यायाने सुरक्षिततेची भावना निर्माण होईल. पण, हे सर्व डॉक्टर कसं सांगेल?

फोन आहे पण, संवाद नाही अशी स्थिती होतेय. यावर उपाय काय? संवाद विहिनतेची ही वाळवी मनाला त्रस्त करून सोडते. कुणाशी प्रांजळपणे बोलणे सुरू करण्यास मन धजावत नाही. एकदा समोरून बोलणे सुरू झालं की, मग मात्र मुखातून सरस्वती नदीचा धबधबा वाहू लागतो. यासाठी ढीगभर औषधे, टॉनिक, व्हिटामीनच्या गोळ्या, एनर्जी कॅप्सूल काय कामाच्या? मॉलमधील वस्तूंनी आपले स्थान बदलले की खुश म्हणजे, मॉलच्या रॅकमधून काजू, किसमिस, पिस्ता, सीडलेस खजूर वगैरे ते आपल्या घरच्या रॅकमध्ये स्थानापन्न झाले, इतकंच! पण, ते सुख क्षणभंगुर ठरले. अधिक सामान म्हणजे अधिक व्याप! अधिक गरजा म्हणजे अधिक जबाबदाऱ्या! मग स्वामित्वाची भावना आणि सांभाळण्याचे उत्तरदायित्व वाढून, त्यात मन गुंतल्याने स्वाभाविक मोकळीक मिळत नाही, स्वतंत्र वृत्तीने जगता येत नाही. हा अनुभव वरचेवर येतोय तरी माणूस वस्तूंच्या मोहात का पडतो? आपण उगाच घोर कलियुग म्हणून ओरड करतो आणि कल्पनेतील सत्ययुगाची भलामण करतो. सत्ययुग कुणी पाहिलंय? खरं सांगायचं तर, आता सत्ययुग सुरू आहे. पूर्वी पाणी लांबून घागरीत आणावे लागे. आता नळाची तोटी फिरवायची देर की, घ्या पाण्याची धार! पूर्वी लाकडं फोडून चुलीसाठी सरपण करावं लागे. पण, आता गॅसचे बटन फिरवलं की, छान निळीशार ज्वाला दिसू लागते. दगडी पाटा-वरवंट्यावर तासभर वाटण-घाटण करावे लागायचे आता सोयीचे मिक्सर, क्षणात बारीक पूड तयार होते. गुगलवर कोणत्याही रेसिपीचा व्हिडीओ सज्ज असतो. फोन करताच डेलीव्हरी बॉय अवतीर्ण होतो. सगळी कामं चुटकीसरशी होणार तर शरीरासाठी जीम जॉईन करावी लागणार. पण मनासाठी काय? मनाच्या पोकळीत तो शैतान, थैमान घालू लागतो तेव्हा, डॉक्टर मला कसंतरी होतंय?डॉक्टर, मी काय खाऊ? असले प्रश्न विचारण्यात येतात.

बाथरूम टॉयलेट आता घरात आहे. पूर्वी रात्री अंधारात परसदारी जावं लागायचं. लहान बालके आणि स्त्रिया सुरक्षित सन्मानानं जगू शकतात, कायदा आणि सुव्यवस्था असल्याने जो प्रामाणिक आणि हुशार आहे, त्याला त्याच्या लायकीनुसार सुखाने जगता येते. बदमाश आणि कामचुकार लोकांचे फारसे चालत नाही. दळणवळण द्रुतगतीनं वाढलं आणि तुटवडा नामशेष झाला. लोकांनी महागड्या कार घेतल्या आणि रस्तेसुद्धा छान झालेत. ठेकेदारीने बेरोजगारीची समस्या वेगळ्या अर्थानं का होईना पण, बहुतांश मिटली. वाढत्या गर्दीत लोकल आणि ट्रेनमधून जाताना अस्पृश्यता हटली. आता लग्नात बफे जेवण कोण बनवतो, हॉटेलात वेटर कोण हा प्रश्न पडत नाही इतपत प्रगती झालीय.

पण, मनावर व्हायचा तो परिणाम होतोच आणि निरनिराळ्या मानसिक समस्या उद्भवत आहेत. राग आला की, पारा चढतो, मग बिपी वाढतो, एंग्झाईटी सतावते, यावर उपाय म्हणून आता डोके २७ अंशांवर ठेवता येईल का? इतकाच प्रश्न शिल्लक आहे. काय पण भन्नाट आयडीया!

हवामानाच्या बदलाने होणारे आजार शरीराच्या आत बसलेला, डॉक्टर न बोलता ठीक करतो. याअर्थी जे आजार निसर्गत: बरे होणारे असतात त्यांनाच बाहेरची औषधं त्वरित लागू पडतात. आपले अनेक आजार-व्याधी या विशिष्ट मानसिक परिस्थितीत उमळतात. मनातलं बाहेर न बोलणारे, आतल्या गाठीचे, उगाच ईर्ष्या करणारे, जळजळणारे, मत्सरग्रस्त अशी विविध मानसिक स्वभाव विविध आजारांना जन्म देत असतात. विशिष्ट मानसिक स्थिती याला कारणीभूत ठरतं, असं वैद्यकशास्त्र म्हणते.

वाढत्या वयात आनंदाचा पाठपुरावा प्रयत्नपूर्वक करावा लागतो. ही प्राधान्याची बाब आहे. मेंदूतील हॅपी हार्मोन्स स्त्रवावे यासाठी बाहेरून हॅपी होणं गरजेचं असतं. कोण कशाने आनंदी होतो? ही व्यक्तिगत बाब आहे. पण, कशानेही चटकन आनंदी होणारे लोक भाग्यवान! कुणाला टीव्ही बघताना, चॅनेल बदलताना अत्युच्च आनंद मिळतो. कुणाला अंघोळ करण्याच्या नुसत्या कल्पनेनंही अत्युच्च आनंदाचा प्रत्यय येतो. कुणाला अमुक वारी मॉलमध्ये डिस्काउंट मिळणार, याचाच आनंद इतका की अहोरात्र त्या आनंदाची शिरशिरी टिकून राहते. दिवसभर लोळत मोबाईल रील्स बघत राहणे यात, असीम आनंदाचा साक्षात्कार होतो. चुगली चहाडी आणि नसत्या चौकशा करण्याच्या आनंदाला तर काही धरबंद नसतो. सकाळचा चहाचा कप विथ पेपर, चढाओढीच्या बातम्या ऐकणं, सिरीअल्स फॉलो करणे, असे कणभर आनंद 'थेंबे थेंबे तळे साचे' या धर्तीचे असतात. आमचा एक आनंदी मित्र ज्योतिषाकडे गेला. ज्योतिषी हात बघून सांगू लागला. यावर्षी, हाताला बराच खर्च आहे बुवा

म्हणजे अगोदर कमाई पण, तशीच होणार तर! मित्र आनंदाने म्हणाला.

खरं तर संघर्षात आणि कठोर परिश्रमात आनंद लपलेला असतो.

लोकांच्या आनंदाच्या काय काय व्याख्या असतात बघा. मोक्यावर प्लॉट मिळाला तर मी आनंदी, धनत्रयोदशीला सोने घेतलं तर मी आनंदी, अमुक म्युच्युअल फंड गुंतवणूक झाली तर मी आनंदी, कार आणि सुखसाधने आली तर मी आनंदी, मुलांचे करिअर घडले तर मी आनंदी, सेन्सेक्स निफ्टीची उसळी आणि अधोगतीसुद्धा आनंदाचा आलेख वरखाली करते.

आनंदासाठी जन्म आपुला, ही उक्ती सार्थ करत राहावी बस्स! सुखान्वेषण ही यच्चयावत जीवसृष्टीची नैसर्गिक मूळ प्रवृत्ती आहे आणि यात काहीच चुकीचं काहीच नाही. जीवनाच्या क्षणांमधून कणाकणाने सुखानुभूतीसाठी चाललेला हा सनातन धडपडाट स्तिमित करून सोडणारा आहे. माणसाला दहा सुखं हात जोडून उभी आहेत पण, एक दु:ख असलं तरी मन ठणकत रहातं. त्या आनंदावर दु:ख बोजड का होतं? येथेच अनीती आणि अशांततेची बीजे रुजलेली आढळतात.

इतरांचा आनंद वाटून घेतला तर तो द्विगुणित होईल आणि दु:ख वाटून घेतलं तर ते अर्धे होईल. आरोग्य हा एक नंबरचा कळीचा मुद्दा आहे. पैसा योगाने येतो आणि भोगाने जातो. या अर्थी योग आणि भोग यांचा लपंडाव हेच जीवन! शिवाशिवीचा हा खेळ आयुष्यभर सुरू असतो. आनंदाचा पाठपुरावा काही संपत नसतो. यातून दमछाक झाली तर पुन्हा प्रश्न विचारण्यात येतो. डॉक्टर, मला कसंतरी का होतंय?

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

॥ उसंतवाणी ॥

१४८५

मर्यादेचे करू । पाही उल्लंघन ।
'सुप्रीम' हनन । चौकटीचे ॥१॥

राष्ट्रपतीलाही । शिकवी कायदा ।
वेळेची मर्यादा । पाळा म्हणे ॥२॥

सार्वभौम आहे । संसद आपली ।
यांची का तापली । डोकी ऐशी ॥३॥

मशिदीची नाही । म्हणती रजिस्ट्री ।
रामाची का हिस्ट्री । विचारती? ॥४॥

कुणाच्या घरात । पैसा झाला धूर ।
स्वतःतच चूर । जमात ही ॥५॥

यांना नेमण्याची । पद्धत कोणती ।
कशात गणती । करावी ही? ॥६॥

चूक दिशेला हे । झुकले पारडे ।
तर्काने कोरडे । कांत म्हणे ॥७॥



व्यंगचित्र: मनोज कुटील

श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
१९ एप्रिल २०२५

## एक साथ, एक बंधन: १९ जोडप्यांचा प्रेमळ सामूहिक विवाह सोहळा!

### जायंट्स ग्रुप ऑफ छत्रपती संभाजीनगर पायोनियर्सचा उपक्रम

छत्रपती संभाजीनगर: कलाग्राम येथे एक अद्भुत आणि हृदयस्पर्शी सोहळा पार पडला. जायंट्स ग्रुप ऑफ छत्रपती संभाजीनगर पायोनियर्सने आयोजित केलेल्या सामूहिक विवाह सोहळ्यात १९ जोडप्यांनी एकमेकांच्या साथीने त्यांच्या नवीन जीवनाची स्वप्ने रंगवली. या मंगलमय सोहळ्याने केवळ दोन जीवांनाच नव्हे, तर उपस्थित प्रत्येकाला प्रेम आणि एकतेच्या धाग्यात बांधले.

अध्यक्षा शीतल अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रकल्पप्रमुख प्रविण सोमाणी व सौ. पल्लवी मालाणी यांच्या कुशल संयोजनातून साकारलेला हा विवाह सोहळा म्हणजे केवळ एक विधी नव्हता, तर भावनांचा सागर होता. नववधू आणि वर जेव्हा हातात हात घेऊन विवाह मंडपात आले, तेव्हा उपस्थितांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. त्यांच्या चेहऱ्यावरील नविन आयुष्याची उत्सुकता आणि एकमेकांवरील प्रेम स्पष्ट दिसत होते. या भव्य सामूहिक विवाह समारोहाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक म्हणून विनोद अग्रवाल यांनी परिश्रम घेतले.

या सामाजिक बांधिलकीच्या सुंदर उपक्रमात, जायंट्स ग्रुपने नवदांपत्यांना त्यांच्या संसाराची सुरुवात करण्यासाठी उदार हस्ते मदत केली. प्रत्येक जोडप्याला



तब्बल ५५,००० रुपयांच्या संसारोपयोगी वस्तू भेट देण्यात आल्या. यामध्ये पारंपरिक वधू-वरांचे वस्त्र, सोन्याचे मंगळसूत्र , चांदीचे पैंजन व जोडवी , यांसारख्या महत्वाच्या दागिन्यांसोबतच संसारोपयोगी भांडी, कपाट आणि आरामदायक बेडचाही समावेश होता. ही मदत केवळ वस्तू नव्हती, तर नविन जोडप्यांना त्यांच्या स्वप्नांना बळ देणारी एक प्रेमळ भेट होती. या अनमोल भेटीमुळे नववधू आणि वरांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आनंद पाहून आयोजकांचेही मन भरून आले.

या सोहळ्याला छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री आणि सामाजिक न्यायमंत्री मा. संजय जी शिरसाट यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून वधु वरांना शुभार्शीवाद दिल . त्यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात अशा सामाजिक उपक्रमांचे महत्व सांगितले आणि या सामूहिक विवाहामुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते, असे गौरवोद्गार काढले. त्यांची उपस्थिती नवविवाहित जोडप्यांसाठी आणि आयोजकांसाठी एक मोठा आशीर्वाद ठरली.

शिव महापुराण कथाकार पंडित राघवजी प्रदीपजी मिश्रा यांच्यासारख्या सन्माननीय महाराजांच्या पवित्र उपस्थितीने कार्यक्रमाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली. त्यांचे आशीर्वचन उपस्थितांना नवी दिशा देणारे ठरले.

भाईश्री फाउंडेशनचे सचिव डॉ . मकरंद देशपांडे यांनी विशेष अतिथी म्हणून आपली महत्त्वपूर्ण उपस्थिती दर्शवली. त्यांचे सहकार्य या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी मोलाचे ठरले.


या मंगल कार्याला जायंट्स वेल्फेअर फाउंडेशनच्या डउच् सूर्यमालाजी मालाणी, अग्रवाल समाज मंडळाचे अध्यक्ष कुंजबिहारी अग्रवाल आणि अग्रसेन भवन समितीचे अध्यक्ष राजकुमार अग्रवाल यांच्या उपस्थितिने अधिक शोभा आली.

हा सामूहिक विवाह सोहळा या १९ जोडप्यांच्या जीवनातील केवळ एक अविस्मरणीय क्षण नव्हता, तर तो सामाजिक एकतेचा आणि समरसतेचा एक ज्वलंत संदेश होता. ज्या दात्यांनी कन्यादान केले, जायंट्स च्या सर्व सदस्यांनी मागील २ महिन्यांपासून अगदी स्वतः च्या घरचा लग्न सोहळा असल्याप्रमाणे अहोरात्र मेहनत घेवून धूमधडाक्यात लग्न पार पाडले . ज्या स्वयंसेवकांनी तन-मन-धनाने मदत केली आणि ज्या आयोजकांनी ही जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली, त्या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे हा सोहळा यशस्वी झाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ सरिता मालाणी आणि सौ आरती देशमुख यांनी केले . तसेच आभार प्रदर्शन सचिव सौ आरती सोनी आणि सौ स्वप्ना वळसेकर यांनी केले .

वधू-वरांच्या कुटुंबीयांनी जेव्हा आयोजकांचे आभार मानले, तेव्हा त्यांच्या डोळ्यात कृतज्ञतेचे आणि आनंदाचे अश्रू होते. जायंट्स ग्रुप ऑफ पायोनियर्सने या उदात्त उपक्रमातून समाजाला एक प्रेरणादायी आदर्श घालून दिला आहे. हा सोहळा छत्रपती संभाजीनगरच्या सामाजिक इतिहासात नेहमीच सोनेरी अक्षरांनी नोंदवला जाईल.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (९५) पॉवर हाऊस

संघ ही एक स्वाभाविक संघटित बलशाली समाज उभा करण्याची एक प्रक्रिया आहे. संघ करणार काहीही नाही, पण संघाला अपेक्षित ते सर्व काही घडेल, ही भूमिका सर्वसाधारणपणे समजायला सोपी नाही. संघाची शाखा सगळा समाज संस्कारीत करण्याचा प्रयत्न करते. श्री बाळासाहेब देवरस नेहमी एक उदाहरण द्यायचे हे उदाहरण डॉक्टरजी, गुरुजी पण द्यायचे. संघ हे एक पॉवर हाऊस आहे. पावर हाऊस मध्ये वीज निर्माण होते. मग त्या विजेवर बल्बही लागतो, पंखाही फिरतो आणि अजून आपण हवे ते करतो. पण पावर हाऊस म्हणजे बल्ब नव्हे, पंखा नव्हे, तर हे एक वीज निर्मितीचे केंद्र आहे. संघ हे असे समाजातील व्यक्ती व्यक्तीला संस्कारीत करणारे ऊर्जा केंद्र आहे. अशा संस्कारीत व्यक्ती मग समाजातील सर्व क्षेत्रात अनुकूल प्रभाव निर्माण करतील. व संघाला अपेक्षित ते घडवतील. हा विश्वास सार्थ ठरला आहे. कारण संघाच्या विचारांच्या अनेक शाखा (ळपसी) आहेत. ज्याला णालीशश्रश्रर ेिसरपळीरींळेप म्हणतात. त्यांची आपण थोडक्यात ओळख करून घेऊ. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## नवीन घराच्या बांधकामाला पाणी मारत असताना विद्युत शॉक लागून १६ वर्षीय मुलाचा मृत्यू



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १९ एप्रिल पैठण तालुक्यातील ढाकेफळ येथे दुर्दैव घटना आपल्या राहत्या घरी नविन बांधकामावर सकाळी पाणी मारत असताना अचानक विद्युत प्रवाह पाण्यात उतरल्यामुळे साबेर शाकेर शेख (वय-१६ वर्षे) या नवतरुणाला विजेचा जोराचा धक्का लागुन तो जागेवरच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना ढाकेफळ ता.पैठण येथे आज दि.१९ एप्रिल रोजी सकाळी ७:४० वाजेदरम्यान घडली.त्याला नातेवाईकांनी तात्काळ ढाकेफळ प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ.यास्मिन शहा यांनी तपासून पुढील उपचारासाठी बिडकीन रुग्णालयात पाठवले.नातेवाईकांनी त्याला एका खाजगी रूग्णालयात दाखल केले.बिडकीनला पोहोचेपर्यंत त्याची प्राणज्योत मालवली होती.त्याला तपासुन डॉक्टरांनी मयत घोषित केले. त्याच्यावर दुपारी २:३० वाजता. मुस्लिम रीतीरिवाजा प्रमाणे ढाकेफळ येथील कब्रस्तानात शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## पहिलीपासून हिंदी सक्ती विद्यार्थ्यांवर अन्यायकारक निर्णय मागे घेण्याची साहित्य भारतीची मागणी

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

शालेय शिक्षणात प्राथमिक स्तरावर पहिलीपासून हिंदी शिकवण्याच्या अनिवार्यतेवर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडानुसार मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांतील पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना मराठी आणि इंग्रजीसह हिंदी ही तृतीय भाषा म्हणून शिकावी लागणार आहे. जूनपासून याची सुरुवात होणार आहे. ही सक्ती म्हणून विद्यार्थ्यांवर अन्यायकारक निर्णय आहे. हा निर्णय त्वरित मागे घ्यावा, अशी मागणी अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारतीचे महामंत्री प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर आणि कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. नरेंद्र पाठक यांनी मुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्र्यांकडे केली आहे.

निवेदनात म्हटले की, हा निर्णय मराठी भाषेचे ज्ञानभाषा म्हणून असणारे अस्तित्वही नाकारणारा आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणात भारतीय भाषांच्या अभ्यासक्रमाला अग्रक्रम देण्यात आले. विद्यार्थ्यांची क्षमता, मानसिकता, आवश्यकता लक्षात घेऊन टप्या-टप्याने भाषा शिकविण्यात याव्या, असे निवेदनात म्हटले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणात अशी कोणतीही सक्ती केलेली नाही. शासनाच्या परिपत्रकामुळे महाराष्ट्रात कधीही अस्तित्वात नसलेला हिंदी विरोध निर्माण करण्यास विशिष्ट मंडळींना आयतीच संधी उपलब्ध झाली आहे. तरी शासनाने १६ एप्रिल रोजी काढलेले परिपत्रक त्वरित मागे घ्यावे, असेही तौर आणि पाठक यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## पाचशे वीजचोरांना दणका; महावितरणची जालना जिल्ह्यात धडक कारवाई

जालना : महावितरणने जालना जिल्ह्यात वीजचोरीविरोधात उघडलेल्या धडक मोहिमेमुळे खळबळ उडाली आहे. गेल्या पंधरवड्यात अभियंते व कर्मचाऱ्यांनी तब्बल ४८९ वीजचोऱ्या पकडल्या आहेत. जिल्ह्यांत सर्व तालुक्यांत एकाच वेळी वेगवेगळ्या पथकांनी केलेल्या कारवाईमुळे वीजचोरांचे धाबे दणाणले आहे.

जालना जिल्ह्यात वीजगळतीचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे महावितरणचे नुकसान होतेच, शिवाय वीजचोरांमुळे वाहिन्यांवर भार येऊन वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे अधिकृत वीजजोडणी घेणाऱ्या ग्राहकांनाही फटका बसतो. हे लक्षात घेऊन वीजचोरीला आळा घालण्यासाठी जिल्ह्यात महावितरणच्या भरारी पथकांसह स्थानिक कार्यालयांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी एकाचवेळी कारवाई करण्याचे आदेश छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनी दिले. त्यानुसार अधीक्षक अभियंता संजय सरग यांच्या नेतृत्वाखाली कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते, शाखा अभियंते, तंत्रज्ञांनी आठही तालुक्यांत ही मोहीम राबवली.

१ एप्रिल ते ४ एप्रिलदरम्यान छत्रपती संभाजीनगर शहरातील तीन व जालना, परभणी, नांदेड, लातूर, धाराशिवचे प्रत्येक पथक तसेच अंबड, घनसावंगी व परतूर तालुक्यातील स्थानिक अभियंते, कर्मचाऱ्यांनी जालना-२ विभागांतर्गत परतूर, आष्टी, अंबड, जामखेड, वडीगोद्री या गावांत शहरात वीजचोरी पकडण्याची मोहीम राबवली.

## कल्पनाशक्ती ही नवनिर्मितीपेक्षा अधिक महत्त्वाची असते : पद्मभूषण डॉ. विजय भटकर

### 'एम्पॉवरिंग आयडीयाज, ट्रान्सफॉर्मिंग फ्युचर्स' विषयावर मान्यवरांनी मांडले आपले विचार



डावीकडून जागतिक ख्यातीचे संगणक शास्त्रज्ञ पद्मभूषण प्रा.डॉ. विजय, भटकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे प्रा. डॉ. के. व्ही. काळे, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेचे संचालक प्रा. डॉ.सुनील भागवत, डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रा.डॉ. रजनीश कामत, ग्राइंड मास्टर मशिन्सच्या संचालिका मोहिनी केळकर, , एन्ड्रेस अँड हाऊसर इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक कैलास देसाई, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रशांत बोकारे, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर व सर्व संबंधित उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर, दि.१९ : आजच्या मेत्ता परिषदेत कल्पनाशक्तीचं खूप मोठं दर्शन विद्यार्थ्यांसमोर सादर करण्यात आलं आहे. काही गोष्टी अशा आहेत ज्या ना विद्यार्थ्यांनी कल्पना केल्या आहेत, ना शिक्षकांनी! हाच नवसर्जनाचा खरा मार्ग आहे आणि हीच गोष्ट विद्यार्थ्यांना शिकवणं आवश्यक असून कल्पनाशक्ती ही नवनिर्मितीपेक्षा अधिक महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन जागतिक ख्यातीचे संगणक शास्त्रज्ञ पद्मभूषण प्रा.डॉ. विजय भटकर यांनी यावेळी केले.

महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्यावतीने 'एम्पॉवरिंग आयडीयाज, ट्रान्सफॉर्मिंग फ्युचर्स' या संकल्पनेवर आधारित 'मेत्ता २०२५' या विशेष संवाद सत्राच्या प्रथम आवृत्तीचा शुभारंभ आज रूक्मिणी सभागृह येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी जागतिक ख्यातीचे संगणक शास्त्रज्ञ पद्मभूषण प्रा.डॉ. विजय भटकर, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रा.डॉ. रजनीश कामत, भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेचे संचालक प्रा. डॉ.सुनील भागवत, ग्राइंड मास्टर मशिन्सच्या संचालिका मोहिनी केळकर, एन्ड्रेस अँड हाऊसर इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक कैलास देसाई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे प्रा. डॉ.के.व्ही. काळे,गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.प्रशांत बोकारे, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

पुढे बोलताना पद्मभूषण डॉ. विजय भटकर म्हणाले, एमजीएम विद्यापीठ एक उदयन्मुख विद्यापीठ असून येथे येऊन मला येऊन आनंद झाला. मी फार आश्चर्यचकित झालो आहे की, एक नवं उदयोन्मुख विद्यापीठ म्हणून एमजीएम विद्यापीठामध्ये नवविज्ञान आणि नवकल्पकतेच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना समृद्ध केलं जातंय. मला खूप समाधान वाटतंय की, आपल्या तरुण विद्यार्थ्यांना नव्या विचारसरणीची आणि नवकल्पनांची ओळख येथे करून दिली जात आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुलगुरू डॉ.विलास सपकाळ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.ऋषिकेश काकडे आणि प्रा.माधुरी कावरखे यांनी केले तर आभार प्रदर्शन कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांनी केले.

## भारती चव्हाण यांची महसूल सहाय्यक पदी निवड



छत्रपती संभाजी नगर - संजयनगर, मुकुंदवाडी या भागातील भारती अंकुश चव्हाण यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगा च्या परीक्षेतून महसूल सहाय्यक पदी नुकतीच निवड झाली आहे.

भारती चव्हाण यांचे शालेय शिक्षण तुळजाभवानी या शाळेतून झाले तर महाविद्यालय शिक्षण वसंतदादा पाटील, छत्रपती संभाजीनगर येथे झाले. तसेच भारती यांचे आई वडील भाजीपाला विकून आपले पोट भरत असे कालांतराने वडील यांचे निधन झाले त्यानंतर सर्व जबाबदारी ही भावाने रिक्षा चालून संभाळली, अशा परिस्थितीत भारती दिव्यांग असूनही हार न मानता सातत्याने अभ्यास करून जिद्द बाळगून स्पर्धा परीक्षा दिली. पहिल्याच प्रयत्नात तिला यश मिळाले आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून ती पास होऊन तिची महसूल सहाय्यक पदी निवड करण्यात आली. तिच्या या यशाबद्दल आई हौसाबाई चव्हाण यांच्या डोळ्यात आनंद अश्रू आणि या यशात आई व भाऊ यांचा मोलाचा वाटा आहे अशा प्रतिक्रिया तिने व्यक्त केल्या. तिच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

## 'वागले की दुनिया' मध्ये सुगंधा मिश्रा ची एंट्री

सोनी सबवरील 'वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से' ही मालिका मध्यमवर्गीय माणसाचा दैनंदिन संघर्ष आणि त्यांच्या कुटुंबातील हृदयस्पर्शी क्षण हलक्या-फुलक्या पद्धतीने मांडून प्रेक्षकांची आवडती मालिका बनली आहे. या लोभस विश्वात आता लोकप्रिय अभिनेत्री आणि कॉमेडीयन सुगंधा मिश्राची एंट्री होत आहे. ती या मालिकेत सुमन गढिया नामक एका विचित्र, अत्यंत नाटकी स्वभावाच्या स्त्रीच्या रूपात दिसणार आहे. नाटकीपणा आणि बनवाबनवी करणे तिच्या स्वभावात आहे. सुमन यामिनी (मानसी जोशी) सोबत एका नाटकात काम करत आहे आणि आपल्या एका आगामी नाटकात मध्यमवर्गीय स्त्री साकारण्यासाठी तशा स्त्रियांचे निरीक्षण करता यावे या हेतूने ती या सोसायटीमध्ये आली आहे. गोड गोड बोलून ती यामिनीला भुलवते आणि साई दर्शन सोसायटीत राहायला येते, पण प्रत्यक्षात तिचा उद्देश काही इतका सरळसोट नाही!

## 'जमाई नं.१' मध्ये ऑफ-स्क्रीन हास्यही निर्माण करणार

झी टीव्हीवरील 'जमाई नं.१' ही मालिका एका अनपेक्षित वळणामुळे प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. 'नील'ची भूमिका साकारत असलेला अभिषेक मलिक आगामी भागात भयानक 'जोकर'चा मास्क घालून त्याची सासू कंचन (पापिया सेनगुप्ता) चे अपहरण करेल आणि त्यामुळे संपूर्ण कथानकात मोठा गोंधळ निर्माण होतो. कंचन या घटनेचा फायदा घेऊन नील मानसिकदृष्ट्या अस्थिर आहे असे सिद्ध करण्याचा प्रयत्न करते त्यामुळे तणाव निर्माण होतो आणि कथानकाला एक मोठे वळण मिळते.

## सोयगाव येथे आज भाजपा संघटनात्मक बैठक

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१९ एप्रिल

भारतीय जनता पार्टी वतीने दि.२० रविवार रोजी ११ वा. माजी जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांच्या निवासस्थानी सोयगाव तालुका अध्यक्ष निवड पक्ष निरीक्षक कल्याण गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये होणार आहे.तर भाजपा सर्व आघाड्यांचे तालुका अध्यक्ष उपाध्यक्ष,सरचिटणीस,चिटणीस,शक्तिकेंद्र प्रमूख,बूथ प्रमुख, आजी,माजी,नगरसेवक,पदाधिकारी,कार्यकर्ते सर्वांनी उपस्थीत रहावे तसेच निवड झालेल्या नवीन तालुकाध्यक्ष यांचा जाहिर सत्कार करण्यासाठी आजी,माजी पदाधिकारी, कार्यकर्ते सर्वांनी उपस्थीत रहावे असे आवाहन बद्री राठोड भाजपा तालुका अध्यक्ष सोयगाव यांनी केले आहे.

## चार्ली स्पेन्सर चॅप्लीन यांची १३६ व्या जयंती निमित्त माणुसकी वृध्द सेवालयाच्या वतीने अभिवादन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१९ एप्रिल

ज्युनिअर चार्ली फाउंडेशन व सु-लक्ष्मी बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने चार्ली स्पेन्सर चॅप्लीन यांना अभिवादन करण्यात आले.

कल खेल मे हम रहे ना रहे..गर्दीश मे तारे रहेंगे सदा.....

ह्या दोन ओळीचा अर्थ सहज समजल्या जाईल एवढा सोपा नाही त्याचे कारण नाही तेवढेच आहे आज चॅप्लिनचा जन्म १६ एप्रिल १८८९ रोजी लंडनमध्ये झाला.हसून हसून पोट दुखणे म्हणजे काय असते हे अनुभवायचे असेल तर चार्ली चॅप्लिनचा कुठलाही चित्रपट पाहा. जगाला पोट दुखेपर्यंत हसवणार्या चार्ली चॅप्लिनला आजही कुणी विसरलेला नाही.गंमत पाहा चार्लीचा काळ मूकपटांचा होता. त्यामुळे केवळ अभिनयातून त्याने सर्वांच्या चेहर्यावर हास्य फुलवले होते,आनंद दिला होता.आजही चार्ली चॅप्लिनचे नाव घेतले तरी नकळत चेहरा आनंदाने फुलतो. चित्रपट बोलू लागल्यानंतर भाषा हा चित्रपटाचा आत्मा झाला.हे लक्षात घेतले तर संवादाशिवाय केवळ देहबोली आणि





चेहर्यावरील हावभावाने प्रेक्षकांना हसवणे आणि हसवता हसवता कारुण्याची झलक दाखवण्याची जबरदस्त किमया त्याकाळी चार्ली चॅप्लिनने केली होती.अशा या चार्लीने २५ डिसेंबर १९७७ रोजी जगाचा निरोप घेतला. ४८ वर्षांनंतरही चार्लीला लोक विसरू शकले नाहीत आणि येणारी नवी पिढीही चार्लीकडे आकर्षित होते. एवढी लोकप्रियता क्वचितच कुठल्या कलाकाराला मिळाली असेल.अभिनय त्याच्या रक्तातच भिनला होता.कारण त्याचे आईवडील रंगभूमी कलाकार होते.चार्ली अवघ्या १२ वर्षांचा असताना त्याच्या वडिलांचा व्यसनाच्या आहारी गेल्यामुळे मृत्यू झाला होता.तत्पूर्वी त्याचे आईवडील वेगळे झाले होते.त्यामुळे सर्व जबाबदारी आईवर आली होती.

त्यांच्याकडे पूर्ण विश्वातील मोठ मोठे डायरेक्टर प्रोड्यूसर आपल्या येथील ख्यातनाम कलाकार त्यांच्याकडे चित्रपट सृष्टीचे धडे गिरवत असत.आजही ते जरी या विश्वात शरीरुपे नसले तरीही त्यांनी केलेली कार्यकर्ती ही संपूर्ण चित्रपट सृष्टीला धडा देणारी आहे व तसेच कित्येक जण आज त्यांची वेशभूषा करून आत्मनिर्भर होत आहे त्यांचीच आम्ही ज्युनिअर चार्ली फाउंडेशन व माणुसकी वृध्द सेवालयाच्या वतीने चार्ली स्पेन्सर चॅप्लीन यांची १३६ व्या जयंती निमित्त माणुसकी वृध्द सेवालयाच्या वतीने अभिवादन करीत जयंती साजरी केली.

ज्युनियर चार्ली फाउंडेशन हे चार्ली सरांच्या पाऊलखुणावर चालत आहे सध्या ज्युनिअर चार्ली फाउंडेशनचे ३५ विद्यार्थी चार्ली च्या भूमिकेत आपली कला सादर करुन आपली उपजीविका भागवत आहे तसेच ज्युनिअर चार्ली फाउंडेशन हे आज पासून चार्ली इज बॅक

विश्व जनजागरण २०२५ ही मोहीम देखील सुरू करत आहे.चार्ली यांच्या आत्म्याला शांती लाभो व आमच्याकडून चार्ली भूमिकेत कोणतेही वाईट कृत्य घडू नये आणि आम्ही सर्वांना क्षणभर का होईना हसू शकू हीच प्रभु चरणी प्रार्थना ज्युनिअर चार्ली फाउंडेशन छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्र तथा भारतभर कार्य करीत आहे यावेळी ज्युनियर चार्ली फाउंडेशन चे अध्यक्ष सोमनाथ स्वभावणे व सुमित पंडित यांनी उपस्थीतांना चार्ली च्या जीवनावर प्रकाश टाकला यावेळी प्रा.शरद सोनवणे यांनी प्रतीमा पुजन करुन चार्ली यांचा जीवन पट मांडला यावेळी माणुसकी वृध्द सेवालयाच्या संचालीका पुजा पंडित,मिराबाई पंडित, देविदास पंडित,आकाश गोरे,अशोक ग्राम, लक्ष्मी पंडित,विजय निंबाळकर,वृध्द सेवालयातील वृध्द उपस्थित होते.

**श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप. अर्बन क्रेडिट सोसायटी लि. अहिल्यानगर**

**कार्यालय** :- "रेणुकाभवन",सर्व्हे नं.३५/२३अ/२ब, पुष्पक हॉटेल जवळ, एकविरा चौक,पाईपलाईन रोड,सावेडी,अहिल्यानगर

**फोन नं.- 1800-233-4140 /9225320280**

**मेल** :- callcentre@renukamatamultistate.com recruitment@renukamatamultistate.com

**पाहिजेत**

संपूर्ण भारतात शाखा असलेल्या व बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य असलेल्या श्री रेणुकामाता मल्टीस्टेट या संस्थेत छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील सिल्लोड, पैठण, पाचोड, वैजापूर, बिडकीन, गंगापूर, छत्रपती संभाजी नगर शहर शाखांमध्ये खालील पदे भरायची आहेत.

| | |
|---|---|
| • **शाखा व्यवस्थापक**<br>**पात्रता** : एम.कॉम/ एम.ए. / एम.एस्सी / एम.बी.ए फाइनान्स<br>**अनुभव** : कमीत कमी ०७ वर्षाचा बँकिंग क्षेत्रातील अनुभव आवश्यक | ३ जागा |
| • **सहायक शाखा व्यवस्थापक**<br>**पात्रता** : एम.कॉम/ एम.ए. / एम.एस्सी / एम.बी.ए फाइनान्स<br>**अनुभव** : कमीत कमी ०५ वर्षाचा बँकिंग क्षेत्रातील अनुभव आवश्यक | ४ जागा |
| • **पासिंग ऑफिसर**<br>**पात्रता** : एम.कॉम/ एम.ए. / एम.एस्सी / एम.बी.ए फाइनान्स<br>**अनुभव** : कमीत कमी ०३ वर्षाचा बँकिंग क्षेत्रातील अनुभव आवश्यक | ५ जागा |
| • **कॅशिअर**<br>**पात्रता** : बी.कॉम / बी.ए. / बी.एस्सी<br>**अनुभव** : कमीत कमी २ वर्षाचा बँकिंग क्षेत्रातील अनुभव आवश्यक | ७ जागा |
| • **क्लार्क**<br>**पात्रता** : बी.कॉम / बी.ए. / बी.एस्सी<br>**अनुभव** : कमीत कमी २ वर्षाचा बँकिंग क्षेत्रातील अनुभव आवश्यक | १५ जागा |
| • **मार्केटिंग क्लार्क**<br>पात्रता : १२ वी पास<br>अनुभव : कमीत कमी १ वर्षाचा मार्केटिंगचा क्षेत्रातील अनुभव आवश्यक | २० जागा |

इच्छुक उमेदवारांनी 7 दिवसांच्या आत खालील दिलेल्या मेल आयडी वरती व WHATSAPP वरती आपला बायोडाटा व शैक्षणिक कागदपत्र पाठवावे.

WHATSAPP NO.: 9225320280
**मेल** : callcentre@renukamatamultistate.com
recruitment@renukamatamultistate.com

**टीप : रिटायर कर्मचाऱ्यांना प्राधान्य (शासकीय व निमशासकीय)**

अग्रलेख...

# पाकिस्तानचे शेपूट वाकडेच

जगातील कोणतीही ताकद जम्मू-काश्मीरला पाकिस्तानपासून वेगळं करू शकत नाही, अशा वल्गना पाकिस्तानी लष्करप्रमुख जनरल सय्यद असीम मुनीर यांनी नुकत्याच एका कार्यक्रमात केल्या होत्या. पाकिस्तानी लष्करप्रमुखांनी केलेल्या या विधानाने भारताने सडतोड प्रत्युत्तर देत पाकिस्तानला त्याची जागा आणि लायकी दाखवून दिली आहे. पाकिस्तानचे हे विधान म्हणजे एखाद्या खऱ्या पहेलवानाला काडी पहेलवानाने आव्हान देण्यासारखे म्हटले पाहिजे. जनरल मुनीर यांनी जम्मू-काश्मीरबाबत जे विधान केले, त्याला वल्गना असेच म्हटले पाहिजे. पाकिस्तानला आपली कमरेवरची चड्डी सांभाळता येत नाही, तो जम्मू-काश्मीर घेण्याच्या गोष्टी करतो, हे हास्यास्पदच म्हटले पाहिजे. काश्मीरबाबत विधान करताना जनरल मुनीर शुद्धीत नव्हते, असे म्हटले पाहिजे. कारण ते शुद्धीत असते, तर असे बरळले नसते. आपली ताकद किती आणि आपण बोलतो किती असे जनरल मुनीर यांच्या बाबतीत म्हटले पाहिजे. मुनीर यांचे काश्मीरबाबतचे विधान म्हणजे उचलली जीभ लावली टाळूला या प्रकारातील आहे. जम्मू-काश्मीर भारताचे अविभाज्य अंग आहे. पाकिस्तानने भारताचा जो भाग बेकायदेशीरपणे बळकावला तो, त्यांना परत द्यावा लागेल, व्याप्त काश्मीर पाकिस्तानच्या ताब्यातून सोडवावा लागेल, असे भारताने ठरवले आहे. पाकिस्तानला प्रेमाची, गोडीगुलाबीची आणि मुत्सद्देगिरीची भाषा कळत नाही. त्यामुळे जी भाषा पाकिस्तानला समजते, त्याच भाषेत त्याला उत्तर द्यावे लागते. पाकिस्तानची स्थिती 'नाचता येईना अंगण वाकडे' अशी झाली आहे. कारण नसताना पाकिस्तान अधेमधे काश्मीरचा राग आळवत असतो. असे करून तो पाकिस्तानातील जनतेचे लक्ष देशांतर्गत विषयावरून वेळोवेळी विचलित करण्यात यशस्वी होत असतो. पाकिस्तानात अंतर्गत समस्या जेव्हा वाढतात, तेव्हा पाकिस्तानी राज्यकर्ते आणि लष्कर काश्मीरबाबत विधान करीत असतात, हे भारतालाच नाही तर जगालाही आता ठावूक झाले आहे. बलुचिस्तानमधील हिंसाचारामुळे पाकिस्तान हादरला आहे तसेच अफगाणिस्तानातून होणाऱ्या हल्ल्यामुळे पाकिस्तानची डोकेदुखी वाढली आहे. या प्रश्नापासून देशातील लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी पाकिस्तानने यावेळी कारण नसताना काश्मीरचा राग आळवला आहे. आपली डोकेदुखी कमी करण्यासाठी पाकिस्तान काश्मीरचा मुद्दा उपस्थित करीत भारताची डोकेदुखी वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे; पण त्यात पाकिस्तानला यश येत नाही, येणारही नाही. पाकिस्तानचा हा डाव भारताने कधीचाच ओळखला आहे. त्यामुळे भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने त्याला सडेतोड प्रत्युत्तर देत आरसा दाखवला आहे.

जम्मू-काश्मीर ही आमची मुख्य धमनी (रक्तवाहिनी) आहे आणि राहील आणि आम्ही ती विसरणार नाही; जगातील कोणतीच ताकद पाकिस्तानपासून काश्मीरला वेगळे करू शकत नाही, असे तारे पाकिस्तानने तोडले आहेत. काश्मीरबाबत भारताची भूमिका सुरुवातीपासूनच स्पष्ट आहे, 'दूध मागोंगे तो खीर देंगे, काश्मीर मागोंगे तो चीर देंगे' ही काश्मीरबाबत भारताची भूमिका आहे. काश्मीरशिवाय भारताचा विचारही आम्ही करू शकत नाही. काश्मीरच्या काही भागावर पाकिस्तानने बेकायदेशीरपणे कब्जा केलेला आहे. पाकिस्तानची नजर आता उर्वरित काश्मीरवर आहे. तर, पाकिस्तानच्या ताब्यात असलेला व्याप्त काश्मीर ही भारतासाठी भळभळती जखम आहे. व्याप्त काश्मीरचा हा भाग भारताच्या ताब्यात येणार नाही, तोपर्यंत भारताला स्वस्थता लाभणार नाही. काश्मीर हे भारताचे अविभाज्य अंग आहे, नंदनवन आहे, स्वर्ग आहे. काश्मीरशिवाय भारताची कल्पनाच आम्ही करू शकत नाही. ज्याप्रमाणे जगातील कोणतीही ताकद आईपासून त्याच्या तान्ह्या मुलाला अलग करू शकत नाही, त्याप्रमाणे काश्मीरलाही कोणी भारतापासून वेगळे करू शकणार नाही, तसा विचारही कोणी करू शकणार नाही. १९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा देशाची फाळणी होत भारत आणि पाकिस्तान वेगळे झाले. मुळात पाकिस्तानची निर्मितीच भारतातून झाली. त्यामुळे जम्मू-काश्मीरवर दावा करण्याचा कोणताही नैतिक, कायदेशीर आणि भौगोलिक अधिकार पाकिस्तानला मिळू शकत नाही. असे करणे म्हणजे भाडेकरूने घरमालकाच्या घरातील एखाद्या खोलीवर आपल्या मालकीचा दावा करण्यासारखे आहे. देशाची फाळणी झाल्यानंतर पाकिस्तानी राज्यकर्ते तसेच लष्कराने भारताशी कारण नसताना कायमच उभे शत्रुत्व स्वीकारले. याला कारण ठरले व्याप्त काश्मीर. पाकिस्तानने भारतासोबत मैत्रीपूर्ण संबंध ठेवले असते, तर ते भारतापेक्षा पाकिस्तानच्या जास्त हिताचे ठरले असते. पण पाकिस्तानने कायमच भारताचा दुस्वास केला आणि त्याची किंमत त्याला चुकवावी लागली. पाकिस्तानने भारताशी जुळवून घेतले असते, तर आज पाकिस्तानचे चित्र वेगळे राहिले असते. पाकिस्तानात अराजकाची परिस्थिती निर्माण झाली नसती. पाकिस्तानातील जनतेवर हातात भिकेचा कटोरा घेऊन फिरण्याची वेळ आली नसती. पण तेवढे राजकीय शहाणपण पाकिस्तानातील राज्यकर्त्यांना कधी नव्हते आणि पुढेही राहण्याची शक्यता नाही. अपवाद म्हणून पाकिस्तानातील काही राज्यकर्त्यांनी भारतासमोर अनेक वेळा मैत्रीचा हात केला, पण पाकिस्तानी लष्कराने त्यांचा प्रयत्न हाणून पाडला. कारण भारताशी कायम वैर करण्यात पाकिस्तानी लष्कराचे हितसंबंध गुंतले आहेत, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. लष्कराने कसे वागावे हे पाकिस्तानात पाकिस्तानी राज्यकर्ते ठरवत नाही, तर राज्यकर्त्यांनी कसे वागावे, हे पाकिस्तानी लष्कर ठरवत असते. हाच फरक भारतीय लष्कर आणि पाकिस्तानी लष्करात आहे. त्यामुळे पाकिस्तानी राज्यकर्त्यांनी कधी भारतासमोर मैत्रीचा हात केला तर पाकिस्तानी लष्कराने तो हात पिरगाळून टाकलाच म्हणून समजा. पाकिस्तानात लष्करप्रमुख कोण होणार हे राष्ट्रपती वा पंतप्रधान ठरवू शकत नाही तर राष्ट्रपती वा पंतप्रधान कोण होणार, हे पाकिस्तानी लष्करप्रमुख ठरवत असतात. पाकिस्तानी राज्यकर्ते लष्करप्रमुखांच्या ओंजळीने दूध पीत असतात. पाकिस्तानच्या अधोगतीचे कारण यात दडले आहे.

अटलबिहारी वाजपेयीपासून नरेंद्र मोदींपर्यंत प्रत्येकाने पाकिस्तानसमोर मैत्रीचा हात केला होता. पण पाकिस्तानने भारताचा मैत्रीचा हा हात अनेक वेळा झिडकारला. मैत्रीचा हात नुसता झिडकारलाच नाही तर भारताला वेगवेगळ्या मार्गाने मनस्ताप देण्याचाही प्रयत्न केला. भारतात दहशतवादी कारवाया घडवून आणल्या. भारतात संसदेवरील हल्ल्यापासून मुंबईतील बॉम्बस्फोटापर्यंत जेवढ्या दहशतवादी घटना झाल्या, त्यात पाकिस्तानचा हात लपून राहिलेला नाही. भारतात दहशतवादी कारवाया घडून आणणाऱ्या सगळ्या संघटनांना पाकिस्तानचा आश्रय आणि आशीर्वाद आहे. असे करत पाकिस्तान आपल्या हाताने आपल्या पायावर कुऱ्हाड पाडून घेत आहे. मुळात पाकिस्तान आपला फायदा व्हावा, याचा विचार न करता भारताला कसे खड्ड्यात टाकता येईल, याचा विचार करीत असतो. पण यातून भारत तर कधी खड्ड्यात जात नाही; उलट पाकिस्तानच भारतासाठी खोदलेल्या खड्ड्यात पडला आहे. नुसताच पडला नाही तर असा काही पडला की, त्यातून त्याला आता बाहेरही येता येत नाही. तरीपण पाकिस्तानी राज्यकर्ते तसेच लष्कराला शहाणपण येत नाही. पाकिस्तान आर्थिक, सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या शेवटचे आचके देत आहे, पण काश्मीरचा राग आळवण्यापासून राहात नाही. पाकिस्तानने काश्मीरकडे वाकड्या नजरेने पाहण्याचा प्रयत्न केला तर पाकिस्तानचे डोळे काढून घेण्याची ताकद असलेले तसेच पाकिस्तानला त्याच्या सीमेत जाऊन धडा शिकवणारे राज्यकर्ते आता भारतात आहेत, याचा पाकिस्तानने विसर पडू देऊ नये. 'आ बैल मुझे मार' असे पाकिस्तानने करू नये. शहाण्याला शब्दाचा मार पुरेसा असतो, पण पाकिस्तानी राज्यकर्ते हे शहाणे नाही, हे आतापर्यंत अनेक वेळा सिद्ध झाले आहे. कुत्र्याचे शेपूट वाकडे असे म्हणतात, पाकिस्तानी राज्यकर्त्यांची स्थितीही त्यापेक्षा वेगळी नाही.

यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# तामिळनाडू स्वायत्त; हिंदू बंदिस्त!

२०२६ मध्ये तामिळनाडूमध्ये विधानसभा निवडणुका लागणार आहेत. त्यामुळे तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन भलतेच बिथरले आहेत. ते केंद्रावर सतत आरोप करत आहेत. इतकंच काय तर राज्याचे राज्यपाल आर. एन. रवी यांच्यासोबत त्यांचे बऱ्याचदा खटके उडाले आहेत. हिंदी विरोध आणि परिसीमन यानंतर आता तर त्यांनी तामिळनाडूच्या स्वायत्ततेचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. स्टॅलिन यांनी विधानसभेत घोषणा केली की राज्याची स्वायत्तता सुनिश्चित करण्यासाठी ते एक पॅनल तयार करणार आहेत. या पॅनेलचे अध्यक्ष सुप्रीम कोर्टाचे माजी न्यायाधीश कुरियन जोसेफ आणि माजी आयएएस अधिकारी अशोक वर्धन शेट्टी व एमयू नागराजन असणार आहेत. ही समिती जानेवारी २०२६ रोजी अंतरिम रिपोर्ट देणार असून त्यानंतरच विधानसभा निवडणुका होतील असं त्यांनी म्हटलं आहे. पुढे राज्य आणि केंद्रामधील संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. वरवर पाहता हे भाषिक आणि स्थानिक व प्रांतीय मुद्दे असले तरी हे एक शस्त्र आहे. तुम्हाला जाणून आश्चर्य वाटेल की या शस्त्राचं अंतिम लक्ष्य हिंदुत्व असणार आहे.

मुळातच स्टॅलिन हे हिंदू अस्मितेच्या विरोधात असून त्यांच्या पक्षाला हिंदू विरोधाची पृष्ठभूमी आहे. त्यांचे पुत्र उदयनिधी स्टॅलिन यांनी अनेकदा हिंदूविरोधी वक्तव्ये केली आहेत. करुणानिधी यांनी त्यांच्या मुलाचं नाव कम्युनिस्ट नेता जोसेफ स्टॅलिनच्या नावावरून ठेवलेलं आहे. म्हणूनच भाजपचे नेते बऱ्याचदा त्यांना त्यांचं परकीय नाव बदलण्याचा सल्ला देतात. आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की द्रविड आंदोलनाच्या नावाखाली या पक्षाने कम्युनिस्ट विचारधारा लागू करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु त्यास भाषा, द्रविड आणि प्रांताची फोडणी देण्यात आली. जेणेकरून स्थानिक लोकांचे सहकार्य त्यांना सतत मिळत राहील. ही चळवळ पेरियार यांनी सुरू केली होती. तेव्हापासून भाषिक आणि प्रांतीय अस्मितेच्या वेडाने या राज्याला पछाडले आहे. महाराष्ट्रात सुद्धा असा प्रयोग करून पाहण्यात आला. मात्र महाराष्ट्रावर छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचे संस्कार झाल्यामुळे महाराष्ट्रातून हिंदू अस्मिता पुसून टाकता आली नाही. मात्र दक्षिणेकडच्या राज्यांना भाषिक अस्मितेने पछाडले आहे. याला कारण हिंदूच आहेत. बंगालमध्ये जेव्हा कम्युनिस्टांना हरवून ममता बॅनर्जी मुख्यमंत्री झाल्या तेव्हा त्यांना डाव्यांच्या अगदी विपरीत राजकारण करता आले असते. त्यांनी तसा शब्दही दिला होता. त्यांच्या राज्यात हिंसाचाराला थारा राहणार नाही अशी वचने त्यांनी दिली होती.



मात्र त्यांना हिंदूंवर विश्वास नव्हता. हिंदूंना हिंदू म्हणून हाक मारली की ते 'ओ' देत नाहीत. मात्र भाषा, प्रांत, जात यावरून हाक मारली की ते नुसते 'ओ' देत नाहीत तर धावत येतात. त्यामुळे ममता बॅनर्जी यांनीही हिंदू असा शब्द न उच्चारता बंगाली अस्मितेची फोडणी दिली आणि बंगाली अस्मिता पायदळी तुडवणाऱ्या वर्गाचीच दाढी कुरवाळली. वक्फ सुधारणा कायद्यावरून त्यांनी थेट केंद्राला विरोध केला आणि उघडउघड मुस्लिमांना पाठिंबा दिला. साक्षात मुख्यमंत्री आपल्या पाठीशी आहेत म्हटल्यावर मुस्लिमांनी आंदोलनाच्या नावाखाली हिंदूंमध्ये दहशत निर्माण करण्याचे काम केले आणि दंगली केल्या. परिणामी हिंदूंना जीव वाचवण्यासाठी पळावं लागत आहे. आता याचा दोष आपण ममता बॅनर्जी यांना देऊ किंवा मुस्लिमांच्या नावाने बोटे मोडू, पण आपण एक गोष्ट लक्षात घेत नाही की हिंदू जर संघटित झाले असते तर ही वेळ आली असती का? मागच्या निवडणुकीत ममता यांचा पराभव झाला असता तर मोठ्या प्रमाणात दंगली घडवण्याची हिंमत झाली असती का?

स्टॅलिन देखील असेच राजकारण खेळत आहेत. फक्त इथे मुद्दा भाषा, प्रांत आणि द्रविड अस्मितेचा आहे. हिंदूविरोधी राजकारण हे स्थान व प्रांतानुसार बदलते. बंगालमध्ये मुस्लिम लांगूलचालन होते तर तामिळनाडूमध्ये भाषित अस्मिता तीव्र केली जाते. काही दिवसांपूर्वी न्यू एज्युकेशन पॉलिसी आणि परिसीमनाला विरोध करताना स्टॅलिन म्हणाले होते की ''केंद्र सरकार भाषा युद्धाचं बी पेरत आहे आणि त्या युद्धासाठी मी तयार आहे.'' तर हे युद्ध म्हणजे बोलाची कढी नसून भूतकाळात प्रत्यक्षात झालेल्या १९६० दरम्यानच्या हिंसक आंदोलनाची आठवण करून दिली होती. त्यांना हिंदीच्या खांद्यावर बंदूक ठेवून संस्कृत भाषेवरही टीका करायची आहे, पर्यायाने सनातन धर्मालाच विरोध करायचा आहे. आता तर त्यांनी नवा बाण सोडला आहे; तामिळनाडूची स्वायत्तता! केंद्र सरकारच्या वाढत्या दबावामुळे त्यांना तामिळनाडूच्या स्वायत्ततेची भीती वाटत आहे असे ढोंग ते करत आहेत. म्हणूनच त्यांनी हे पॅनल स्थापन केलं आहे. यामागे हेतू असा आहे की, तामिळनाडूच्या जनतेच्या मनात गोंधळ निर्माण करायचा आहे. तामिळनाडू हे एक स्वतंत्र राज्य असून त्यात केंद्र हस्तक्षेप करत आहे असे दाखवायचे आहे आणि पुढे जाऊन ते स्पष्टपणे बोलतील किंवा न बोलतील पण तामिळनाडू हा एक वेगळा देश असावा अशी इच्छा व्यक्त करतील. पण वेगळा देश असा उल्लेख न करता ते स्वायत्तता इत्यादी गोष्टी करत राहतील. प्राचीन काळापासून भारतात वेगवेगळ्या भाषा आहेत, त्यामुळे इथल्या संस्कृतीतही विविधता आहे. ही पाश्चात्त्य विचारधारेसाठी आश्चर्याची बाब होती आणि आहे. अनेक भाषिक एकत्र कसे नांदू शकतात हे त्यांच्यासाठी न उलगडलेलं कोडं आहे. हिंदू हा धागा सर्व मण्यांना जोडून ठेवतो. म्हणून हिंदुत्व नष्ट झालं तर भारताचे १०० तुकडे पाडता येतील. म्हणूनच भाषिक आणि प्रांतीय अस्मितेला खतपाणी घातलं जातं. हिंदूंची समस्या अशी आहे की हिंदू पुष्कळ धार्मिक असले तरी त्यांची राजकीय इच्छाशक्ती शून्य आहे. इतका मोठा इतिहास समोर असताना राजकीयदृष्ट्या हिंदू एक होत नाही ही शोकांतिका आहे. त्यामुळेच स्टॅलिनसारखे राजकारणी भाषिक मुद्दे उपस्थित करून हिंदुहिताच्या राजकाराणाला तडा देत असतात. तामिळनाडूची स्वायत्तता सुनिश्चित करणे यामागचा सुप्त हेतू तामिळनाडू आणि हिंदूंचा काहीही संबंध नाही, तामिळनाडू आणि केंद्र पर्यायाने भारताचा काहीही संबंध नाही. फक्त हे त्यांना अजून तरी उघडपणे बोलता येत नाही. आता अण्णा द्रमुक आणि भाजपाची पुन्हा एकदा युती झालेली आहे. २०२६ ला पाहायचं आहे की तामिळी जनता स्टॅलिन याचं हिंदुविरोधी धोरण स्वीकारतात की हिंदुत्वाच्या रंगात रंगून जातात!

writerjayeshmestry@gmail.com

वेध

**विजय कुळकर्णी**

# व्होट बँक टिकविण्याची स्पर्धा

काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील मित्र पक्षांमध्ये व्होट बँक टिकविण्याची स्पर्धा सुरू असल्याचे गेल्या काही दिवसांपासून घडत असलेल्या राजकीय हालचालींवरून दिसून येत आहे. काँग्रेसने देशात गल्लीपासून दिल्लीपर्यंत एकहाती सत्ता गाजविली. प्रदीर्घ काळ सत्तेच्या केंद्रस्थानी असल्यामुळे आघाडीचे राजकारण करणे काँग्रेसला फारसे पटत नसले तरीही आता त्यांच्याकडे पर्याय राहिलेला नाही. कारण, भाजपा प्रणीत एनडीएला टक्कर देण्यासाठी भाजपा विरोधी राजकीय पक्षांना एकत्र करून आघाडी केली तरच आपला टिकाव लागू शकेल, हे जाणून काँग्रेसने नाईलाजाने प्रथम संपुआ व आता इंडिया आघाडी केली आहे. पण, त्याचाही फारसा फायदा काँग्रेसला झालेला दिसत नाही. उलट प्रादेशिक पक्ष काँग्रेसवर भारी पडलेले दिसत आहेत. एकेकाळी उत्तर प्रदेशात काँग्रेसने एकहाती सत्ता भोगली. मात्र, जनता दल व नंतर जनता दलातून बाहेर पडलेले मुलायमसिंह यादव यांनी उत्तर प्रदेशातील काँग्रेसच्या व्होट बँकेला सुरुंग लावला. त्यांनी समाजवादी पार्टी काढल्यानंतर उत्तर प्रदेशातील मुस्लिम, यादव व काही प्रमाणात दलित मतदार त्यांनी सपाकडे वळविण्यात यश मिळविले. तर, मायावतींच्या बसपाने दलित मतदार काबीज केले. त्याचा फटका काँग्रेसला मोठ्या प्रमाणात बसला. उत्तर प्रदेशातील मुस्लिम व दलित ही पारंपरिक मते काँग्रेसकडून गेली. त्यानंतर ब्राह्मण, राजपूत देखील काँग्रेसपासून दूर गेले. मंडल आयोगानंतर ओबीसी हा नवीन फॅक्टर आला. ही मते भाजपाने साधली. बिहारमध्ये देखील लालूप्रसाद यादव यांच्या आरजेडीने यादव, मुस्लिम व दलित मते आपल्याकडे खेचून घेतली. महाराष्ट्रातही राष्ट्रवादी काँग्रेसने (एकसंघ) मराठा मतदारांना आपल्याकडे वळविण्यात बऱ्यापैकी यश मिळविले. तर, दलित मतदार (आंबेडकरी) बाळासाहेब आंबेडकरांच्या वंचित बहुजन आघाडीकडे गेला. उर्वरित रिपाइंच्या विविध गटांत विभागला गेला. मुस्लिम मतांमध्ये ओवैसीने हात मारण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे. दक्षिणेकडील राज्यांमध्ये त्या त्या राज्यातील प्रादेशिक पक्ष काँग्रेसच्या हाती काहीच लागू देत नाहीत. प. बंगालमध्ये ममता बॅनर्जी मुस्लिम मतदारांना कुरवाळत आहेत. वक्फवरून तेथे दंगल झाली तरीही त्या मुस्लिमांचीच बाजू घेताना दिसतात. त्यामुळे गेल्या निवडणुकीत प. बंगालच्या विधानसभा निवडणुकीतून काँग्रेस हद्दपार झाली. लोकसभा निवडणुकीत ममता बॅनर्जी आपल्याला मदत करतील, असा विचार करून राहुल गांधींनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेऊन तृणमूल काँग्रेसला पाठिंबा दिला होता. पण, लोकसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने राहुल गांधींच्या काँग्रेसला अपेक्षित मदत केली नाही. तर, दिल्लीमध्ये आम आदमी पार्टीने काँग्रेसच्या व्होट बँकेत बऱ्यापैकी हात घातला. त्याचा फटका काँग्रेसला बसून लोकसभेत दिल्लीत काँग्रेसच्या हाती मोठा भोपळा मिळाला. जम्मू-काश्मीरमध्ये इंडिया आघाडीची सत्ता आली खरी पण, त्याचे धागेदोरे ओमर अब्दुल्लांकडे आहेत. काँग्रेसला त्यांच्या दयेवरच जगावे लागत आहे. जातिपातीचे राजकारण करून काँग्रेसने प्रदीर्घकाळ देशात सत्ता भोगली. पण, आता त्यांचे हे राजकारण मतदारांना समजले आहे. त्यामुळे काँग्रेसचे जातीचे कार्ड त्या प्रमाणात यशस्वी होताना दिसत नाही. या सर्व परिस्थितीचा विचार करून काँग्रेसने गुजरातमध्ये झालेल्या पक्षाच्या अधिवेशनात राहुल गांधी यांनी ओबीसी मतदारांवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्देश पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिला. आपण अगडे आणि मुसलमानांकडेच लक्ष देत राहिलो आणि ओबीसी आपल्यापासून दुरावले, असे त्यांनी या अधिवेशनात म्हटले. याचा अर्थ आता काँग्रेस आपली परंपरागत व्होट बँक परत मिळविण्यासाठी प्रयत्न करणार आहे. हे करताना पुन्हा जातीयतेला खतपाणी घातले जाणार आहे. त्याचबरोबर इंडिया आघाडीतील मित्र पक्षांशी काँग्रेसला स्पर्धा करावी लागणार आहे. त्यामुळेच राहुल गांधी वारंवार किती ओबीसी अधिकारी आहेत, किती मुसलमानांना पक्षाचे अध्यक्ष किंवा जिल्हाध्यक्ष केले, ओबीसींची जनगणना का केली जात नाही, इत्यादी प्रश्न उपस्थित करून काँग्रेसच ओबीसींची खरी तारणहार असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु, जोपर्यंत काँग्रेसला देशभरात विविध राज्यातील इंडिया आघाडीतील प्रादेशिक पक्षांपेक्षा जास्त जागांवर निवडणूक लढविता येणार नाही, तोपर्यंत काँग्रेसला लोकसभेत स्वतःचे बहुमत मिळविता येणार नाही आणि प्रादेशिक पक्ष आपल्या राज्यातील आपले वर्चस्व कायम ठेवण्यासाठी प्रयत्न करणारच आहेत. या वर्चस्वाच्या लढाईतूनच आता काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांत व्होट बँक टिकविण्याची स्पर्धा सुरू झाली आहे.

८८०६००६१४९

मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# मातृभाषी गद्दार!

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत तयार करण्यात आलेल्या राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४, टप्प्याटप्प्याने लागू करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने नुकताच एक शासन निर्णय जारी केला. या शासन निर्णयाप्रमाणे राज्याच्या नवीन शिक्षण धोरणाच्या अनुषंगाने सर्व शाळांमध्ये त्रिभाषा सूत्रानुसार मराठी भाषा अनिवार्य करण्यात आली असून, सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीसाठी माध्यम भाषा मराठी, इंग्रजी आणि हिंदी अशा तीन भाषा अभ्यासण्याचे बंधन करण्यात आले आहे. बस नेमकं हेच सूत्र पकडून राज्यातील काही विघ्नसंतोषी लोकांनी पुन्हा एकदा भाषीय राजकारण करून आपली राजकीय पोळी शेकण्यास सुरुवात केली आहे.

महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी भाषा सक्ती कशाला, हा या संधिसाधू लोकांचा मूळ मुद्दा नव्हे, आक्षेप आहे. हिंदीची सक्ती खपवून घेणार नाही, असे इशारे आता देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि आश्चर्याची बाब म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला दिले जात आहेत. मुळात निर्णय राज्य सरकारचा आहे. केंद्र सरकार, मोदी-शाह आणि संघ यांचा या विषयाशी काहीही एक संबंध नसताना त्यांना ओढूनताणून यात गोवण्याने हा राजकीय स्वार्थ साधण्याचा प्रकार हे मराठीचे तथाकथित कैवारी लोक करताना दिसत आहेत.

सरकारने जारी केलेल्या परिपत्रकात/शासन निर्णयात काय आहे? आता सर्वप्रकारच्या शाळांमध्ये त्रिभाषा सूत्रानुसार तिन्ही भाषा शिकविले जाणे बंधनकारक करण्यात आले आहे. आज भाषा शिक्षणाची अवस्था काय आहे? तर, सद्यःस्थितीत इंग्रजी माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये केवळ हिंदी आणि इंग्रजी या दोन भाषा अभ्यासल्या जात आहेत. इंग्रजी माध्यम म्हणजे कॉन्व्हेंटमध्ये आजघडीला मराठी भाषा शिकविली, अभ्यासली जात नाही. आता राज्य सरकारने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार या लोकांनादेखील मराठी भाषा शिकवणं बंधनकारक झालं आहे. या गोष्टीचं स्वागत मराठीचे हे कैवारी करणार नाहीत. कारण ही गोष्ट अधोरेखित झाली तर, याचं श्रेय भाजपा आणि सरकारला जाईल. मग राजकीय लाभदेखील त्यांनाच होईल. हा लाभ मिळू नये, याकडे जनतेचं लक्ष भटकवून, हिंदीचे राजकारण तापवून आपली राजकीय पोळी शेकण्याचा प्रयत्न महाराष्ट्राच्या राजकारणातील ''३ इडियट्स चतुर रामलिंगम'' टाईपची लोक करत असल्याचे दिसत आहेत.



उद्धव ठाकरे गटाचे नेते हिंदीच्या सक्तीकरणाविरोधात एल्गार पुकारताना दिसत आहेत. मात्र, उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना दक्षिणेच्या राज्यांमध्ये तामिळ, कानडी, तेलुगु, मल्याळम अशा स्थानिक भाषा शिकविणे कायद्याने ज्याप्रमाणे सक्तीचे करण्यात आले आहे, त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही मराठी भाषेचा सक्तीचा कायदा करण्यात आला. मराठी विषय नाही अशा राज्यात सुमारे २५ हजार शाळा आहेत, अशी माहिती त्यावेळी स्वतः तत्कालीन मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई यांनी दिली होती. कोणत्याही अभ्यासक्रमाच्या शाळा असल्या, तरी हा कायदा सर्व शाळांसाठी बंधनकारक राहील. असा कायदा करण्यात आला होता. या कायद्याचं पुढं काय झालं. साधी अंमलबजावणी देखील होताना दिसली नाही. आजही इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी शिकविली जात नाही, अशीच परिस्थिती आहे. मराठीची अंमलबजावणी सर्व शाळांमध्ये होण्यासाठी आता छाती बडविणाऱ्यांनी आजवर काय केलं. असा प्रश्न निर्माण होतो. आज मराठीचा पुळका आलेल्यांना आपण सत्तेत असताना केलेल्या कायद्याची अंमलबजाणी करण्यासाठी पुढाकार घेताना कुणीही बघितले नाही. आज इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये केवळ इंग्रजी आणि हिंदीच शिकविल्या जात आहे. २०२० मध्ये ठाकरे मुख्यमंत्री असताना ''महाराष्ट्रातील शाळांमध्ये मराठी भाषेचे सक्तीचे अध्यापन आणि अध्ययन विधेयक-२०२०'' विधिमंडळात पारित करून, राज्यात कायदा केला. कायदा झाल्यावर तब्बल दोन वर्षे उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते. मग इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये त्याची अंमलबजावणी करण्याची साधी तसदी ठाकरेंनी का घेतली नाही. तेव्हा हे मराठीचे तथाकथित संजय राऊत नावाचे कैवारी कोणत्या बिळात लपले होते? यावेळी राज्य सरकारने केवळ राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ लागू करण्याच्या दृष्टीने जारी केलेल्या शासन निर्णयावर आता छाती बडवत बाहेर आले, हे ढोंगी.

बरं आज हिंदी अनिवार्य का केली असा डांगोरा पिटणाऱ्या या शॉर्ट टर्म मेमरी लॉस लोकांना एका गोष्टीची आठवण करून द्यावीशी वाटते. यांचे मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई यांनी ६ फेब्रुवारी २०२० रोजी देशाचे गृहमंत्री अमित शाह यांना महाराष्ट्रात त्रिभाषा सूत्राची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत एक पत्र लिहिलं होतं. त्यात त्यांनी इंग्रजी आणि हिंदी भाषेबरोबर मराठी भाषेचा प्रभावी वापर करण्यात यावा, यासाठी आपल्या स्तरावरून निर्देश देण्यात यावा, अशी मागणी केली होती. याचा अर्थ असा की, इंग्रजी आणि हिंदी अशा दोन भाषा पूर्वीपासूनच प्रचलित होत्या. आता राज्याने २०२० मध्ये केलेल्या सर्व शाळांमध्ये मराठी भाषा शिकविणे सक्तीचे करणाऱ्या कायद्याच्या पृष्ठभूमीवर, त्रिभाषा सूत्रानुसार इंग्रजी, हिंदी सोबत मराठी शिकविणे सक्तीचे करण्याबाबतचा उल्लेख शासन निर्णयात केला तर मग त्यात एवढा गहजब करण्याची गरज काय?

मुळात भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४३ मधील पहिल्या अनुच्छेदानुसार हिंदी भाषेला ''ऑफिशियल लॅंग्वेज ऑफ द युनियन'' असे स्पष्टपणे संबोधले आहे. आणि कलम ३४५ नुसार प्रत्येक राज्यातील भाषांना राजभाषांचा दर्जा दिला आहे. असे असताना केवळ शब्दांचा खेळ करत हिंदी ही राष्ट्रभाषा नाही, ती अनिवार्य करू नये, मराठी आमची भाषा आहे. हिंदीची सक्ती करू नये, हा अन्याय आहे, वगैरे वगैरे गोष्टी येतातच कुठून? घटनेने देशाची ऑफिशियल लॅंग्वेज कोणती ते स्पष्ट केले आहे. बहुतांश देशात इंग्रजी भाषा बोलली जाते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय भाषेचा दर्जा इंग्रजीला आहे. आणि राज्याची भाषा मराठीच आहे, यात वादच नाही. त्यामुळे त्रिभाषा सूत्रानुसार जर या तिन्ही भाषा शिकविल्या जात असेल तर, राज्यसभेवर हिंदी भाषी लोकांना पाठविणाऱ्या, मराठी कुटुंबांना मुंबई बाहेर हुसकावणाऱ्या, पत्राचाळीतील ६०० च्या वर कुटुंबांना बेघर करणाऱ्या, कोरोना काळात प्रवासबंदी असताना हिंदी भाषी वाधवान परिवाला मौजमजा करण्यासाठी फार्महाऊसवर जाण्याची सरकार स्तरावर विशेष परवानगी देणाऱ्या, हिंदी भाषी दारू कंपनी मालकासोबत पार्टनरशिप करणाऱ्या, उर्दूत कॅलेंडर छापणाऱ्या, केम छो वरळी, मुंबई मा जलेबी ने फाफडा, उद्धव ठाकरे आपडा अशा गुजरातीत घोषणा देणाऱ्यांना आज अचानक मराठीचा एवढा पुळका आलेला पाहिल्यावर आश्चर्यच वाटते. खरंतर मराठी माणूस, मराठी भाषा आणि मुंबईची चिंता या लोकांनी न केलेली बरी. कारण खरे मातृभाषी गद्दार हेच आहेत.

९२७०३३३८८६

## रामराज्यासाठीचे कार्यनियोजन

नुकतीच रामनवमी व रामाचे नवरात्र साजरे करण्यात आले. यामध्ये केवळ दिखावा म्हणून वा भंपकपणाच दिसून येतो. खरे तर रामाची पूजा कशी व कोणी करायची हे जाणून घेतले पाहिजे. केवळ रामाचेच चरित्र जाणनू घेऊन भागणार नाही तर रामांचे दास, रामांचे मित्र, रामांचे कुटुंब, रामांच्या आजूबाजूची परिस्थिती, रामांचे शत्रू सुद्धा जाणून घ्यायला पाहिजे.

राम या चैतन्याची सुरुवात करायच्या आधी वसिष्ठ ऋषींच्या कार्याची माहिती समजून घ्यावी लागेल. वसिष्ठ ऋषींनी प्रथम स्वयंशासित राज्यव्यवस्थेचा पुरस्कार केला. पण कालांतराने त्यात चुका जाणवायला लागल्या म्हणून त्यांनी मूल्याधिष्ठित राजसत्ता स्थापन करण्याचा निर्णय घेतला आणि सतत पाच पिढ्या एकाच राजघराण्यावर प्रयोग केले आणि पाचव्या पिढीत ते यशस्वी झाले, ती पिढी म्हणजेच राजा राम, जी राजसत्ता शिवाजी महाराजांपर्यंत सुरू होती. यामध्ये ऋषिमुनींद्वारे धर्माचे नियंत्रण राजा, राजाचे मंत्रिमंडळ व राजसत्तेवर असायचे. याचा अर्थच, राजानेसुद्धा चुका केल्यास दंड देण्याचा धर्माला अधिकार होता. म्हणून मूल्याधिष्ठित राजसत्ता. रामायणात ज्या तीन ऋषींचे मोठे योगदान आहे, ते म्हणजे वसिष्ठ, विश्वामित्र व अगस्ती ऋषी. रामरक्षेमध्ये एक श्लोक आहे, ''भो राम मामुद्धरः'', रामाने माझा उद्धार करावा पण केव्हा? तर जेव्हा मी रामाचा दास होईल तेव्हाच राम माझा उद्धार करतील. ''रामस्य दासोस्म्यह'' रामाची पूजा करायची तर हनुमान झाले पाहिजे, सीता झाले पाहिजे, लक्ष्मण, भरत, शबरी, बिभीषण, जटायू झाले पाहिजे. या दासांचे कार्य वाचावे लागेल व या सर्वांचे गुण मी अंगीकारून त्यांच्यासारखे कार्य केले तरच ही रामाची पूजा. तरच रामराज्य शक्य आहे, अन्यथा नाही.

**दि. मा. पांडे**/९४२२९५९५९०

## संविधानाच्या नावाखाली काँग्रेसची खोटी नाटके!

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून अनुसूचित जाती (एस. सी.), जमाती (एस. टी.) आणि मागासवर्गीयांना आरक्षणाचा हक्क दिला. पण काँग्रेस पक्ष, जो संविधान रक्षणाची वल्गना करतो, तेलंगणात एस. सी. आरक्षणाचे उपवर्गीकरण करून हा हक्क कमकुवत करत आहे. भाजप

वाचक पत्रे

संविधान संपवणार असा प्रचार करणारी काँग्रेस स्वतःच बाबासाहेबांचे स्वप्न धोक्यात आणत आहे. तेलंगणात काँग्रेसने एस. सी. आरक्षणाचे तीन उपवर्ग केले. यामुळे समाजात फूट पडेल आणि १३ टक्के आरक्षणाचा लाभ कमी होईल. योग्य उमेदवार नाही म्हणून राखीव जागा खुल्या प्रवर्गात जातील, ज्याचा फायदा सवर्णांना होईल. यापूर्वी राखीव जागा दुसऱ्या एस. सी. उपवर्गाला मिळायची; आता त्या सवर्णांच्या ताटात जातील. हा फोडा आणि राज्य कराचा कपटी डाव आहे. काँग्रेस भाजपाला आरक्षणविरोधी ठरवते, पण स्वतः उपवर्गीकरणाद्वारे आरक्षणावर कुरघोडी करते.

खाजगीकरणामुळे शासकीय नोकऱ्या आणि शैक्षणिक आरक्षण आधीच कमी झाले आहे. काँग्रेसकडे एकाच उपवर्गाला आरक्षणाचा लाभ मिळत असल्याची आकडेवारी नाही, तरीही उपवर्गीकरण का? जर काँग्रेसला खरंच मागासलेल्या उपवर्गांना न्याय द्यायचा असेल, तर आरक्षणाला धक्का न लावता त्यांची आकडेवारी गोळा करून विशेष योजना राबवाव्यात. मोफत शिक्षण, शिष्यवृत्ती, कौशल्य प्रशिक्षण यासारख्या सुविधांनी त्यांना मुख्य प्रवाहात आणता येईल. पण काँग्रेसने सवर्णहिताला प्राधान्य दिले. काँग्रेसच्या या बदमाशीमुळे बाबासाहेबांनी 'जळते घर' का म्हटले हे स्पष्ट होते. अनुसूचित जाती, जमाती आणि बहुजन समाजाने एकजुटीने या कपटी डावाला विरोध करावा. आरक्षणाला धक्का न लावता मागासलेल्या उपवर्गांना न्याय देण्यासाठी सरकारवर दबाव टाकावा.

**चंद्रशेखर देशभ्रतार**/९८३४७८४५२७

## राष्ट्रपती शासन हाच पर्याय

पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबादमध्ये झालेल्या हिंसाचाराच्या घटनेने प्रत्येक हिंदूचे हृदय पिळवटून निघाले आहे. अत्यंत क्रूरपणे जीवघेणा हल्ला, जाळपोळ झाल्यानंतर जीव वाचविण्यासाठी हिंदूंना पलायन करायला लावले. हे सर्व गरीब, मजूर व कष्टकरी वर्गातील होते. त्यांची घरे जाळली, कर्त्या पुरुषांना मारले, जखमी केले.

अशी घृणास्पद कृत्ये राजाश्रयाशिवाय शक्यच नाही. पोलिसांनी देखील बघ्याची भूमिका घेतली. हे हल्लेखोर बांगलादेशमधून मुद्दाम दंगा आणि जाळपोळ करण्यासाठी स्थानिक मुस्लिमांनी बोलावले होते, यात मुळीच संशय नाही. हा हल्ला अत्यंत सुनियोजित पद्धतीने घडवून आणला होता. या घटनेची निंदा करावी तेवढी कमीच आहे. ज्या हिंदूना या भयंकर घटनेची झळ पोहोचली ते सर्व भाजपचे समर्थक होते काय? तृणमूल, काँग्रेस किंवा कम्युनिस्ट पक्षाचे पण असू शकतात. पण पोलिसांच्या दडपशाहीपुढे कोणास न्याय मिळणार?

आजपर्यंत ३५० हून जास्त हल्लेखोरांना अटक झाली असून त्यांच्यावर काही कारवाई होईल अशी अपेक्षा करणे फोल ठरेल. प. बंगालमध्ये पुढील वर्षी विधानसभा निवडणुका आहेत. ममता बॅनर्जींना मुस्लिमांच्या मतांची गरज असल्याने त्यांना नाराज करणे म्हणजे पायावर कुऱ्हाड मारण्यासारखे आहे. ज्यांची मते घेऊन त्या राज्य करतात त्यांच्याकडून हिंदूंना न्याय मिळणे शक्य नाही. राज्यपाल महोदयांनी तिथल्या परिस्थितीवर माहिती घेण्यासाठी दौरा ठरविला तर ममता दीदींचा थयथयाट झाला आहे. प. बंगालच्या परिस्थितीवर केंद्र सरकारचे बारीक लक्ष असून आता राष्ट्रपती शासन लागू करून बांगलादेशमधून बेकायदेशीरपणे घुसखोरी करून आलेल्या १० लाख मुस्लिमांना परत पाठविल्यानंतरच शांतता प्रस्थापित होईल.

**संजय पाठक**/नागपूर


हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शरण्या चौगुले हिचे प्रज्ञाशोध परिक्षेत यश

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१९ एप्रिल -**



धाराशिव तालुक्यातील तेर येथील शरण्या रविराज चौगुले याने नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत घवघवीत यश मिळवले.

तालुक्यातील हिंगळजवाडी येथिल आयडीएल इंग्लिश शाळेत इयत्ता पहिली वर्गात शिकणार्या शरण्या रविराज चौगुले या विद्यार्थिनीने राज्यातून १८ वा क्रमांक आणि विभागातून १३ वा क्रमांक तर केंद्रात २ रा क्रमांक मिळवून उत्तीर्ण झाली. तिच्या या यशात वर्गशिक्षिका मिनाक्षी लोमटे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच त्याच्या यशामुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



### संक्षिप्त वृत्त...



## काँग्रेस नेत्यावर द्वेषपूर्ण खोटे गुन्हे दाखल

**उमरगा, दि.१९ एप्रिल -**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस देशाच्या नेत्या सोनिया गांधी व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी व इतर नेते मंडळींच्या विरोधात सत्तेचा दुरूपयोग करून त्यांच्या विरोधात चार्जशीट दाखल केलेले आहे. मोदी सरकारच्या या दडपशाही विरोधात धाराशिव जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करत उपविभागीय अधिकारी कार्यालयास निवेदन देण्यात आले. या निवेदनावर युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आश्लेष मोरे, काँग्रेस सरचिटणीस विजय वाघमारे, तालुका काँग्रेस अध्यक्ष अर्जुन बिराजदार, अभिषेक औरादे, ॲड.एस.पी.इनामदार, प्रफुल्ल गायकवाड, दिलीप सागर, अशोक पोद्दार, आदर्श कोथिंबीर, सोहेल इनामदार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## नवविवाहितांची आधार दुरुस्ती रखडली

**परंडा, दि.१९ एप्रिल -**
जिल्हा उपनिबंधक विवाह नोंदणी विभागाकडून सध्या मिळणारे प्रमाणपत्र आधारकार्ड दुरुस्तीसाठी चालत नसलेल्यामुळे आज विवाह झालेल्या नववधुच्या आधारकार्ड दुरुस्ती करता येत नसल्याने त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. शिवाय शासनाच्या विविध योजनापासून वंचित राहण्याची वेळ परंडा शहरातील नववधुवर आली आहे. परंडा शहरात विवाह झालेले वधुवर शासनाच्या नियमानुसार विवाह नोंदणी करण्यासाठी विवाह निबंधक यांच्या कार्यालयात जाऊन विवाह नोंदणी करतात पण शासनाच्या नियमानुसार बारकोड नसलेले प्रमाणपत्र देण्यात येते. पण त्या प्रमाणापत्र आधारे आधारकार्ड वरील नांव बदलणे होत नसल्याने नववधुना अनेक अडचणी येत आहेत परंडा तालुक्यातील ग्रामीण भागात विवाह नोंदणी केली तर बारकोड सह प्रमाणापत्र मिळते परंडा शहरात मिळत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांतुन नाराजी व्यक्त केली जात आहे. तेव्हा वरिष्ठ अधिकारी यांनी याकडे त्वरित लक्ष देवुन बारकोड असलेले प्रमाणापत्र देण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी केली जात आहे. विवाह निबंधक यांचेशी संपर्क केला असता त्यांनी बारकोड असलेले प्रमाणापत्र मिळत नाही हे मान्य केले. पण मी यासाठी वरिष्ठांना याची वेळोवेळी कल्पना दिली आहे. पण अजुन तरी परंडा शहरासाठी बारकोड मिळाला नसल्याने ऑफ लाईन प्रमाणपत्र देण्यात येत आहेत. लवकरच ऑनलाईन देण्यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

# पोलीस प्राधिकरणाच्या माध्यमातून ८ वर्षात ६२०० प्रकरणांचा निपटारा : उमाकांत मिटकरी

### महाराष्ट्र पोलीस प्राधिकरण न्यायिक सदस्य उमाकांत मिटकर यांची मिट द प्रेस...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ एप्रिल -**
महाराष्ट्र पोलीस प्राधिकरणाच्या मदतीने गेल्या ८ वर्षांमध्ये महाराष्ट्र राज्यातील ६२०० प्रकरणांचा निपटारा केला. आणि पीडित लोकांसाठी काम केल्याचा आनंद आपल्याला होतोय अशी माहिती महाराष्ट्र पोलीस प्राधिकरण न्यायिक सदस्य उमाकांत मिटकर यांनी मिट द प्रेस कार्यक्रमातून दिली. पत्रकार संघाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन मिटकर यांच्या हस्ते करण्यात आले. पोलीस प्राधिकरणा संदर्भात बोलताना मिटकर म्हणाले, २००६ मध्ये न्यायालयाच्या आदेशानंतर राज्यामध्ये पोलीस प्राधिकरण स्थापन करण्यात आले या माध्यमातून पीडित लोकांना न्याय देण्याचं काम अविरत सुरू आहे.



भटक्या समूहातील जमाती करिता मिटकर यांनी स्वत:ला वाहून घेतले होते. पालावरची शाळा हा त्या उपक्रमाचा एक भाग होता. भटक्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी, त्यांच्या उदार निर्वाह करिता, केलेले प्रयत्न आणि संघर्षमय भूतकाळाला मिटकरी यांनी उजाळा दिला. गेल्या २३ वर्षामध्ये केवळ निस्वार्थी वृत्तीने, पीडित लोकांसाठी केलेल्या कामाचा जीवनपट उमाकांत मिटकर यांनी माध्यम प्रतिनिधी समोर मांडला.

पोलीस अधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या तक्रारींचा महाराष्ट्र पोलीस प्राधिकरण मध्ये चौकशी, पडताळणी नंतर न्यायिक आदेश देण्याचे काम होते. गेल्या आठ वर्षाच्या काळामध्ये ६२०० प्रकरणांचा न्यायिक प्राधिकरणाने प्राधान्याने निफ्टारा केल्याचे मिटकर यांनी सांगितले. सध्या केवळ ८९ प्रकरणे विविध कारणास्तव प्रलंबित आहेत. प्राधिकरणाकडे तक्रार झाल्यापासून अवघ्या तीन महिन्यांमध्ये प्रकरण निकाली काढले जाते त्यामुळे, ज्या कोणाला या संदभार्तील आपले घराणे तक्रारी द्यायचे आहेत अशा तक्रप्रदारांनी केवळ साधा अर्ज प्राधिकरणाकडे पाठवल्यास त्याच्यावर कार्यवाही होते. जनतेने प्राधिकरणाच्या लाभ घ्यावा असे आवाहन देखील मिटकर यांनी केले. यावेळी पत्रकारांच्या विविध प्रश्नांना मिटकर यांनी समाधानकारक उत्तरे दिली. या कार्यक्रमाला जिल्हा पत्रकार संघ, धाराशिव जिल्हा मराठी पत्रकार संघ, व्हॉइस ऑफ मीडिया संघटनेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रवींद्र केसकर तर आभार गोविंदसिंह राजपूत यांनी मांडले. जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष देविदास पाठक आणि सरचिटणीस रवींद्र केसकर यांनी मिटकर यांचे स्वागत केले.

## जल व्यवस्थापन कृती पंधरवडा : उपसा सिंचनाच्या पाणी परवाना तक्रारीचे निवारण केले जाणार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ एप्रिल -**
जलसंपदा विभागाकडून १५ ते ३० एप्रिल दरम्यान जल व्यवस्थापन कृती पंधरवडाचे आयोजन केले आहे. त्याअंतर्गत जलसंपदा विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवा आणि विभागाव्दारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना याबाबत नागरिकांना अधिकाधिक माहिती प्राप्त होऊन त्यांना योग्य लाभ घेता यावा याकरिता तसेच त्याबाबत नागरिकांमध्ये जागरुकता वाढावी, शासनाबद्दल आणि शासनाच्या काम काजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृद्धींगत व्हावा,यासाठी विशेष मोहिम व लोकाभिमुख उपक्रम राबविले जात आहेत.



त्यानुषंगाने कार्यकारी अभियंता,धाराशिव पाटबंधारे विभाग क्र.१ धाराशिव या कार्यालयामार्फत जिल्यातील १ मोठा,११ मध्यम व ८६ लघु प्रकल्पाचे सिंचन व्यवस्थापन केले जाते.या प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांनी उपसा सिंचनाचे पाणी परवाने काढण्यासाठी नजिकच्या जलसिंचन शाखा कार्यालयात ७/१२,आठ-अ व विहीत नमुन्यातील अर्ज भरुन द्यावा.

तसेच उपसा सिंचनाच्या पाणी परवाना काढण्यासाठी उदभवाणा-या अडीअडचणी सोडविण्यासाठी तालुकास्तरीय पाटबंधारे कार्यालयात २२ एप्रिल रोजी तक्रारीचे निरसन केले जाणार आहे.तरी लाभक्षेत्रातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अ.ना.मदने कार्यकारी अभियंता, धाराशिव पाटबंधारे विभाग क्र.१ धाराशिव यांनी केले आहे.

### सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांचा वाढदिवस

## मांजरा (कंचेश्वर) शुगरने घेतले विविध सामाजिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**मंगरुळ, दि.१९ एप्रिल -**
तुळजापुर तालुक्यातील मंगरुळ येथील मांजरा शुगर इंडस्ट्रीज (कंचेश्वर) प्रा.लि. कारखान्यावर महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी तथा मांजरा शुगर इंडस्ट्रीजचे मार्गदर्शक दिलीपराव देशमुख यांच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधुन ७५ व्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी शिबीर, वृक्षारोपन व क्रिडा स्पर्धा अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यास कर्मचाऱ्यांकडून उत्स्फुर्तपणे प्रतिसाद मिळाला आहे.

सहकाराचे ऊर्जास्त्रोत सहकारी महर्षी दिलीपराव देशमुख यांचे अमृत महोत्सवानिमित्त दि.१८ शुक्रवार रोजी रक्तदान शिबीर, कर्मचाऱ्यांचे आरोग्य तपासणी शिबीर, वृक्षारोपन, शतायुष्यी लाभण्यासाठी आई तुळजाभवानी चरणी साकडे,हॉलीबॉल क्रिडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.



हॉलीबॉल स्पर्धेत प्रथम व व्दितीय आलेल्या संघास कारखान्याचे जनरल मॅनेजर सतीश वाकडे व जनरल मॅनेजर (टेक्नीकल) अजित कदम यांचे हस्ते ट्रॉफी देवून गौरविण्यात आले. रक्तदान शिबीरात एकुण ७९ रक्तदात्या कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले.

यावेळी भालचंद्र रक्तपेढी, लातुर यांचे डिंगाबर पवार, जनसंपर्क अधिकारी सुनील जहागीरदार, महेंद्रकुमार गांधले, हसन शेख, संजय ठाकुर, अन्सार शेख, सुरेखा हजारे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी कारखान्याचे जनरल मॅनेजर सतीश वाकडे, अजीत कदम, उत्तम व्हायकर, बाळासाहेब पेठे,व सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धाराशिवच्या कन्येला मिळाला रोहीत शर्माचा सन्मान करण्याचा मान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ एप्रिल -**
आयपीएलमधील मुंबई इंडियन्स आणि सनरायझर्स हैद्राबाद यांच्यात झालेल्या सामान्यात विजयी झालेल्या मुंबई इंडियन्स हा संघ विजयी ठरला. यात सामान्यात खेळाडू रोहीत शर्मा हा सुपर सिक्स ऑफ मॅच ठरला. त्यास एंजल वन या शेअर मार्केटमधील अग्रगण्य ब्रोकर्स कंपनीतर्फे देण्यात येणारे एक लाख रुपयेचे बक्षीस धाराशिव पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी संजय ढाकणे यांच्या कन्या श्रुती संजय ढाकणे यांच्या हस्ते देण्यात आले आहे.



एक सर्वसामान्य कुटुंबातील कन्येने एवढ्या मोठ्या पदावर जाऊन क्रिकेटमधील मोठ्या खेळाडूस बक्षीस देणे ही जिल्ह्याच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे. एंजल वन शेअर मार्केट कंपनीकडून महाराष्ट्रातून श्रुती संजय ढाकणे हिचे हा सन्मान करण्याचा मान मिळाला आहे.

## रक्तदान करून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अनोखे अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१९ एप्रिल -**
डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीच्या निमत्ताने डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, यशवंत नगर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी शहरातील ७५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिराचे उद्घाटन जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी माजी नगराध्यक्ष धनराज मंगरुळे, रशीद गुतेदार, महालिंग बाबशेट्टी, सतिश सावंत आदींची उपस्थिती होती. यावेळी मंडळाचे अध्यक्ष बसवराज हावळे, उपाध्यक्ष आशुतोष गायकवाड, सचिव अमित देडे, सहसचिव डॉ. अजिंक्य मुरूमकर, जिल्हा कृषी पणन तज्ञ अमित भालेराव, प्राचार्य आकाश गवई, माजी नगरसेविका संध्या सावंत, माजी नगरसेविका मीरा सोमवंशी, मुख्याध्यापिका उर्मिला तुपेरे, अश्विनी कांबळे, तृप्ती गायकवाड, आनंद कांबळे, किरण गायकवाड, आशिष गवई, उत्कर्ष गायकवाड, वैभव कांबळे, प्रशांत कांबळे, सुरज कांबळे, शुभम सावंत, अमर भालेराव, प्रविण सुर्यवंशी, मलकेश वाघमारे, किशोर सुरवसे, समीर सोमवंशी, विवेक भालेराव, प्रसाद बनसोडे, संतोष कांबळे, अभिजीत कांबळे आदींनी पुढाकार घेतला.

मातोश्री डीएमएलटी कॉलेजचे विद्यार्थी, श्रीकृष्ण रक्तपेढीचे डॉ. सागर पतंगे, विजय केवडकर, योगेश सोनकांबळे, किशोर खरोसे ऋतिक मेत्रे, अजय रोडगे, राहुल कांबळे आदींनी रक्त संकलनाचे काम पाहिले.

अशा समाज उपयोगी उपक्रमामुळे डॉ.आंबेडकर यांच्या समाजसेवेच्या विचारांना आणि मानवतेच्या मूल्यांना खऱ्या अर्थाने अभिवादन करण्यात आले. रक्तदानानंतर सहभागी रक्तदात्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

## लोहारा तालुक्यातील २८ विद्यार्थीनीना सायकलचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१९ एप्रिल -**
ग्रामीण भागातील विद्यार्थिनींसाठी शिक्षणाची ग्वाही देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम लोहारा तालुक्यात राबवण्यात आला. जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत असलेल्या २८ विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप जेम्स मुंबई, या सामाजिक संस्थेच्या वतीने करण्यात आले. यावेळी गोरगरीब होतकरू व गरजवत मुलींची तालुक्यातून निवड करून हा कार्यक्रम गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून घेण्यात आला विद्यार्थिनींसाठी सायकल वाटपाचे अनेक फायदे होणार आहेत. वेळेची बचत दूरवरून शाळेत पायी येणाऱ्या विद्यार्थिनींचा प्रवास वेळखाऊ होता. सायकलमुळे त्यांना शाळेत वेळेत पोहोचता येणार आहे.



ग्रामीण भागातील प्रत्येक मुलगी शिक्षणापासून वंचित राहणार नाही, यासाठी शिक्षण विभाग कटिबद्ध आहे. अशी ग्वाही गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार यांनी दिली यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तालुका प्रमुख अमोल बिराजदार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

त्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना सांगितले की, शिक्षण हा प्रत्येक मुलीचा हक्क असून, कोणत्याही अडचणीमुळे तिचे शिक्षण अर्धवट राहू नये. सायकल वाटपामुळे शाळेतील उपस्थिती वाढेल आणि ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या आयुष्याला चालना मिळेल.हा सायकल वाटप कार्यक्रम लोहारा येथील गटशिक्षण कार्यालयात संपन्न झाला. याप्रसंगी शिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार, शिवसेना उबाठा तालुकाप्रमुख अमोल बिराजदार, नगरसेवक प्रशांत काळे, विस्तार अधिकारी मुळजे, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष हरी लोखंडे, माजी ग्रामपंचायत सदस्य महबूब गवंडी, अनिल मोरे, नितीन जाधव, विश्वजीत चंदनशिवे, सुधीर घोडके, मल्लिकार्जुन कलशेट्टी, यांच्यासह अनेक पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

## नगर वाचनालयची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ एप्रिल -**
शहरातील प्रख्यात व जिल्हा अ वर्ग दर्जा असणारे नगर वाचनालयची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध पार पडली.

नगर वाचनालयाच्या कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ संपला असल्यामुळे कार्यकारी मंडळाने दिनांक २९ मार्च ते २७ एप्रिल या कालावधीत वाचनालयाचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेला होता. या कार्यक्रमानुसार संस्थेच्या अजीव सभासदाची यादी प्रसिद्ध करणे, यादीस हरकती व सूचना स्वीकारणे, अंतिम यादी प्रसिद्ध करणे, उमेदवारी अर्ज स्वीकारणे, उमेदवारी अर्जाची छाननी करून पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे, उमेदवारी अर्ज परत घेणे व अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे या सर्व प्रक्रिया पार पडल्या नंतर आज दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी अंतिम ११ उमेदवाराचे अर्ज राहिल्याने ही निवडणूक बिनविरोध घोषित करण्यात आली.

या नवीन कार्यकारी मंडळात बिनविरोध निवडून आलेल्या संचालक पुढील प्रमाणे आहेत.

नितीन शिवाजीराव तावडे, श्रीकांत गणपतराव साखरे, अंबादास हरिपंत दानवे, प्रा. सतीश सुखदेव कदम, शरद प्रभाकर मुंडे, प्रदीप नेताजीराव साळुंखे, प्रज्ञा सुरेश शेळके, आशिष ब्रिजलाल मोदानी, बालाजी शिवाजी तांबे, रमेश अर्जुन सूर्यवंशी व सुभाष महादेव पाटील अशी असून हे संचालक मंडळ बिनविरोध निवडून आले आहे.


## समाजकारणी, राजकारणी सर्वगुणसंपन्न व्यक्तीमत्व : श्री मनोज (बापू) जयप्रकाश पाटील

तुळजापूर तालुक्यातील बारूळ हे गाव सुसंस्कृततेचा आणि सामाजिक ऐक्याचा आदर्श मानलं जातं. या गावात जन्म घेऊन संपूर्ण तालुक्याच्या आणि राज्याच्या पातळीवर आपलं वेगळं स्थान निर्माण करणाऱ्या सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्त्वाचं नाव म्हणजे श्री.मनोज (बापू) जयप्रकाश पाटील. सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक आणि राजकीय कार्यामध्ये स्वतःला झोकून देणाऱ्या या व्यक्तीमत्त्वाचा २० एप्रिल २०२५ रोजी ५० वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. या खास दिवशी त्यांच्या कार्याचा मागोवा घेवून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त होत आहे.

श्री. मनोज बापू पाटील यांचा जन्म २० एप्रिल १९७५ रोजी बारूळ गावात झाला. त्यांच्या बालपणापासूनच त्यांच्यात एक दिलदार आणि कर्तव्यदक्ष व्यक्तिमत्त्व आकार घेत होतं. प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा, बारूळ येथे तर माध्यमिक शिक्षण लोणावळा येथील गुरुकुल हायस्कूलमध्ये आणि बारावीचे शिक्षण सोलापूरच्या दयानंद कॉलेजमध्ये झाले. त्यानंतर त्यांनी तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयातून सिव्हिल इंजिनीअरिंगमध्ये पदवी संपादन केली.

त्यांचे शिक्षण हे संघर्षमय होते. अत्यंत मेहनत, चिकाटी आणि स्वावलंबन याच्या जोरावर त्यांनी आपले स्वप्न पूर्ण केले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी मुंबईत बि.जे. शिर्के कन्स्ट्रक्शन कंपनीत इंजिनीअर म्हणून आपल्या व्यावसायिक जीवनाची सुरुवात केली. त्यानंतर शापूरजी-पालोनजी या नामवंत कंपनीत वरिष्ठ अभियंता म्हणून जबाबदारी सांभाळली.

सन २००६ मध्ये त्यांनी कतारमधील मेडगल्फ कंपनीत 'कन्स्ट्रक्शन मॅनेजर' म्हणून जबाबदारी स्वीकारली. त्यांनी आपल्या कामातील गुणवत्ता, कौशल्य आणि नेतृत्वगुण यांच्या जोरावर सतत प्रगती करत २०११ पासून "HOD - Civil Infra' या अत्यंत जबाबदार पदावर कार्यरत आहेत. परदेशात असूनही त्यांचं मन मात्र नेहमीच बारूळ गावातच असतं.



मनोज बापू यांचं जीवन म्हणजे समाजासाठी वाहिलेलं आयुष्य. गावात गणेशोत्सव, नाट्य स्पर्धा, क्रिकेट सामने, सांस्कृतिक कार्यक्रम, हरिनाम सप्ताह, ग्रामस्वच्छता मोहीम अशा विविध उपक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग असतो. ते केवळ सहभाग घेत नाहीत, तर स्वतः पुढाकार घेऊन संपूर्ण आयोजनही करतात.

विशेष म्हणजे, त्यांनी बारूळ आणि आजूबाजूच्या गावांतील तीस-ते चाळीस बेरोजगार, सुशिक्षित युवकांना स्वतःच्या ओळखीच्या जोरावर कतारमध्ये नोकरी मिळवून दिली. ही केवळ नोकरी नव्हती, तर त्या युवकांच्या संपूर्ण कुटुंबासाठी ती आर्थिक स्थैर्याची वाट ठरली. अनेकांना रोजगार मिळवून देणं ही त्यांची समाजसेवेतील मोठी देणगी आहे.

बारूळ गावावर त्यांचं प्रचंड प्रेम आहे. ते गावात आले की गोरगरिबांची विचारपूस, आर्थिक मदत, सामाजिक प्रश्नांची उकल करण्यासाठी तत्पर असतात. कोणत्याही प्रकारची मोठी माणसांची हवा न करता, सहजपणे प्रत्येकाशी संवाद साधणं, मदतीसाठी हात पुढं करणं ही त्यांची स्वाभाविक वृत्ती आहे. त्यामुळे ते गावातील प्रत्येक वर्गात आपलेपणा निर्माण करण्यात यशस्वी झाले आहेत.

शालेय जीवनापासूनच त्यांना सामाजिक, राजकीय, कला, नाट्य आणि क्रीडा क्षेत्रातील कामाची आवड होती. याच ओढीमुळे त्यांनी विविध कार्यक्रमांमध्ये नेतृत्व करत लोकांना एकत्र आणले. त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे आणि सकारात्मक दृष्टिकोनामुळे अनेक तरुणांना प्रेरणा मिळाली आहे.

त्यांना विविध विषयांच्या ग्रंथांचे वाचन करण्याची मोठी आवड आहे. ही वाचनसंपन्नता त्यांच्या विचारांमध्ये स्पष्टपणा आणि समाजप्रेम निर्माण करते. त्यांची वैचारिक भूमिका स्पष्ट असून प्रत्येक कामात समाजहितच हाच त्यांचा केंद्रबिंदू असतो.

मनोज बापू पाटील यांचा हा सुवर्णमहोत्सवी वाढदिवस केवळ एक व्यक्तीचा वाढदिवस नसून, त्या व्यक्तीमधील समाजसेवक, नेता, मार्गदर्शक आणि मित्र या साऱ्या पैलूंना सलाम करण्याची संधी आहे. बारूळ ग्रामस्थ आणि ग्रामपंचायततर्फे २० एप्रिल २०२५ रोजी त्यांचा जाहीर नागरी सत्कार आयोजिला जात आहे. हा सत्कार म्हणजे त्यांच्या कार्याला समाजाने दिलेली पावती आहे.

ग्रामदैवत श्री बाळेश्वर, श्री विठ्ठल रखुमाई आणि श्री तुळजाभवानी यांच्या कृपेने मनोज बापूंना आरोग्य, दीर्घायुष्य आणि बळ लाभो. त्यांच्या हातून अशीच समाजहिताची कामे घडोत आणि त्यांनी अनेकांच्या जीवनात प्रकाश टाकावा, हीच सदिच्छा.

**: शब्दांकन :**
**सोमनाथ शेटे**

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## महिलांना साडी वाटप करून अनाथ आश्रमात दिले भोजनदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ एप्रिल -** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बहुजन समाज पार्टीच्या वतीने २०० गरजू महिलांना साडे वाटप व खुषी ग्राम अनाथ आश्रममध्ये भोजनदान करण्यात आले. पूज्य भंते महाथेरो पय्यानंदजी यांच्या शुभहस्ते साड्यांचे वाटप करण्यात आले.

खुषी ग्राम अनाथ आश्रमामध्ये अन्नदान करण्यात आले. तसेच प्रत्येक जयंती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी बहुजन समाज पक्षाचे जिल्हा प्रभारी डॉ प्रा. अनिल कांबळे, जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ सूर्यवंशी, ज्योतीराम लामतुरे, कोषाध्यक्ष बामसेफचे सूर्यकांत कालेकर, बाळाराम मुंडे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रमेश ओहळ, मिलिंद धावारे, राजकुमार मरे, महेंद्र कांबळे, विनोद कोल्हे, साधूभाऊ गायकवाड, विलास चक्रे, आतिश मांजरे, सागर साखरे, करण ओहाळ, सुरेश आण्णा वाघमारे, ॲड. संघमित्रा ओव्हाळ, कलावती डूमने, प्रतीक्षा सूर्यवंशी, नरसिंग बोडके बाबुराव गोडबोले, सूर्यभान राऊत, गौतम सोनकांबळे आदींची उपस्थिती होती.





### संक्षिप्त वृत्त...

## बार्शी रस्त्यावर वाळलेल्या गवताला आग

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ एप्रिल -** शहरातील बार्शी रस्त्याच्या कडेच्या रिकाम्या जागेतील वाळलेल्या गवताला गुरुवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास अचानक आग लागली. बघता बघता सुटलेल्या वाऱ्यामुळे आग भडकण्यास सुरुवात झाली. अवघ्या १० मिनिटात घटनास्थळी येऊन अग्निशामक विभागाच्या पथकाने त्या आगीवर नियंत्रण मिळविले. यामुळे अनर्थ टळला.

लातूर शहराच्या एक नंबर चौक ते हुंडाई शोरुमच्या मधल्या भागात रिकामी जागा आहे. त्या जागेत झाडांसह वाळलेले गवत आहे. ती जागा कोणाची आहे, मागील अनेक वर्षांपासून ही जागा रिकामीच आहे. गुरुवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास अचानकपणे त्या रिकाम्या जागेतील वाळलेल्या गवताने अचानक पेट घेतला. उन्हाची काहिली सुरू होती. वारेही सुटले होते. यामुळे बघता बघता ही आग चांगलीच भडकण्यास सुरुवात झाली. काळ्या धुराचे लोळ आकाशात जाऊ लागले. तेवढ्यात महानगरपालिकेच्या अग्निशामक विभागाची एक गाडी घटनास्थळी दाखल झाली. जवानांनी तत्काळ पाण्याचे फवारे मारून आगीवर नियंत्रण आणले.

## ‘त्या’व्हायरल व्हीडीओची होणार चौकशी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ एप्रिल -** राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या औशाच्या उपनिरीक्षक दीक्षा सावळे यांचा अवैध दारु विक्रीसाठी पैसे घेतानाचा हा व्हिडिओ असल्याचे सांगितले जात आहे. नेमका हा प्रकार काय आहे, याच्या चौकशीचे आदेश राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक राऊत यांनी दिले आहेत.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पोलीस निरीक्षक दीक्षा सावळे या एका हॉटेलमध्ये पैसे घेतानाचा व्हिडिओ हा सोशल मिडियावर व्हायरल झाला आहे. अवैध दारु विक्रीसाठी हा हप्ता घेतल्याची चर्चा आहे. गुरुवारी हा प्रकार समोर आल्यानंतर या विभागाचे पोलीस अधीक्षक राऊत यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. याकरिता उपअधीक्षक मारुती मुपडे यांची नेमणूक केली असून शुक्रवारी त्यांनी घटनास्थळी जाऊन चौकशी केल्याचेही समजते. नेमके प्रकरण काय आहे? या संदर्भात दीक्षा सावळे यांचे म्हणणे काय? संबंधित हॉटेलधारकाचे म्हणणे काय याची चौकशी करुन मुपडे अहवाल हा पोलीस अधीक्षक राऊत यांच्याकडे सपूर्द करणार आहेत.

## आ.पवार यांच्या उपस्थितीत योगासन शिबीराचा समारोप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ एप्रिल -** राष्ट्रीय आर्यवीर दलाचे संस्थापक, योगगुरू डॉ.देवव्रत्तजी आचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली आर्य समाज मंदिर, लातूर येथे आर्षयोग प्रतिष्ठान, पतंजलि योग समिती, आर्य समाज मंदिर, जे.एस.पी.एम.लातूर व एम.एन.एस.बँक,लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या भव्य योगासन शिबीराचा समारोप दि.२० एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ५ वा आयोजित करण्यात आलेला आहे.

या शिबिराच्या समारोपला औसा विधानसभा मतदार संघाचे आमदार अभिमन्यू पवार यांची व माजी खासदार डॉ.सुनील गायकवाड यांची विशेष उपस्थित राहणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांची उपस्थिती राहणार आहे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर हे उपस्थित राहणार आहेत.

## लातूरचे माजी नगराध्यक्ष मधुकर कोकाटे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ एप्रिल -** लातूर : लातूर नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष मधुकर लक्ष्मणराव कोकाटे (वय ७७) यांचे गुरुवारी रात्री उशिरा अल्पशा अजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर येथील कोकाटे नगर येथील फार्महाऊसवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

मधुकर कोकाटे हे लोकनेते विलासराव देशमुख यांचे निकटवर्तीय ओळखले जात होते. १९८५ ते २००१ या काळात तीन वेळा लातूर नगरपरिषदेचे नगरसेवक राहिले होते.

# अट्टल चोराला बेड्या; १६ मोबाइल जप्त

### तीन गुन्ह्यांची उकल; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ एप्रिल -** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अट्टल चोराला बेड्या ठोकून २ लाख ८० हजार रुपये किमतीचे १६ मोबाइल जप्त केले आहेत. यातून मोबाइल चोरीचे तीन उघडकीस आले आहेत.

लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीमध्ये चोरट्यांनी अनेक घरातून आणि दुकानांतून मोबाइल चोरीच्या घटना घडल्या होत्या. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे आणि अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तयार करून नमूद गुन्ह्यांचा तपास करण्यात येत होता. बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीचे तांत्रिक विश्लेषण करून आरोपींचा शोध घेण्यात येत होता. दरम्यान, नमूद चोरीतील आरोपी चोरलेले मोबाइल विकण्यासाठी बाभळगाव चौक परिसरात येणार असल्याची माहिती मिळाली.

सदर पथकाने तत्काळ त्या परिसरात सापळा लावून संशयित आरोपी महादेव दिलीप सन्मुखराव (वय २२, रा. राजीवनगर, बाभळगाव रोड, लातूर) याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी करण्यात आली. त्याच्या हातामध्ये असलेल्या पिशवीची झडती घेतली असता, पिशवीत १६ मोबाइल आढळून आले. सदर मोबाइल लातूर जिल्ह्यातील विविध ठिकाणांहून चोरी केल्याची कबुली दिली. यातून गांधी चौक पोलीस ठाण्यातील दोन व शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल एक अशा तीन गुन्ह्यांची उकल झाली. आरोपी महादेव सन्मुखराव याच्याकडील चोरलेले २ लाख ८० हजार ४९९ रुपये किंमतीचे एकूण १६ मोबाइल जप्त करण्यात आले. पुढील कारवाईसाठी आरोपीला गांधी चौक पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

या कारवाईत वरिष्ठांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार तुळशीराम बरुरे, योगेश गायकवाड, सूर्यकांत कलमे, राजेश कंचे, गणेश साठे, चालक पोलीस अंमलदार, प्रदीप चोपणे, चंद्रकांत केंद्रे यांनी ही सेवा बजावली.



## माजी मंत्री देशमुख यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ एप्रिल -** माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस शुक्रवारी लातूर शहर काँग्रेसच्यावतीने विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमाने साजरा करण्यात आला.

शुक्रवारी सकाळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे कामगारांना उन्हापासून संरक्षणासाठी टोप्या वाटप केल्या. यानंतर ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर मंदिरात ‘श्रीं’चा अभिषेक करून आरती केली. त्यानंतर ग्रामदैवत सुरत शहावली दर्गा येथे चादर अर्पण केली व गंजगोलाई येथील आई जगदंबेच्या मंदिरात जाऊन जगदंबा मातेची आरती केली.

यानंतर कोल्हेनगर येथे नेत्ररोग तपासणी शिबिर घेण्यात आले. यावेळी गरजू रुग्णांना चष्मे वाटप करण्यात आले.

यावेळी लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा विलास साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन वैजनाथ शिंदे, रेणा साखर कारखान्याचे माजी चेअरमन आबासाहेब पाटील, काँग्रेसचे शहराध्यक्ष ॲड. किरण जाधव, गोरोबा लोखंडे, ॲड. समद पटेल, ॲड. कालिदास देशपांडे, सचिन बंडापल्ले, दगडू मिटकरी, चंद्रकांत धायगुडे, कैलास कांबळे, ॲड. फारूक शेख, अशोक भोसले, संभाजी सूळ, पृथ्वीराज सिरसाठ, विजयकुमार साबदे, बाप्पा मार्डीकर, आसिफ बागवान, संजय म्हेत्रे, ॲड. किसन शिंदे, ॲड. गोपाळ बुरबुरे, यशपाल कांबळे, अभिषेक पतंगे, नबी नळेगावकर, विष्णुदास धायगुडे, बालाजी झिपरे, पवन सोलंकर, अभिजित इगे, कुणाल वागज, तनुजा कांबळे, जफर पटवेकर, तबरेज तांबोळी, रईस टाके, ॲड. गणेश कांबळे, लक्ष्मण मोरे, मैनू शेख, प्रमोद जोशी आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## २५ वर्षानंतर वर्गमित्रांचा स्नेहमेळावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ एप्रिल -** दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील १९९९ च्या बॅचने शिक्षण पूर्ण होऊन २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्याने रौप्य महोत्सवी स्नेहमेळाव्याचे भव्य आयोजन केले. या प्रसंगी गुरुजनांचा यथोचित सन्मान करण्यात आला, तसेच दिवंगत शिक्षक व सहाध्यायींना श्रद्धांजली अर्पण करून जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते. उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे व पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमात माजी उपप्राचार्य विजयकुमार शिंदे, प्रा.दत्तात्रय पात्रे, प्रा. बळवंत उटीकर, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. अनिलकुमार माळी, प्रा. एस. आर. सलगर, प्रा. प्रकाश बांगड, प्रा. कडूबा गवई, प्रा. सी. ए. शिंदे, डॉ. दयानंद शिरुरे, प्रा. शांता कोटे, डॉ. देवेंद्र कुलकर्णी व डॉ. संदीपान जगदाळे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

डॉ. गायकवाड यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, दयानंद कला महाविद्यालय ही गुणवंत घडवणारी प्रयोगशाळा आहे. आपले माजी विद्यार्थी आज देशाच्या विविध क्षेत्रांत कार्यरत असून ते नव्या पिढीसाठी प्रेरणास्रोत ठरत आहेत. डॉ. नागरगोजे यांनी आपल्या भाषणात गुरुजनांच्या सन्मानाचे कौतुक करत ही परंपरा ऋणानुबंध वृद्धिंगत करणारी असल्याचे सांगितले. प्रारंभिक प्रास्ताविक अँड. वर्षा देशपांडे (पुणे) यांनी केले. सूत्रसंचालन शरद घुटे यांनी तर मनोगत रविराज राठोड, दत्तात्रय पुरी आणि प्रा. डॉ. संगीता भिसे, प्रमोद माळी यांनी व्यक्त केले. आभार प्रदर्शन किरण रायते यांनी केले.

कार्यक्रमात विविध गुणदर्शन, आठवणींचे सामायिकरण व सांस्कृतिक सादरीकरण झाले. यामुळे उपस्थित मंडळी क्षणभर का होईना, कॉलेजच्या त्या रम्य दिवसांत हरवून गेली.

## आमदार अमित देशमुख यांच्याकडून बनसोडे कुटुंबीयांचे सांत्वन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ एप्रिल -** लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष दत्तात्रय बनसोडे गुरुजी यांचे नुकतेच निधन झाले. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आणि लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सायंकाळी लातूर तालुक्यातील गंगापूर येथे जाऊन दत्तात्रय बनसोडे गुरुजी यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

तसेच कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले आणि त्यांना धीर दिला.



यावेळी सुमित दत्तात्रय बनसोडे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन रवींद्र काळे, चंद्रशेखर दंडीमे, डॉक्टर सतीश कानडे, तानाजी फुटाणे, भास्कर पाटील, बालाजी भिसे आदींसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, बनसोडे कुटुंबीय आणि मित्रपरिवार उपस्थित होते.

## ‘कॉक्सिट’मध्ये पदवीधरांसाठी ‘टीसीएस’च्या कॅम्पस मुलाखती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ एप्रिल -** मागील दोन वर्षांत पदवी उत्तीर्ण करून नोकरीच्या शोधात असलेल्या व येणाऱ्या शैक्षणिक वर्षात पदवी पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी येथील कॉक्सिट महाविद्यालयात आयटी क्षेत्रातील नामांकित टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) कंपनीच्यावतीने कॅम्पस मुलाखतीचे शनिवारी (दि.२६) आयोजन करण्यात आले आहे. सर्वच महाविद्यालयांतील पदवीधर विद्यार्थ्यांना या मुलाखती देता येणार आहेत.

‘टीसीएस’ या नामांकित आयटी कंपनीत नोकरीसाठी विद्यार्थ्यांची भरती करण्यात येणार आहे. कंपनीतर्फे बीएस्सी ॲग्री व हॉर्टिकल्चर या अभ्यासक्रमांचे पदवीधर वगळता २०२३, २०२४ मध्ये पदवी उत्तीर्ण झालेले व येणाऱ्या २०२५ या शैक्षणिक वर्षात पदवीधर होणाऱ्या विद्यार्थ्यांना या मुलाखती देता येणार आहेत.

सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचे वय १८ ते २८ वर्षे असावे. यासाठी शनिवारी (दि.२६) सकाळी ८.३० वाजता कॉक्सिट महाविद्यालयात उपस्थित राहावे. प्रारंभी विद्यार्थ्यांची नोंदणी होणार आहे. त्यानंतर ‘टीसीएस’चे व्यवस्थापक मुलाखतीसंदर्भात माहिती देतील. त्यानंतर ५० गुणांची गणित, बुध्दिमत्ता व इंग्रजी या विषयांची परीक्षा घेतली जाणार आहे. लगेच उत्तरपत्रिका तपासून, त्यांचे गुण सांगण्यात येणार आहेत. पात्र विद्यार्थ्यांच्या मुलाखती होऊन पात्र विद्यार्थ्यांना नोकरी निवडीचे पत्र देण्यात येणार आहे. यासाठी ‘कॉक्सिट’मध्ये मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्र व कर्नाटक, तेलंगणाच्या सीमावर्ती भागातील विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

‘कॉक्सिट’मध्ये विविध आंतरराष्ट्रीय आयटी कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखती घेण्यात येतात. त्यासाठी ‘कॉक्सिट’च्या ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाने विविध कंपन्यांसोबत करार केले आहेत. यातूनच ‘टीसीएस’ने पदवीधरांसाठी या मुलाखतीचे आयोजन केले आहे. पात्र विद्यार्थ्यांनी मुलाखतींचा लाभ घेऊन नोकरीस पात्र ठरण्याचे आवाहन रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम. आर. पाटील, उपाध्यक्ष एल. एम. पाटील, प्राचार्य डॉ. विनायक जाधव आदिंनी केले आहे.



## दिलीपराव देशमुख यांनी केली सपत्नीक साई मंदिरात महापूजा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ एप्रिल -** माजी मंत्री, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त माजी मंत्री दिलीपराव देशमुख व सुवर्णाताई देशमुख यांनी शहरातील विशालनगर येथील श्री साई मंदिर आणि चिंचोलीराव वाडी येथील मांजरेश्वर हनुमान मंदिर येथे दर्शन घेतले. महापूजा, अभिषेक केला व मनोभावे प्रार्थना करत आशीर्वाद घेतले.

यावेळी अनंत गाडे, बळवंत काळे, विकास देशमुख, हरिराम कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी साई मंदिर, मांजरेश्वर हनुमान मंदिर ट्रस्टच्यावतीने शाल, श्रीफळ देऊन दिलीपराव देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी मंदिर ट्रस्टच्या संचालकांसह भाविक-भक्त, काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## भाजपा युवा मोर्चाचा काँग्रेस भवन समोर आंदोलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ एप्रिल -** देशभरात चर्चेचा विषय ठरलेल्या नॅशनल हेरॉल्ड ९० कोटी मनी लॉन्ड्रिंग प्रकरणावरून काँग्रेस पक्ष आणि त्यांच्या नेत्यांविरुद्ध आज लातूरमध्ये तीव्र आंदोलन छेडण्यात आले. भाजप युवा मोर्चाच्या वतीने गांधी चौक येथील काँग्रेस भवनसमोर निषेध आंदोलन करण्यात आले.


या आंदोलनाचे नेतृत्व लातूर शहर युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष ॲड. गणेश गोमचाळे आणि लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे यांनी केले. आंदोलनादरम्यान काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांच्यावर जोरदार टीका करत भ्रष्टाचारमुक्त भारत निर्माण करण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास प्रदेश उपाध्यक्ष व मराठवाडा समन्वयक अरुण पाठक, प्रदेश सचिव दत्ता चेवले, तसेच प्रदेश सचिव युवराज पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यासह लातूर शहर व ग्रामीण जिल्ह्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

यावेळी सरचिटणीस विनय जाकते, गजेंद्र बोकन, राहुल भुतडा, आकाश बजाज, पंकज शिंदे, अरुण ढवळे, अरुण जाधव, पांडुरंग बोडके, बालाजी पिंपळे, संतोष तिवारी, मंगेश माने, लखन कावळे, अशरफ पठाण, आकाश जाधव, अमोल अंकले, रामेश्वर चावरे, शरद पांचाळ, योगेश घोरपडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते. युवकांनी घोषणाबाजी करत काँग्रेसच्या भ्रष्टाचाराचा जाहीर निषेध केला. आंदोलनादरम्यान संपूर्ण परिसरात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

# ट्रकने दुचाकीला उडवले; दोन जण ठार, पादचारी जखमी

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर, दि.१९ एप्रिल-**

अर्धापूर-वसमत रोडवर मालेगाव येथील जिजाऊ माँ साहेब चौकात भरधाव ट्रकच्या धडकेत दुचाकीवरील दोघे जागीच ठार झाले. तर एक पदचारी गंभीर जखमी झाला. ही घटना शुक्रवारी रात्री १० वाजेच्या सुमारास घडली. घटनेनंतर ट्रकचालक फरार झाला.


पंकज हिंगोले


सुजल धुतराज

कासरखेडा येथील पंकज माधव हिंगोले (२०), सुजल नागोराव धुतराज (१८, ह.मु., कासरखेडा, मुळ गाव सोनखेड) हे दुचाकीने घराकडे जात होते. अर्धापूर- वसमत रोडवर १८ एप्रिल रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास वसमत मार्गे जाणाऱ्या भरधाव ट्रक क्र. (जी.जे. ०१ के.टी. ९२४०) ची दुचाकी क्र. (एम.एच.२६. बी.वाय.२६७२) ला धडक बसली. यात पंकज हिंगोले, सुजल धुतराज या दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर घटनास्थळीचअसलेला एक पदाचारी प्रमिल प्रभाजी इंगोले (१८ रा. कासरखेडा) हा या घटनेत गंभीर जखमी झाला. त्यास नांदेड येथे उपचारासाठी पाठविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करून दोघांचेही प्रेत मालेगाव ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले. यावेळी घटनास्थळी महामार्ग पोलिस आदित्य लाकूळे, हनुमंत बोईनवाड, महेश तळेकर, अनिल मोपडे जाहिरोद्दीन फारुकी, संदीप चटलेवार, सुनील पवळे, वसंत शिनगारे यांनी मदतकार्य करत वाहतूक सुरळीत केली.

# बारड नागेली रस्त्याचे बेहाल; गुत्तेदार मालामाल



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि.१९ एप्रिल-**

मुदखेड तालुक्यातील चेनापुर-नागेली ते मुगट स्टेशन २१ किलोमीटर रस्त्याचे काम सुरू आहे. या कामासाठी १० कोटी रु. निधी मंजूर करण्यात आला आहे. परंतु रस्त्याच्या डागडुगीचे काम अत्यंत दर्जाहीन केले जात असल्याचा टाहो नागरिकांनी फोडला आहे. त्यामुळे संबंधित रस्त्याच्या बोगस कामात सार्वजनिक बांधकाम विभागाचे हात मलीन असून टक्केवारीच्या खेळात गुत्तेदार बोगस रस्ते निर्माण करून विकासाला खिळ घालत असल्याने याकडे खा. अशोक चव्हाण यांनी लक्ष द्यावे अशी प्रतिक्रिया उत्तमराव लोमटे बारडकर यांनी माध्यमांना बोलताना दिली आहे. त्यामुळे तालुक्यात सध्या सर्वच रस्त्यांचे बेहाल असून गुत्तेदार मालामाल होत असल्याची चर्चा रंगली आहे.

यापूर्वी बारड ते नागेली या रस्त्याचे काम मागील वर्षीच करण्यात आले होते. नागेली व बारडमध्ये अनेक पुढारी असूनही रस्त्याचे काम बोगस व तातडीचे खड्डे कसे? असा संतप्त सवाल नागेलीवासियांनी केला आहे. निवडणुकीच्या काळात दर्जेदार रस्ता करण्याचे आश्वासन खा. अशोक चव्हाण यांनी दिले होते. परंतु आता रस्त्यासाठी आता १० कोटी रुपयांचा भरीव निधी येऊनही रस्ता दर्जेदार का होत नाही? असा प्रश्न निर्माण झाला आहे. चेनापूर - नागेली - बारड - मुगट स्टेशन - आमदुरा - रोही पिंपळगाव - पिंपळकोठा - सिंधी पर्यंत दर्जेदार नूतनीकरणासाठी निधी प्राप्त झाला आहे.

बारड ते नागेली रस्त्याच्या कामात गिट्टीचा तसेच डांबराचा अत्यंत कमी वापर असून फुफुर्ड्यावरच गिट्टी अंथरली जात आहे. त्यामुळे अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याने ग्रामस्थांनी रस्त्याचे काम बंद केले होते. यानंतर संतप्त ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने खा. अशोक चव्हाण यांची भेट घेऊन कामाची तक्रार केली आहे.

**गुत्तेदारीचा व्यवसाय तेजीत : उत्तमराव लोमटे**

सध्या गुत्तेदारीचा व्यवसाय तेजीत आहे.



नेतेही दुर्दैवाने कार्यकर्त्यांनाच कामाचे कंत्राट देत आहेत. यामुळे कामाचा दर्जा घसरत चालला असून टक्केवारी जोमात आहे. वाढली आहे. अधिकारीही बघ्याची भूमिका घेत असल्याने त्यांचेही खड्ड्यात हात मलीन असल्याची चर्चा असल्याचे भाजप कार्यकर्ते उत्तमराव लोमटे म्हणाले.

**सरकारकडे डांबर नाहीये का?: कैलास आमदुरकर**



रस्त्याच्या कामात डांबर अत्यल्प आहे. रस्ता साफ न करता फुफुर्ड्यावर गिट्टी अंथरली जात आहे. त्यामुळे सरकारकडे डांबर नाहीये का?असा प्रश्न भाजपा ओ. बी. सी. सेल माजी तालुकाध्यक्ष कैलास आमदुरकर यांनी उपस्थित केला आहे.

**बोगस रस्त्याला नेतेही कारणीभूत : भगवानराव राठोड**



या बोगस रस्त्याला केवळ गुत्तेदार कारणीभूत नसून नेतेही कारणीभूत आहेत. निवडणुका हायजॅक करण्यासाठी असे बोगस रस्ते करावे लागत असल्याचा टोला युवा कार्यकर्ता भगवानराव राठोड यांनी लगावला.

**विकास निधीवरच राजकिय लोकांचे पोट पाणी :भगवान पवार**



राज्यात सध्या निधी हा विकासासाठी नसून राजकीय लोकांच्या पोटापाण्याचा विषय बनला आहे. केवळ विकासाला खिळ बसली नसून राजकीय विचारांनाच खिळ बसली असल्याचे काँग्रेस तालुका सविच भगवान पवार निवघेकर म्हणाले.

## संक्षिप्त वृत्त

### श्री क्षेत्र राहेर येथे २० एप्रिल पासून श्री चक्रधर स्वामी व दत्तात्रेय प्रभू यात्रेला प्रारंभ

**नरसी -** तालुक्यातील श्री क्षेत्र राहेर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री चक्रधर स्वामी व दत्तात्रेय प्रभू यात्रेनिमित्त दि. २० एप्रिल रोजी सायंकाळी भव्य पालखी सोहळा संपन्न होणार असून या कार्यक्रमाला कवीश्वर कुलाचार्य महंत श्री खामनेकर बाबा श्रीक्षेत्र कनाशी हे उपस्थित राहणार आहेत तर दि.२१ रोजी जंगी कुस्त्यांचा सामना रंगणार आहे. श्री क्षेत्र राहेर हे संपूर्ण देवाचे माहेर म्हणून सबंध महाराष्ट्रामध्ये ओळख असून याच पवित्र पावनभूमी मध्ये श्री चक्रधर स्वामी व दत्तात्रेय प्रभू यात्रेनिमित्त भव्य पालखी सोहळा व जंगी कुस्त्यांचा सामना यांचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहामध्ये श्री क्षेत्र राहेर येथे श्री महानुभाव पंथीयांचे श्रद्धास्थान असलेले मोठे स्थान असून व नव्याने बांधण्यात आलेले श्री चक्रधर स्वामी यांचे भव्य मंदिर आहे. या यात्रेसाठी राज्यातील भाविक भक्त मोठ्या संख्येने दरवर्षी येत असतात व हजारो भांविक भक्ती भावाने या यात्रेच्या निमित्ताने श्री चक्रधर स्वामी यांच्या चरणी मलीन होण्यासाठी येत असतात. ही यात्रा तीन ते चार दिवस सातत्याने चालू राहते आणि दररोज हजारो भाविक श्री चक्रधर स्वामींच्या दर्शनासाठी येत असतात. या यात्रेच्या निमित्ताने दि. २० एप्रिल रोजी सायंकाळी राहेर व परिसरातील भाविकांनी महानुभाव पंथीयांचा ध्वज पताका खांद्यावरी घेऊन गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला चा नामाच्या गजरात राहेर येथे पवित्र पावन भूमी मध्ये घेऊन येत असतात. सदर सोहळ्याच्या निमित्ताने जंगी कुस्त्यांचा सामना ठेवण्यात आला असून यामध्ये महाराष्ट्रातील नामवंत व दिग्गज पैलवानांची उपस्थिती लाभणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही शांततेत कुस्त्यांचे सामने रंगणार असून यात पूर्व नियोजन मंदिर समिती व समस्त राहेर ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. या भव्य पालखी सोहळ्याला व कुस्त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन राहेर ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

### प्रा. रविंद्र सोनकांबळे यांना पी.एचडी. प्रदान

**नांदेड -** उषाताई धोडगे पत्रकारिता महाविद्यालयाचे प्रा. रविंद्र पुंडलिकराव सोनकांबळे दापशेडकर यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने (Mass Communication amp; Journalism) पत्रकारिता या विषयात पीएच.डी (Ph.D) प्रदान केली आहे. त्यानी संत कबीर यांच्या दोहयातुन साधलेला लोकसंवाद : एक विश्लेषणात्मक अभ्यास या विषयावर डॉ. सुहास पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली शोधप्रबंध सादर केला. प्रा. रविंद्र सोनकांबळे दापशेडकर यानी संत कबीर यांचे दोहे समाजात जीवन जगतांना अंत्यत उपयुक्त आहेत याचा विस्ताराने अभ्यास केला असून संत कबीर यांच्या दोहयातुन सामाजिक, सांस्कृतीक अभ्यास अधोरेखित केले आहे. विद्यापीठाच्या माध्यम शास्त्र संकुल विभागात त्यांची मौखिक परीक्षा पार पडली . यावेळी महात्मा गांधी सेंन्ट्रल विद्यापीठ बिहार चे असिस्टंन प्रो. सुनिल घोडके, स्वारातीम विद्यापीठाच्या अंतर विद्याशाखेचे अधिष्ठता डॉ. सि.आर. बाविंस्कर, माध्यम शास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजेद्र गोणारकर,डॉ. दीपक शिंदे, कांचन सोनकांबळे, गौतम सोनकांबळे धानोरकर , ॲड. प्रयाग दिग्रसकर आदी उपस्थित होते. या यशाबदृल उषाताई धोडगे पत्रकारिता महाविद्यालयाचे सचिव अनिल शेळके,अध्यक्ष मनोज मोरे, उपसंपादक अनुराग पवळे, उपसंपादक संभाजी सोनकांबळे, आवृत्तीप्रमुख डॉ. गणेश जोशी, संपादक सतिश सोनवणे, संपादक रमेश चित्ते, डॉ. विकास कदम, यशवंत थोरात, प्रकाश कळकेकर, रणवीर दंडेकर,शिवाजी माळेगावे, उमाकांत वन्नशेटे, रघुनाथ कदम, प्रा.अमोल धुळे, प्रा.प्रविण सेलुकर, नागेश आटकोरे, राष्ट्रपाल सरोदे, प्रीतम लोणीकर, प्रा.संजय नरवाडे आदीनी स्वागत केले.




### अभियांत्रिकी महाविद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**नवीन नांदेड-**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व सामाजिक समता सप्ताहाचे औचित्य साधून श्री गुरु गोबिंदसिंघजी अभियांत्रिकी आणि तंत्रशास्त्र संस्था, नांदेड येथे बुधवार, दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६ वा एक विचारप्रवर्तक आणि प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित करून महामानवास अभिवादन करण्यात आले. जयंती महोत्सवात प्रारंभी भगवान बुद्ध, छ. शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमा पूजनाने व भारतीय संविधानाच्या उद्देशिकेच्या सामूहिक वाचनाने झाली. यानंतर कार्यक्रमाचे मुख्य संयोजक डॉ माधव वैद्य यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली. सामाजिक समता सप्ताहाच्या निमित्ताने संस्थेमध्ये आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांची त्यांनी माहिती दिली. यामध्ये विद्यार्थ्यांनी निबंध लेखन, प्रश्नमंजुषा, चित्रकला, आणि पोस्टर सादरीकरण अशा विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट उलगडून दाखवत माता रमाई आंबेडकर यांनी आयुष्यभर केलेला त्याग उपस्थितीतांना पटवून दिले.याप्रसंगी पस्थिता भावनीक झाले.या कार्यक्रमाचे सूत्र संचलन आदित्य, स्नेहा मल्हारे, अबोली भास्करे यांनी अत्यंत प्रभावीपणे पार पाडली. या प्रसंगी डॉ. जे. व्ही. मेघा, प्रा एस. बी. देठे, डॉ दीपक वागरे, डॉ. गणेश पाकले, डॉ. आरती मांजरमकर, डॉ. प्रा. राजपाल चिखलिकर, डॉ घोडेवाडीकर, डॉ. वाहिद देशमुख, डॉ. संदीप मुंढे यांसह अनेक प्राध्यापक, कर्मचारी व शेकडो विद्यार्थी उपस्थित होते. सलरिल कार्यक्रम यशस्वीतेसाठी संपूर्ण प्राध्यापाक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. डॉ. मिलिंद भालेराव आणि डॉ. अरुण पाटील यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले, तर चंपतराव कांबळे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देत आयोजनात मोलाची भूमिका बजावली.

### दत्ता दर्शनवाड यांचे निधन

**मुदखेड-** मौजे मोहपूर ता. किनवट जि. नांदेड येथील जेष्ठ नागरिक दत्ता सटवा दर्शनवाड यांचे वर्धापकाळाने निधन झाले, मृत्यू समय यांचे वय १०३ वर्षाचे होते, त्यांच्या मागे तीन मुले एक मुलगी नातू पंतू असा मोठा परिवार आहे. त्यांच्या राहत्या गावी आज दि.१९ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता त्यांचे अंत्यसंस्कार करण्यात येईल. माजी शिक्षक चंद्रकांत दर्शनवाड व आश्रम शाळेचे अधीक्षक मारुती दर्शनवाड त्यांचे वडील तर पत्रकार संतोष दर्शनवाड यांचे आजोबा होत.



# रेल्वे विभागाने मोठया भुयारी पुलाचे काम त्वरित चालू करावे : आ. केराम



**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि.१९ एप्रिल-**

सरस्वती कॉलनी परिसर व पुढे सात ते आठ गावांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्यावरील रेल्वे गेट वर केंद्र शासनाच्या धोरणानुसार रेल्वे गेट काढून त्या ठिकाणी छोट्या भुयारी पुलाचे काम सध्या चालू असून किनवट ते अंबाडी स्थानका दरम्यान असलेल्या या भुयारी पुलाच्या ऊंची, रुंदी बाबत स्थानिक नागरीकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी रेल्वेच्या मागणीनुसार दोन भुयारी पुलांच्या बांधकामासाठी सर्व बाजु बघुन ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे. दुसरे भुयारी पुलाचे निविदा अद्यापही काढली नाही. वाहतूकीची अडचण व नागरिकांची गैरसोय लक्षात घेता रेल्वे विभागाने मोठ्या भुयारी पुलाचे काम तातडीने हाती घ्यावे अशी मागणी आ. भीमराव केराम यांनी रेल्वे प्रशासनाकडे केली आहे.

या बाबत सविस्तर असे की,जवळपास गेल्या दिड दशकापासूनची ही जुनी मागणी असुन त्यानुसार दक्षिण मध्य रेल्वे नांदेड विभागाकडून जिल्हाधिकाऱ्यांना एनओसी बाबत मागणी केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी ,ना हरकत प्रमाणपत्र दि८/८/२०२४ रोजी दिले आहे. रेल्वे गेट ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी लहान भुयारी पुल(कि.मी.११७/२-३ या ठिकाणी) व पुढे मोठ्ठे पुल (कि.मी.११७/६-७या ठिकाणी) अवजड वाहनांसाठी असे दोन पुलाचे निर्माण होणे आवश्यक आहे.प्रथम मोठ्या ब्रिजची बांधकाम पूर्ण करून किनवट शहराकडे पूर्व भागातून येणाऱ्या रहदारी या भुयारी पुलातुन चालू केल्यानंतरच रेल्वे गेट बंद करून ,त्या ठिकाणी छोटे भुयारी पुलाच्या कामाला प्राधान्य द्यावे अशी मागणी लोकप्रतिनिधीनी लावून धरली होती परंतु याकडे दुर्लक्ष करून मोठ्या भुयारी पुलाची अद्याप निविदाही न काढता थेट रेल्वे गेट बंद करून छोट्या भुयारी पुलाचे काम चालू केल्याने सरस्वती कॉलनी हेडगेवार कॉलनी, बेलोरी, मांडवा ,नागझरी,नागझरी कॅम्प ,वंजारवाडी, हटकरखोरी इत्यादी गावातील जनतेला दैनंदिन कामासाठी किनवटला ये- जा करणे अत्यंत जिकरीचे बनले आहे.पर्यायी मार्गाची व्यवस्था न केल्याने केल्याने महिला व मुलांना,जेष्ठ नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान आमदार भिमराव केराम यांनी या भुयारी मार्गाच्या कामावर जाऊन पाहणी केली व नांदेड रेल्वे विभागाचे व्यवस्थापक यांना याबाबत सविस्तर बोलून दुसऱ्या व अत्यावशक असलेल्या दुसऱ्या भुयारी पुलाच्या निर्मितीसाठी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव व महाव्यवस्थापक जैन सिकंदराबाद यांना पत्र पाठविले.

ही मागणी लवकर पूर्ण व्हावी यासाठी राष्ट्रीय जनजाती आयोगाकडेही रेल्वे बोर्डाच्या चुकीच्या कामाबद्दल पत्र देऊन मागणी केली आहे. दिनांक ७ एप्रिल २०२५ रोजी राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाकडे आमदार भीमराव केराम यांनी लेखी तक्रार केली आहे. राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाचे वरिष्ठ अन्वेषक गोवर्धन मुंडे यांच्या पाठपुराव्याने आमदार केराम यांनी दिलेल्या पत्रावर तात्काळ कारवाई करत आयोगाने ८ एप्रिल २०२५ रोजी नांदेड जिल्हाधिकारी व दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक जैन तसेच नांदेड विभागाचे व्यवस्थापक प्रदीप कमले यांना नोटीस बजावली आहे .या नोटिसीमध्ये १५ दिवसाच्या आत खुलासा मागविण्यात आला असून वेळेत उत्तर न दिल्यास समन्स जारी करण्यात येईल असा इशारा राष्ट्रीय अनुसूचित जनजातीय आयोगाने संबंधित तिन्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिला आहे .त्यानुसार रेल्वेच्या शासकीय यंत्रणांच्या हालचालींना वेग आला आहे.

# पैनगंगा नदी पात्रात पाणी सोडण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर, दि.१९ एप्रिल-**


हिमायतनगर तालुक्यातील पैनगंगा नदीपात्र कोरडेठाक पडले असल्यामुळे जनावरांसह नदीकाठावरील गावातील रहिवाशांना पिण्यासाठी पाण्याची भीषण संकट उभे राहिले आहे. पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने राखीय कोटपातील पाणी पैनगंगा नदीपात्रात पाणी सोडून जनावरांसह माणसाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवावा अशी मागणी गुरुवारी तहसीलदार यांच्याकडे नदीकाठच्या गावकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



हिमायतनगर तालुक्यातील पैनगंगा नदीपात्रासह, सिंचन विहिरी नदी, नाले कोरडेठाक पडले आहेत. त्यामुळे अनेक गावांमध्ये भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. गावोगावच्या महिला, पुरुषांना कामे सोडून पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे. एप्रिल महिना संपत असताना उन्हाची तीव्रता वाढत आहे. गुरुवारी बोरगडी, धानोरा, वारंगटाकळी, देवरंगा, मुरली व तसेच मंगरूळ या भागातील नागरिकांनी तहसीलदारांना निवेदन दिले. वरील नमूद गावांमध्ये सद्यस्थितीत पाणीटंचाई निर्माण झाली आहे. जिल्हाधिकारी यांनी तातडीने राखीव कोट्यातील पाणी पैनगंगा नदीपात्रात पाणी सोडून जनावरांसह माणसाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी वरील गावातील नागरिकांनी केली आहे. यावेळी विजय वळसे पाटील नितेश जैस्वाल, विजय वळसे पाटील, मुरली येथील सरपंच भिकू जाधव, रवींद्र शिंदे, पांडुरंग सुरोशे, सदाशिव कदम, प्रकाश हाके, श्रीराम सुदेवाड, नारायण देवकते, मधुकर ऐणेकर, प्रदीप राठोड, यांच्यासह सरपंच उपसरपंच सदस्य गावकऱ्यांनी मागणी केली आहे.

**टंचाई आराखड्याचे काय झाले?**

पंचायत समिती कार्यालयात उन्हाळ्यापूर्वी पाणीटंचाई आराखडा बैठक घेतली होती. परंतु शासनाच्या क्तीने करण्यात आलेला पाणीटंचाई आराखडा कुठे गेला असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. उन्हाळा सुरू होऊन दोन महिने संपत असताना पाणी टंचाई आराखडा तयार केला, परंतु त्याचा खर्च कुठे झाला, एकाही गावात टँकर सुरू झाले नाही. बोअर देखील झाले नाही. त्यामुळे शासनाच्या पाणीपुरवठा बैठक कोरडीच होती काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.




**लोहा- राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील देशमुख व आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे खारीक खोबऱ्याचा हार घालून पत्रकार ज्ञानेश्वर पाटील पवार परिवाराच्या वतीने निवासस्थानी स्वागत करण्यात आले. यावेळी जिजाबाई पवार ॲड. डांगे, सेवानिवृत्त कृषी अधिकारी माणिकराव मुकादम, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकादम, हरीभाऊ चव्हाण, भास्करराव पाटील पवार, दिनेश तेललवार आदी उपस्थित होते.**

## कदम यांना 'हॉनररी डॉक्टरेट वॉर्ड इन एज्यूकेशन वर्क'

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.१९ एप्रिल-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपळगांव (लिखा) येथील उपक्रमशील शिक्षक मारोती भुजंगराव कदम यांना भारत ह्यूमन राईट फाऊंडेशन व टोकिओ विद्यापीठ जपान यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षण क्षेत्रातील अतुलनीय योगदानाची दखल घेऊन 'हॉनररी डॉक्टरेक्ट अवॉर्ड इन एज्यूकेशन वर्क' ही मानद डॉक्टरेट पदवी जाहीर केल्याचे पत्राव्दारे कुलसचिव डॉ. शिवकुमार यांनी कळवले आहे. या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी बालाजी कापसीकर, पत्रकार जगदीश जोगदंड, सुरेश मगर आदींनी अभिनंदन केले..

# कृत्रिम पानवठ्याद्वारे वन्य प्राण्यांच्या पाण्याची सोय



**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि.१९ एप्रिल-**

उन्हाळ्याचे दिवस सुरू होताच वन्य प्राण्यांसाठी पाणी पिण्याची सोय होण्याकरिता हदगाव वन विभागाच्या वतीने एकूण ११ कृत्रिम पानवठे तयार केले असून यात नियमित प्रमाणे टँकरद्वारे पाणी टाकले जात आहेत. सदरील पाण्याचे नियोजन हदगाव अंतर्गत वन परिमंडळ हदगाव, तामसा, लोहा व मनाठा येथे उपवन संरक्षक नांदेड केशव वाबळे, सहाय्यक वनसंरक्षक नांदेड बि. एन.ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी हदगाव विजय कटके हे आपल्या सहकाऱ्यांसह राबवत असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

उन्हाळ्याची चाहूल लागताच जंगलातील नैसर्गिक जलस्त्रोत आटण्यास सुरुवात होते जंगलात पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने वानर, कोल्हे, हरीण, रानडुक्कर ,मोर, रोही, नीलगाय इत्यादी वन्यप्राणी व पक्षी पाण्याच्या शोधात मानवी वस्तीकडे येत असताना त्यांच्यात संघर्ष होणे वेळे प्रसंगी रस्ता ओलांडताना जीवही जाण्याचं धोका निर्माण होऊ शकतो ही बाब हेरून वन विभागाच्या वतीने एकूण ११ कृत्रिम पानवटे तयार केले असून त्यात टँकरद्वारे नियमितपणे पाणी टाकण्यात येत असून त्यावर कॅमेरेही लावण्यात आलेले आहेत जेणेकरून या वन्य प्राण्यांच्या पाण्याची सोय वनातच व्हावी वन विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या या कृत्रिम पानवठ्यामुळे माणूस आणि वन्यजीव यांच्यातला संघर्ष कमी होण्यास मदत होणार असून वन्यजीवांना वनातच पाण्याची सोय होणार आहे त्यामुळे वन्यप्रेमींकडून समाधान व्यक्त होत आहे.

# सहाय्यक अभियंत्यांनी पिडीत शेतकऱ्यांच्या शेतात सिमेंट पाईप टाकून सोडले पावसाचे पाणी !

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, दि.१९ एप्रिल-**

तालुक्यातील उमरज दगड सांगवी रोडवर शेतकऱ्यांच्या शेताच्या वरील बाजूस नवीन जिल्हा मार्ग होत असून सुमारे चारशे एकर जमीन चे पावसाचे पाणी शेतात रोड मधुन सिमेंटचे पाईप मोठे पाईप टाकून येणाऱ्या पावसाचे पाणी सोडल्याची तक्रार उमरज येथील शेतकरी भास्कर गणपतराव देशपांडे यांनी तक्रार एका निवेदना द्वावारे केली आहे

कंधार तालुक्यातील अनेक सामाजिक प्रश्न सा.बा विभागास सोडविण्यासाठी सुचले नसुन असे अनेक प्रश्न आहेत की त्यापैकी कंधार शहरात येण्यासाठी कंधार ते लोहा व बहाद्दरपुरा ते कंधार पांगरा ते कंधार व कंधार महाराणा प्रताप चौक ते आडत लाईन पयत व सावरगाव नि ते शेलाळी पाटी व वनविभागाचा प्रश्न असे अनेक प्रश्न आवासून उभे असताना सा.बा. सहाय्यक अभियंता श्रेणी १ कंधार, कंधार मधील उमरज येथील याच गटातील ३२०शेतकर्यांच्या शेजारी शेतकऱ्यांच्या अटाहासापोटी राजकीय दबाव पोटी किंवा अर्थ लाभ पोटी घेतलेला निर्णय दिसत असल्याची शंका येत असून त्यावर पर्याय मार्ग न काढता बळजबरीने विश्वासात न घेता शेती खरडून जाईल त्यावर उपाय योजना केली गेली पाहिजे असताना महसुली अधिनियम सांगुन शेतकऱ्यांला आधी पाईप टाकून नंतर दिली नोटीस २०२२-२०२३ मध्ये पिडीत शेतकऱ्यांचे शेजारी यांनी गट क्रमांक ३२० मध्ये शासनाची विना परवानगी घेऊन शेतकऱ्यांची सहमती न घेता सडक जे सी बी घ्या सह्याने खोदुन सिमेंटचे पाईप टाकून पावसाचे पाणी शेतात काढून दिले होते त्या वर्षी पाऊस काळ कमी झाला असताना देखील शेतकऱ्यांची शेती वाहुन गेली तेव्हा अनेक वेळा निवेदन देऊन ही प्रशासना कडुन काही ही हालचाल झाली नाही लोकशाही मार्गाने उपोषण केल्यानंतर विद्रुप न कायदा अंतर्गत गुन्हा दाखल होण्याच्या हलचाली होताच शेजारी शेतकऱ्यांनी रोड मधुन सिमेंटचे पाईप काढुन घेतला हा प्रकार लेखी देऊन ही तीच पुनरावृत्ती अभियंता साहेब यांनी मन लावून केली आहे सिमेंट नाली पिचीग वैगरे या साठी आमच्या विभागाची जबाबदारी नाही तहसील कार्यालयात बघुन घेईल आमच्या कडे बजेट नाही ईस्टीमेंट मध्ये तरतूद नाही असे सांगून हात झटकले आहेत अशी तक्रार पिडीत शेतकरी भास्कर गणपतराव देशपांडे यांनी केली आहे.निवेदन देऊन पाईप काढून घेण्याचा विचार केला गेला नाही तर उपोषणानंतर आमरण उपोषणा आणि आत्मधन करण्याचा इशारा दिला आहे त्यात माझ्या जिवाचे बरे वाईट झाल्यास सर्वस्वी सहाय्यक अभियंता सुमित पाटील हेच राहतील असे निवेदनात म्हटले आहे

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# नारळी सप्ताहाच्या माध्यमातून समाज घडविण्याचे मोलाचे कार्य-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## घाटशीळ पारगाव येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या नारळी सप्ताहासाठी मुख्यमंत्र्यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ एप्रिल**





बीड जिल्ह्याला नारळी सप्ताह, अध्यात्म व विचारांची मोठी परंपरा लाभली आहे. संत वामनभाऊ यांनी सुरू केलेली सप्ताहाची परंपरा अखंडपणे ९३ वर्ष सुरू आहे. या परंपरेच्या माध्यमातून समाज घडविण्याचे मोलाचे कार्य होत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले. गहिनीनाथ गडाचा विकास करताना बीड जिल्ह्याला पाणीदार जिल्हा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शिरूर कासार तालुक्यातील घाटशीळ पारगाव येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ९३ व्या नारळी सप्ताहासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, मठाधिपती विठ्ठल बाबा महाराज, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, आ. सुरेश धस, आ. नमिता मुंदडा, आ. मोनिका राजळे, माजी आमदार जयदत्त क्षीरसागर, माजी आमदार भीमराव धोंडे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, विशेष पोलिस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, जिल्हाधिकारी अविनाश पाठक उपस्थित होते.

श्री. फडणवीस पुढे म्हणाले, गहिनीनाथ गडाच्या विकासाचे काम सुरू केले आहे व अजून पुढे विकासाची ही कामे करायची आहेत. संतानी दाखविलेला भक्तीचा मार्ग समाजाने सोडलेला नाही. समाज घडविणाऱ्या या परंपरेत समाजातील सर्व घटकांचा सहभाग दिसून येत आहे. यामध्ये मुस्लिम समाज बांधव देखील सहभागी झाले, याचा आनंद आहे. आमचे नेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्यामुळे बीड जिल्ह्याशी वेगळे नाते निर्माण झाले आहे. आज मला वामनभाऊंच्या या सप्ताहाच्या परंपरेत सहभागी होऊन आशीर्वाद घेता आला याचा मनस्वी आनंद असल्याचे ते म्हणाले.

गहिनीनाथ गडावर येणाऱ्या प्रत्येक भक्ताची उत्तम व्यवस्था झाली पाहिजे, गडासोबतच या परिसरातील भाविकांच्या सोई सुविधांचा तसेच या परिसराचा देखील विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगून श्री. फडणवीस म्हणाले, मराठवाडा व बीड जिल्ह्याला कायमस्वरुपी दुष्काळमुक्त करण्यासाठी शासनाने कृष्णेचे पाणी आष्टीपर्यंत आणले आहे. ते पाणी संपूर्ण बीड जिल्ह्यात पोचविण्याचा आपला प्रण आहे. मराठवाडा व बीड जिल्ह्याला पाणीदार करण्यासाठी ५३ टीएमसी पाणी गोदाखोऱ्यात आणण्याच्या आराखड्याला देखील मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे या परिसरातील दुष्काळ कायमचा मिटेल. आजच्या या पिढीने दुष्काळ पहिला, तो पुढच्या पिढीला पाहू देणार नाही, असेही श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, संत वामनभाऊ, संत भगवान बाबा यांनी या भागातील लोकांना आध्यात्मिक गोडी निर्माण करणारी सप्ताहाची परंपरा सुरू केली, ती अखंडपणे सुरू आहे. गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी तसेच बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री महोदय आपल्यासोबत आहेत, त्यामुळे येत्या काळात बीड जिल्हा नक्कीच सुजलाम, सुफलाम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.यावेळी गडाचे मठाधिपती विठ्ठल महाराज यांनी संत वामनभाऊ यांनी ९३ वर्षापूर्वी सुरू केलेल्या अखंड नारळी सप्ताह परंपरेबाबत माहिती दिली.यावेळी बीड, अहिल्यानगर जिल्ह्यातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शॉर्टसर्किट मुळे लागलेल्या आगीत गोठा भस्मसात



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ एप्रिल**

बीड तालुक्यातील वाघिरा येथील रहिवासी बापुराव नरहरी आजबे यांचे लिंबागणेश येथील काळवाडी शिवारात गट नंबर २८० मध्ये शेतीजमिन असुन काल शार्टसर्कीटमुळे लागलेल्या आगीत त्यांचा गोठा आणि गोठ्यातील शेतीमाल कांदा, २ एक्करमधील गोळा केलेले ठिबक तसेच १ एक्कर मधील स्प्रिंकलर, शेतीकामासाठी आवश्यक आवजारे आणि सागवानाची झाडे यांचे एकुण जवळपास अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले असुन गोठ्याच्या जवळुन जाणाऱ्या विद्युत तारेच्या शार्टसर्कीटमुळे आग लागल्याचे शेतकरी बापुराव नरहरी आजबे यांनी म्हटले आहे. आज दि.१९ रोजी सकाळी त्यांचा मुलगा शेतावर घरी पाणी नेण्यासाठी आला असता गोठा आगीत भस्मसात झाल्याचे कळाले. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी संबंधित प्रकरणात फोटो आणि व्हिडिओ तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना पाठवुन आगीची कल्पना देत शेतकऱ्याशी फोनवरून बोलणे करून दिले. संबंधित प्रकरणात पंचनामा करण्यासाठी मंडळ अधिकारी, तलाठी यांना सुचना देतो असे तहसीलदार शेळके म्हणाले.

# अमरसिंह पंडित यांनी धोकादायक डिपीचा प्रश्न सोडवला

## भीमनगर येथील नागरिकांनी मानले आभार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ एप्रिल**



गेवराई शहरातील भीमनगर येथे रस्त्याला लागून असणारी विद्युत मंडळाची डीपी धोकादायक ठरली होती. नागरिकांनी केलेल्या मागणीची दखल घेऊन जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित यांनी विशेष लक्ष घालून ही डीपी हाटवल्यामुळे निर्माण झालेला धोका टाळला असून भीम नगर येथील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

गेवराई येथील भीमनगर भागा मधील स्मशानभूमी कडे जानाऱ्या आणि कायम वर्दळ असनाऱ्या रोडच्या बाजूला लागुनच भर वस्तीमध्ये असणारी ही डीपी अंत्यंत धोके दायक बनली होती .रस्त्याने जाणारी वाहने टू व्हीलर तसेच लहान मुले भटकनारी जनावरे नागरिक यांना या डीपीचा धोका निर्माण झाला होत. रात्री अपरात्री किंवा कोणत्याही वेळेला डीपीवर पार्किंग होऊन जाळाचे लोळ पडत होते, स्पार्किंग होऊन स्फोट होत होते. धोकेदायक प्रसंग सतत वारंवार घडत असल्यामुळे या डीपी जवळ राहणारे नागरिक भयभीत झाले होते. ही डीपी हटवण्यासाठी महावितरण कंपनीकडे गेली दहा–बारा वर्षांपासून या भागातील स्थानिक लोकांनी व अनेक लोकप्रतिनिधीनी या डीपीचा पाठपुरावा केला परंतु त्यांनाही डीपी घालवण्यासाठी यश आले नाही, शेवटी नागरिकांनी युवानेते पृथ्वीराज पंडित यांच्या नेतृत्वाखाली जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित व आ. विजयसिंह पंडित यांच्या लक्षात ही बाब आणून दिली. अमरसिंह पंडित यांनी येथील परिस्थितीचे गांभीर्य पाहून हा प्रश्न हाती घेतला व पाठपुरावा सुरू केला. त्यांच्या या पाठपुराव्यामुळे ही डीपी शेवटी हालवण्यात आली. त्यामुळे गेली अनेक वर्षापासून जिव मुठीत घेऊन राहणा–या लोकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

# युगप्रवर्तक क्रिकेट चषक सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या संघाने पटकावला

## सोळंके महाविद्यालयाचा संघ सलग दुसऱ्या वर्षी चषकाचा मानकरी

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१९ एप्रिल**



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित युगप्रवर्तक क्रिकेट चषक सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या प्राध्यापक संघाने क्वॉलिटी संघाचा पराभव करून सलग दुसऱ्या वर्षी युगप्रवर्तक चषक पटकावला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने कर्मचाऱ्यांसाठी युगप्रवर्तक क्रिकेट चषकाचे आयोजन करण्यात आले होते. अंतिम सामना सुंदरराव सोळंके महाविद्यालय व क्वॉलिटी संघात झाला. अंतिम सामन्यात क्वॉलिटी संघाने विजयासाठी ८२ धावाचे लक्ष दिले होते. सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील प्राध्यापक संघाने खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत क्वालिटी संघाचा ९ गाड्यांनी दणदणीत पराभव केला. सुंदरराव सोळंके महाविद्द्यालयाच्या प्रा. रोहित शेठे यांनी उत्कृष्ट फलंदाजी करत स्पर्धेत तीन वेळा अर्धशतक ठोकले. त्यांना मॅन ऑफ द सिरीज देण्यात आला. बेस्ट बॅस्ट्मन म्हणून प्रा. सिद्धू कदम यांना तर बेस्ट बॉलर म्हणून कर्णधार प्रा. अमोल गायकवाड यांना पारितोषिक देण्यात आले.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण पो. नि.राहुल सुर्यतळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रमेश फपाळ, कास्ट्राईबचे तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार, भारत टाकणखार, वसंत टाकणखार, पीएसआय माकने,इम्रान नाईक, मुख्याध्यापक अभिमन्यू इबीते, शिवाजी भाळशंकर, राहुल खुणे, नितीन पुट्टेवाड,किरण शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.युगप्रवर्तक चषक जिंकल्याबद्दल संघातील खेळाडू कर्णधार प्रा.अमोल गायकवाड, प्रा रोहित शेटे, , प्रा. अरुण पेंटावार , प्रा.सुदर्शन स्वामी , प्रा.सिद्धेश्वर कदम, प्रा. स्वप्नील टाक, प्रा.महेंद्र वानखेडे, प्रा.प्रविण कोरडे, प्रा.ममताराम येवले, रामदास इसानकर,हितेंद्र काळे, प्रा.कार्तिक पाचलेगावकर,प्रा.एकनाथ शेंडगे,प्रा. इम्रान पठाण यांचे म. शि.प्र. मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाशदादा सोळंके यांच्यासह ॲड.बी.आर.डक, प्राचार्य डॉ. जी.के.सानप, उपप्राचार्य डॉ. एन.के.मुळे, उपप्राचार्य एम.ए.कव्हळे, प्रबंधक प्रशांत चव्हाण ,अधीक्षक सतीश एरंडे यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# प्रा.धम्मानंद बोराडे यांचा एमपीएससी उत्तीर्ण झाल्याने यशोधरा बुद्धविहाराच्या वतीने सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१९ एप्रिल**

सावरगाव येथील सुपुत्र आणि फुले, शाहू, आंबेडकरी विषयाचे अभ्यासक प्रा. धम्मानंद बोराडे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत औद्योगिक न्यायालयात कार्यकारी सहाय्यक (क्लार्क) पदावर निवड झाली. त्यांचा गौरव यशोधरा बुद्धविहार ट्रस्टच्या वतीने सत्कार करण्यात आला.



शिक्षण क्षेत्रात योगदान देणारे बोराडे NET-SET व M.Phil असूनही अनेक वर्षे सुंदरराव सोळंके महाविद्यालय व सिद्धेश्वर महाविद्यालय येथे तासिका तत्वावर कार्यरत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लिंबाजी वाघमारे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रभाकर साळवे, प्रा. सुदर्शन स्वामी, अशोक कांबळे, शिवाजी ससाणे, पत्रकार रविकांत उघडे, सुभाष बोराडे, सिद्धार्थ पौळ, विशाल जावळे ,आदित्य जाधव आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक यशोधरा बुद्धविहाराचे सचिव बाबासाहेब जाधव यांनी केले. प्रभाकर साळवे, प्रा.सुदर्शन स्वामी, राजकुमार सोनवणे सर यांनी मनोगत व्यक्त करताना बोराडे सरांचे यश हे जिद्द, संघर्ष व निष्ठेचे प्रतीक असल्याचे नमूद केले. प्रा. बोराडे यांनी सत्काराला उत्तर देताना आपल्या संघर्षमय प्रवासाची मांडणी केली, ते म्हणाले की बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव माझ्यावर असल्याने आणि वाचनाची गोडी असल्यामुळेच हे यश शक्य झाले तसेच या प्रवासात प्राथमिक ते पदव्युत्तर मार्गदर्शन करणाऱ्या गुरुजनांचे, कुटुंबाचे, मित्रपरिवाराचे मी विशेष आभार मानतो असे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शिवाजी ससाणे यांनी केले.

# पाठकांच्या मोगलाईत शेतकरी लाडका कसा?

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ एप्रिल**



जिल्ह्यात पवनचक्की सौर ऊर्जा कंपन्यांनी गुंडांच्या मदतीने हैदोस घातला आहे. या नंगा नाचाला जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या अधिकाराचं बळ मिळत आहे. इतका कर्मदरीद्री शेतकरी विरोधी जिल्हाधिकारी बीडच्या इतिहासात कधीच झाला नाही. न्याय भूमिका न घेता अविनाश पाठक यांनी शेतकरी कसा ठकवता येईल यावरच डोळा ठेवला मोगलाईचा काळ सुरू झाला अशी स्थिती शेतकऱ्यांच्या बाबतीत निर्माण केली. मग मुख्यमंत्री साहेब थाटात लाडका शेतकरी अशी घोषणा तुम्ही केली. मग बीड जिल्ह्यात मोगलाई का? मोगलाईत शेतकरी लाडका कसा?शेतकऱ्यांना लालूच दाखवायची जमीन ताब्यात घ्यायची,नाहीच एखाद्या शेतकऱ्याने दिली तर गुंडा मार्फत दमदाटी करायची, गुंडानाही घाबरला नाही तर पोलीस बळाचा वापर करून ,गुन्हे दाखल करण्याची धमकी देत पोलीस ठाण्यात नेऊन डांबून ठेवायचा एवढा एकमेव उपक्रम राबवला जात आहे. कंपन्यांना ते संरक्षणाचे पैसे भरतात म्हणून आम्ही येतो असं पोलीस दल सांगत.मग उद्या दरोडे टाकायला पोलीस संरक्षण मागितलं तर ते मुख्यमंत्री साहेब देणार का? विशेष म्हणजे कंपन्यांच्या पाळलेल्या गुंडा नाही हे संरक्षण दिलं जात आहे. कंपन्याही शेतकऱ्यांच्या जमिनी लुबाडत आहे, शेतकरी नागवण्याचं काम करत आहे. अक्षरशः त्यांच्या भाकरीवर दरोडा घातला जात आहे. मग दरोड्याची वेगळी व्याख्या काय? कमीत कमी जिल्ह्यात आल्यानंतर सरकारचे प्रमुख म्हणून न्याय भूमिका आपण घेताल शेतकऱ्यांना दिलासा देताल पाठकांच्या मनमानीला आळा घालताल एवढीच आस लावून शेतकरी आपल्याकडे सध्या तरी पहात आहे.

# डॉ.राऊत दाम्पत्यांचा केज तालुका माजी सैनिकांच्या वतीने सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१९ एप्रिल**




केज शहरातील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ दिनकर राऊत व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ हेमा राऊत यांचा केज तालुका संघर्ष माजी सैनिक संघटनेच्या वतीने विशेष सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

डॉ. दिनकर राऊत व डॉ संध्या राऊत यांच्या दवाखान्यात माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियाना उपचार करताना विशेष काळजी घेऊन फिस व इतर तपासणी आणि उपचार शुल्कातही मोठी सूट व सवलत दिली जाते. सैनिक देशासाठी सीमेवर मोठे कार्य करतात अशा वेळी त्यांच्यासाठी आम्ही जराशी मदत केली तर त्यात आम्ही एवढे काय करतो असे डॉ संध्या राऊत म्हणतात. तर भविष्यात सैनिक व त्यांच्या परिवारासाठी आमचे हॉस्पिटल त्यांची जमेल ती सेवा करत राहणार असल्याचे डॉ दिनकर राऊत म्हणाले. डॉ दिनकर राऊत यांचा विशेष शोध निबंध आंतरराष्ट्रीय जर्नल मध्ये प्रसिद्ध झाल्याबद्दलही सैनिकांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

यावेळी माजी सैनिक संघटनेचे केज तालुका अध्यक्ष अजिमोद्दीन शेख, सचिव हनुमंत भोसले, उपाध्यक्ष राम प्रभू राऊत, मस्के, नारायण शिंदे, अनिल सपाटे, शेख इलाही यांच्यासह इतर माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या मागणीला यश रिक्त पोलीस पाटील भरतीचे जिल्हाधिकारी यांनी काढले आदेशर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ एप्रिल**



बीड जिल्ह्यातील ११२२ पोलीस पाटील रिक्त पदांची भरती त्वरित करावी अशी मागणी भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूलमंत्री बावनकुळे यांचेकडे केली होती या मागणीची दखल घेऊन मा जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी उपविभागीय अधिकारी यांना भरती बाबत आदेश दिले आहेत.

बीड जिल्ह्यात कोरोना काळापासून आजपर्यंत जवळपास ८५ टक्के गावांमध्ये पोलीस पाटील हे पद रिक्त होते. पोलीस पाटील हे पद ग्रामीण भागातील जनता व प्रशासनाच्या मधील महत्वाचा दुवा आहे. जेणे करुन प्रशासनास गावातील घडामोडी या त्वरीत कळतात व त्यामुळे प्रशासनास शासन चालवणे सोयिस्कर होते. व ग्रामीण भागातील गुन्हेगारीलाही त्यामुळे आळा बसतो. सद्यास्थितीत आज बीड जिल्हयामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले आहे. पोलीस प्रशासनही सद्य परिस्थीतीमध्ये ग्रामीण भागापर्यंत पोहचू शकत नाही. आज मितीला बीड जिल्हयात जवळ जवळ १३२२ पैकी ११२२ रिक्त पदे असून २०० पोलिस पाटील कार्यरत आहेत. पोलिस पाटलांची रिक्त पदभरती झील्यास बीड जिल्हयातील सुशिक्षीत बेरोजगारांना नौकरी मिळून रोजगार मिळेल. बीड जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था पाहता पोलिस पाटलांची रिक्त पदे भरणे अत्यंत आवश्यक होते. याबाबत त्वरित भरती करण्यात यावी अशी मागणी होत बीड जिल्हा भाजप अध्यक्ष शंकर देशमुख यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली होती. देशमुख यांच्या या निवेदनाची महसूल मंत्री यांनी देखील त्वरित दखल घेऊन जिल्हाधिकारी बीड यांना कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. या अनुषंगाने जिल्हाधिकारी श्री अविनाश पाठक यांनी जिल्ह्यातील माजलगाव,बीड,पाटोदा,अंबाजोगाई,परळी वै.उपविभागीय अधिकारी यांना भरती बाबतचे निर्देश देऊन भरतीचे वेळापत्रक दिले आहे दि.२ मे पासुन अर्ज स्वीकारण्या सुरवात करण्यात येणार आहे दि. १९ मे पर्यंत अर्ज स्वीकारले जातील व दि.२० जूनला लेखी परिक्षा होईल व दि.४ जुलै रोजी तोंडी मुलाखती होऊन नियुक्ती मिळतील अनेक वर्षापासून पोलीस पाटील भरतीचा रखडलेला प्रश्न अखेर जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांचेमुळे मार्गी लागला

# युगप्रवर्तक क्रिकेट चषक सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या संघाने पटकावला

## सोळंके महाविद्यालयाचा संघ सलग दुसऱ्या वर्षी चषकाचा मानकरी

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१९ एप्रिल**



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित युगप्रवर्तक क्रिकेट चषक सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या प्राध्यापक संघाने क्वॉलिटी संघाचा पराभव करून सलग दुसऱ्या वर्षी युगप्रवर्तक चषक पटकावला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने कर्मचाऱ्यांसाठी युगप्रवर्तक क्रिकेट चषकाचे आयोजन करण्यात आले होते. अंतिम सामना सुंदरराव सोळंके महाविद्यालय व क्वॉलिटी संघात झाला. अंतिम सामन्यात क्वॉलिटी संघाने विजयासाठी ८२ धावाचे लक्ष दिले होते. सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील प्राध्यापक संघाने खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत क्वालिटी संघाचा ९ गाड्यांनी दणदणीत पराभव केला. सुंदरराव सोळंके महाविद्द्यालयाच्या प्रा. रोहित शेठे यांनी उत्कृष्ट फलंदाजी करत स्पर्धेत तीन वेळा अर्धशतक ठोकले. त्यांना मॅन ऑफ द सिरीज देण्यात आला. बेस्ट बॅस्ट्मन म्हणून प्रा. सिद्धू कदम यांना तर बेस्ट बॉलर म्हणून कर्णधार प्रा. अमोल गायकवाड यांना पारितोषिक देण्यात आले.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण पो. नि.राहुल सुर्यतळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रमेश फपाळ, कास्ट्राईबचे तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार, भारत टाकणखार, वसंत टाकणखार, पीएसआय माकने,इम्रान नाईक, मुख्याध्यापक अभिमन्यू इबीते, शिवाजी भाळशंकर, राहुल खुणे, नितीन पुट्टेवाड,किरण शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

युगप्रवर्तक चषक जिंकल्याबद्दल संघातील खेळाडू कर्णधार प्रा.अमोल गायकवाड, प्रा रोहित शेटे, , प्रा. अरुण पेंटावार , प्रा.सुदर्शन स्वामी , प्रा.सिद्धेश्वर कदम, प्रा. स्वप्नील टाक, प्रा.महेंद्र वानखेडे, प्रा.प्रविण कोरडे, प्रा.ममताराम येवले, रामदास इसानकर,हितेंद्र काळे, प्रा.कार्तिक पाचलेगावकर,प्रा.एकनाथ शेंडगे,प्रा. इम्रान पठाण यांचे म. शि.प्र. मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाशदादा सोळंके यांच्यासह ॲड.बी.आर.डक, प्राचार्य डॉ. जी.के.सानप, उपप्राचार्य डॉ. एन.के.मुळे, उपप्राचार्य एम.ए.कव्हळे, प्रबंधक प्रशांत चव्हाण ,अधीक्षक सतीश एरंडे यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.